
रविवार, १० मार्च २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १९८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

आपल्यालाही धर्मरक्षण करावयाचे असेल तर काय केले पाहिजे याचा अंदाज समर्थांना आला. त्यानंतर ते स्वतःजवळ शस्त्र बाळगू लागले. त्याला ते गुप्ती म्हणत. त्यांच्या जप करण्याच्या कुबडीत एक तलवार लपवलेली असे. आपल्या शिष्यांनाही समर्थांनी स्वाभिमान, स्वत्व आणि सामर्थ्याचा संदेश दिला. दृढनिश्चयी, पोलादी आणि कणखर मनगटाचे आणि मनाचे शिष्य तयार केले. समर्थांच्या घराण्यात गेल्या ३२ पिढ्या श्रीरामांची उपासना असली तरी पूर्वीच्या अनेक पिढ्यांपासून विठ्ठलाची उपासना आणि वारकरी परंपरा देखील होती. समर्थ श्रीराम आणि विठ्ठल यांच्यात भेद मानत नव्हते. दोन्हीही श्रीविष्णूचीच रूपे. परंतु मोगलांच्या अन्यायी आणि जुलमी सत्तेचा प्रतिकार तर करायला हवाच होता. विठ्ठलाचे शांत आणि सौम्य रूप लोकांमध्ये अन्यायाविरुद्ध जागृती करण्यासाठी उपयोगी पडणार नाही. प्राप्त काळाचा विचार करताना समर्थांना असे एखादे दैवत हवे होते की ज्यायोगे लोकांच्या मनात अन्यायाचा प्रतिकार करण्याची उर्मी जागृत होईल. स्वत्व आणि स्वाभिमान जागृत होईल. गुलामगिरीची वृत्ती अंगी भिनलेल्या आणि शक्तिहीन झालेल्या समाजाला नवचैतन्य देईल अशा देवतेची उपासना त्यांना हवी होती. त्यांना त्याचा साक्षात्कार श्रीरामांच्या उपासनेत झाला. कोदंडधारी राम त्यांना आदर्श वाटला. अन्यायी, अत्याचारी अशा रावणाचे पारिपत्य करून त्याच्या बंदिवासात असलेल्या देवांना ज्याने मुक्त केले तो श्रीराम म्हणजे देवांचा देव. त्याला साह्य करणारा हनुमंत म्हणजे बल, बुद्धी, चातुर्य, स्वामीनिष्ठा आणि भक्तीचे प्रतीक. हातात शस्त्र घेऊन राक्षसांचे पारिपत्य करणारी आणि अभय देणारी तुळजाभवानी ही दैवते समर्थांना त्या काळाच्या दृष्टीने आदर्श वाटली. त्यांच्याच उपासनेचा आदर्श लोकांसमोर ठेवण्याचा त्यांनी निर्धार केला. श्रीराम आणि हनुमंताची उपासना जाणीवपूर्वक स्वीकारताना समाजातील नेभळटपणा, करंटेपणा, अंगात भिनलेली गुलामीची वृत्ती जावी हा त्यांच्या अंतरीचा हेतू होता.






## आनंदी पहाट

### नकारात्मक विचार टाळावेत

आधुनिक केसरी

नकारात्मक दृष्टीकोन आणि असहायता तसेच निराशेच्या भावना दीर्घकालीन तणाव निर्माण करू शकतात, ज्यामुळे शरीरातील संप्रेरक संतुलन बिघडते. आनंदासाठी आवश्यक असणारी मेंदूतील रसायने कमी होतात आणि रोगप्रतिकारक शक्ती बिघडत जाते, दीर्घकालीन तणावामुळे आपले आयुर्मान देखील कमी होऊ शकते. चिंता विविध गोष्टींमुळे होऊ शकते जसे कि, तणाव, अनुवांशिकता, मेंदूचे रसायनशास्त्र, क्लेशकारक घटना किंवा पर्यावरणीय घटक ही होत. चिंताविरोधी औषधाने लक्षणे कमी करता येतात, परंतु औषधोपचार करूनही, काही जणांना अजूनही काही चिंता किंवा पॅनीक अटॅकचा अनुभव येऊ शकतो. चिंताग्रस्त विकारांमुळे जलद हृदय गती, धडधडणे आणि छातीत दुखणे अशा प्रकारच्या विपरीत परिणामांना सामोरे जावे लागते, काहीजणांनाउच्च रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका देखील असू शकतो. अगोदरच हृदयविकार असल्यास, चिंताग्रस्त विकारांमुळे कोरोनरी इव्हेंट्सचा धोका वाढू शकतो. निदान न झालेल्या किंवा उपचार न केलेल्या चिंता विकार असलेल्या बहुसंख्य लोकांसाठी, व्यक्ती आणि समाज या दोघांसाठी अनेक नकारात्मक परिणाम निर्माण करणारे ठरू शकतात. यामध्ये अपंगत्व, काम करण्याची क्षमता कमी झाल्याने उत्पादकता कमी होणे आणि आत्महत्येचा उच्च धोका निर्माण होणे, यांचा समावेश असतो. जेव्हा आपण विचार करतो की काहीतरी वाईट होईल तेव्हा हमखास काहीतरी वाईटच घडते. म्हणजेच आपण जसा विचार करतो तसेच घडते. ह्यासाठी नेहमी सकारात्मक विचार करावा म्हणजे अनुभव देखील सकारात्मकच येत राहतात. दैनंदिन ताणतणाव, झोपेच्या खराब सवयी आणि आरोग्याच्या इतर परिस्थितींमुळे रात्रीच्या वेळी चिंता आणि पॅनीक अटॅक वाढू शकतात. अर्थात, त्यावर अनेक उपचार उपलब्ध आहेत जे तुमची चिंता कमी करण्यात आणि तुमच्या झोपेची गुणवत्ता सुधारण्यास मदत करू शकतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

### विठ्ठल सावळा | प्रगटला ||

फेर धरोनिया | नाचावे रींगणी ||
रमावे भजनी | विठोबाच्या ||१||
अभंगात रमे | भंडारा डोंगरी ||
विठ्ठलाची वारी | पंढरीत ||२||
नामाच्या किर्तनी | नाचे पांडुरंग ||
गायन अभंग | ज्ञाना करी ||३||
जीवीचा जीवात्मा | उभा विटेवरी ||
चंद्रभागे तीरी | संत मेळा ||४||
भक्तांचा जिव्हाळा | दाटला उमाळा ||
विठ्ठल सावळा | प्रगटला ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हि त गु ज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)


### मोरेदादांचे बालपण

आजपासून मागे ऐंशी वर्षांच्या कालखंडातील, स्वातंत्र्यपूर्व भारतातील खेड्यांतील वातावरण व सुखसोयी यांचा विचार केला तर फारसे अनुकूल दिसत नाही. अशा काळी दिंडोरी सारख्या छोट्या खेड्यातील शेतकरी कुटुंबातील पितृछत्र हरपलेला बालक, असा सिद्धयोगी भगवान श्री स्वामी महाराजांचे चैतन्यरूप होऊन जनसामान्यांचे मार्गदर्शक व आधार बनेल असे कुणालाही त्यावेळी वाटले नसेल, पण परब्रह्म श्री स्वामी महाराज अशी अतर्क्य लीला करतात. 'मूळ-मूळ वडाचे झाड' या वटवृक्षरूपी स्वामी महाराजांची अदृश्य, चिन्मय पारंबी दादांच्या रूपाने दिंडोरीच्या पावन घरात रुजली,वाढली. परब्रह्म श्री स्वामी महाराजच सद्‌गुरू पिठले महाराज झाले, तेच प. पू. दादा बनले. गुरू-शिष्याच्या ज्ञानाचा आनंद सोहळा अनुभवण्यासाठी भगवंताने ही नामरूप धारण करण्याची लीला केली. उत्तुंग व्यक्तीमत्त्व प. पू. दादांना लाभले होते. त्यांच्या मातोश्रींचे उत्तम संस्कार मूळच्या गुणांना उज्ज्वल करीत होते. प. पू. दादासाहेबांच्या मातोश्री म्हणजे स्वधर्म संस्थापक श्रीमती जिजाऊ साहेबांचा अवतार होय. त्यांनी मुलांना वाढवतांना मातापित्याची जबाबदारी पार पाडतांना, प्रत्येक क्षणी, प्रसंगी दूरदर्शीपणाने मुलांना घडवले. शेती व्यवसाय सांभाळतांना, मुलांना शेतीबरोबर यामाऊलीने शालेय व आध्यात्मिक शिक्षण दिले.
प. पू. मोरेदादांच्या बालपणाची जडण-घडण पाहिली की 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी' या वाक्याचा अर्थ पुरेपूर उलगडतो. एका छोट्याशा गावातील शेतकरी आईने मुलाला सिद्धयोगी, कृषी संत, सदगुरू, भगवान श्री स्वामी महाराजांची परम विभूती बनण्याचे संस्कार व सामर्थ्य दिले.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

निज स्वरुप के ज्ञान में,
परखो शब्द स्वरुप । तब चेतन चेतन
मिलै, चेतन धर्म अनूप ।।६०।।(स्वर्वेद
द्वितीय मण्डल सप्तम अध्याय)
०२/०७/६०मूळ भाष्याचा मराठी
अनुवाद : निज स्वरूप प्रत्यक्ष झाल्यावर शब्दस्वरूप परब्रह्माला प्रत्यक्ष पाहावे, तेव्हा चेतन आत्म्याचा चेतन परब्रह्माशी योग होऊन अनुपम चेतन धर्माची प्राप्ती होईल. चेतन-चेतनचा संबंधच योग आहे आणि यालाच भक्ती सुद्धा म्हणतात. प्रकृतीचा संबंध सोडून शुद्ध चेतन निज स्वरूपाने आत्मा परब्रह्माची उपासना करतो. प्राकृतिक साधनांनी परमेश्वराची उपासना होत नाही किंवा आत्म्याला शुद्ध चेतन प्रकाश परमानंदाचीही प्राप्ती होत नाही.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## कोणत्याही परिस्थितीत वृत्ती स्थिर ठेवावी

आधुनिक केसरी

अमानित्व हा देहाचा धर्म आहे. दुसऱ्याचा मोठेपणा राखून आपला मोठेपणा वाढवावा. दंभ हा मनाचा धर्म आहे. तो दुसऱ्याला फसविण्याकरिता नसावा. स्वतःचे कल्याण करून घेण्यापुरताच दंभ असल्यास हरकत नाही. अहिंसा हा देहाचा आणि मनाचा धर्म आहे. अहिंसा ही हेतूवर अवलंबून असते. वाचेने कोणाचे मन दुखवू नये, आणि देहाने परपीडा करू नये. दुसऱ्याचे दोष सांगणे हे हीनपणाचे लक्षण आहे. लौकिकातला मोठेपणा एका जन्माचा घात करतो, पण दंभ आणि हिंसा अनेक जन्मांचा घात करतात. द्वेषामुळे हिंसा घडते, म्हणून आपण कोणाचाही द्वेष करू नये. कामक्रोधादि सर्वच विकार भगवंताच्या आड येतात, पण वैर आणि द्वेष यांसारखा परमार्थाचा नाश करणारा शत्रू नाही. स्वार्थामुळे द्वेष घडतो. स्वार्थ जायला नामासारखे दुसरे साधन नाही. आपली वाचा दुसऱ्याला शिकविण्यासाठी आणि मोठेपणा बाळगण्यासाठी नाही. वाचेने म्हणजे जिभेने बोलता येते आणि खाता येते. नेहमी सत्य आणि गोड बोलावे, आणि



खाण्याच्या बाबतीत जीभ आपल्या ताब्यात ठेवावी. स्वतःची चित्तशुद्धी करून घेऊन, संतांचे गुण आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा. अभिमानाचे विष जिथे येते, तिथे नामाची आठवण ठेवावी. हिरण्यकश्यपूच्या ठिकाणी देखील भगवंत नव्हता असे नाही; पण कुंपण फार वाढल्याने शेत दिसेनासे व्हावे, तसे हिरण्यकश्यपूचे झाले. स्वतःच्या ठिकाणी भगवंत आहे हे हिरण्यकश्यपू अभिमानामुळे विसरला. त्यामुळे भगवंताला खांबात दिसावे लागले. अभिमान जरुरीपुरताच ठेवावा. ' मी रामाचा आहे ' असा अभिमान धरावा. नामाची कास धरावी. ' नारायणाचे दर्शन व्हावे ' असे नाही प्रह्लाद म्हणाला, ' नाम नाही सोडणार ' असे म्हणाला.
लहानपणाची वृत्ती चांगली असते. लहानपणात चूक नाहीच, आणि सगळा फायदाच असतो. भगवंताजवळ आपण लहान मूल झाल्याशिवाय त्याला कृपेचा पान्हा फुटणार नाही; म्हणून आपण भगवंतापाशी लहान व्हावे. लहानपण हे वयावर अवलंबून नसून, आपल्या वृत्तीवर अवलंबून असते. कोणाविषयीही वाईट विचार मनात आणू नयेत; त्यापासून आपलेच मन गढूळ होते. ' माझा प्रपंच जसा व्हायचा असेल तसा होवो, पण तुझा विसर मला पडू देऊ नकोस, ' असे परमेश्वराला अनन्यतेने म्हणावे. मला खात्री आहे, तो तुमच्या साहाय्याला आल्यावाचून राहणार नाही.
१३३. वृत्ती स्थिर करण्यासाठी तिला स्थिर वस्तूवर चिकटवून ठेवली पाहिजे. भगवंत ही अशी एकच वस्तू स्थिर आहे.

## कल्याण स्वामी

आधुनिक केसरी

बराच वेळ ते का आले नाहीत हे पाहण्यासाठी समर्थ आले असता त्यांना रस्त्यात मूर्च्छित कल्याण स्वामी दिसले. नंतर समर्थांनी त्यांचे विष उतरवले. अशी कल्याणांची गुरुनिष्ठा होती. एकदा छत्रपती संभाजीमहाराज नगर ला समर्थ रामदास स्वामी कीर्तन करत होते. त्यावेळी कल्याण स्वामी त्यांच्या साथीला होते.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १० मार्च २०२४

दुष्काळी तालुक्यातील मातीत रुजलेले, झिजलेले व जनसेवेचा अंकुर बनून संघर्षमय वाटचालीत पुरोगामी विचारांनी बहरलेले



## विकासात्मक विचाराने बहरलेले नेतृत्व

# लोकनेते आ. डॉ. नीलेशजी लंके साहेब

लंके साहेब म्हणजे अन्यायाला झनझणीत अशी एक चपराक, निलेश लंके साहेब म्हणजे सर्वसामान्य माणसाचा अभिमान, स्वाभिमान ! निलेश लंके साहेबांवरती लिहिण्या पाठीमागची पार्श्वभूमी विचारात घेत असता निलेश लंके हे नाव संपूर्ण महाराष्ट्रभर आज खूप मोठ्या संख्येने लोकांच्या जिव्हाळ्याचे विषय बनून गेलेले आहे. लोकांच्या मनाची आर्त हाक म्हणजे आज निलेश लंके साहेब झालेले आहेत. हे निलेश लंके साहेबांचे व्यक्तिमत्त्व हे सर्वसामान्यांना का हवहवसं वाटतं.निलेश लंके साहेब आज जरी फक्त पारनेरचे आमदार असले तरी सुद्धा संपूर्ण महाराष्ट्रासाठी ते लोकप्रिय ठरलेले आहेत,ते संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांचे आशास्थान प्रेरणास्थान का झाले आहेत ?

निलेश लंके साहेबांचे राजकारण हे समाजाभिमुख आहे समाजाशी निगडित आहे समाजातील लोकांच्या ज्या समस्या असतील त्या समस्यांची सोडवणूक करणार आहे .आज बऱ्याच जणांना त्यांच्या तालुक्यातील आमदाराचे नाव माहीत नसेल परंतु निलेश लंके मात्र त्यांच्या जिभेवरती रेंगाळणार नाव आहे.याचे कारण फक्त एकच आहे की निलेश लंके साहेबांनी फक्त आणि फक्त राजकारणातून समाजकार्याचा ध्यास घेतलेला तुम्हा -आम्हाला पहिला मिळतो,म्हणूनच निलेश लंके साहेब आज महाराष्ट्रभर लोकप्रिय होताना आपल्यालाला दिसून येतात. निलेश लंके साहेबांचे कार्य हे खरंच सलाम करण्यासारखे आहे त्यांचं कर्तृत्व हे अफाट आहे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणे हे कधीच कोणाला शक्य होणार नाही. ते प्रत्येकाला आपलंसे करूण घेतात प्रत्येकाला सन्मानाने वागवतात. सध्या समाजामध्ये फक्त आणि फक्त सतरंज्या उचलायला कार्यकर्त्यांचा वापर करणारे नेते आपल्याला दिसतात, परंतु कार्यकर्त्यांमध्ये राहून कार्यकर्त्यांचे प्रश्न समजून घेऊन कार्यकर्त्यांशी प्रेमाने आदराने वागणारा नाव म्हणजेच निलेश लंके साहेब आहेत. निलेश लंके साहेबांकडे सगळ्यात मोठा गुण आहे तो म्हणजे त्यांच्या संघटन चातुर्य. या कुशल प्रभावी संघटन चातुर्याचे उदाहरण फक्त एवढंच की साधे मिसरूड फुटलं नसताना हा माणूस तालुक्याचा शिवसेनाप्रमुख होतो हे खरेच वाखण्याजोगे आहे. प्रचंड कमी वयात लोकांना आपलसे करणे कार्यकर्त्यांना एकत्र बांधून त्यांना राजकीय व्यासपीठ निर्माण करून देत सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठीचे संस्कार युवकांवर बिंबवण्याचे काम करत संघटना मजबूत करण्याची त्यांची हातोटी हे खरंच कौतुकास्पद आहे. कोव्हीड कालखंडामध्ये तर निलेश लंके साहेबांचे काम हे खऱ्या अर्थाने भारावून टाकणारा आश्चर्यकारक आहे.मग या कामाची दखल पवार परिवारानी घेतलेली असो किंवाइतकंच नाही तर एखादा अपंग व्यक्ती निलेश लंके प्रतिष्ठानला मदत करण्यासाठी तळमळीने पुढे येतो ही खरी त्यांच्या समाजसेवेची पावती आहे. वेगवेगळ्या संघटना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आशा वेगळ्या पुरस्काराच्या माध्यमातून आपल्या कार्यकर्तृत्वाची चुनुक दाखवत देश विदेशात पोहोचणारे हे महाराष्ट्रातील कदाचित एकमेव आमदार असतील. कुठलीही निवडणूक असो की कोव्हीड कालखंडामध्ये जे काम सुरू होतं त्या सामाजिक कार्यात निलेश लंके प्रतिष्ठानला विवीध स्थरातून आर्थिक मदत केलेली आपल्याला दिसून येते. निलेश लंके साहेबांना देश विदेशात बहुमानाचे समजले जाणारे वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड असो की महाराष्ट्रीयन ऑफ द इयर असो किंवा मधु दंडवते यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार आसो की, नुकताच जाहीर झालेला "द इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी पॅरिस" या आंतरराष्ट्रीय विद्यापीठातून कोरोना काळात केलेल्या कार्याची दखल घेत डॉक्टरेट देत सन्मानित करण्यात आले.

**जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुला...!**
**तोचि साधु ओळखावा, देव तेथेची जाणावा....!!**

तुकोबा रायांनी साडेचारशे वर्षांपूर्वी सांगितलेला हा मूलमंत्र माणसांची सेवा कराणारा रंजल्या गांजल्यांची सेवा करणारा, त्यांना आपलंसं करणारा माणूस, गरीबांचे अश्रू पुसणारा व्यक्ती हाच साधू असतो. सध्या लंके साहेब यांचं काम पाहता ते आधूनिक साधू असल्याचा भास होतोच पण त्यांची स्थितप्रज्ञता ही साधूपेक्षाही अलौकिक वाटते. समाजसेवेचे मांगल्याचे व्रत स्विकारणारे निलेश लंके साहेबांना समाजातील जनता आज देवाप्रमाणे मानतोय ही बाब खरोखरच अतिशयोक्ती करण्यासारखी नाही. निलेश लंके साहेब हे कैक गरीब शेतकरी शोषीत वंचित यांचे उद्धारकर्ते आहेत. रात्री दीड वाजता कोव्हिड सेंटरमध्ये जाऊन कोव्हिड रुग्णांची तब्येत व्यवस्थित आहेत का हे पाहणारे निलेश लंके साहेब हे त्या कोरोना रुग्णांसाठी नक्कीच देवासारखे आहेत. एका बाजूला भ्रष्टाचार फोफावत असताना, सामान्य माणसांना अज्ञानी ठेवून त्यांच्यावर अन्याय करणारे, जनतेचे शोषण करणारे, जनतेची, शेतकऱ्यांची, शोषीतांची पिळवणूक करणारे नेते अधिकारी, आपल्याला एका बाजूला दिसुन येतात तर अशा कालखंडामध्ये सुद्धा राजकारण म्हणजे सत्ताकारण नसून ते समाजकारण आहे हे समजून समाजातील शेतकरी कष्टकरी वर्गाचे अश्रू पुसणारे निलेश लंके साहेब म्हणजे साक्षात अंधारातही दिशा दाखवणारा त्यांना त्यांचा ध्रुवतारा भासता. साहेब आज आमदार असतानाही साहेबांचे घर, घरातील लोक आणि खुद्द लंके साहेबही किती साधे राहतात हे खरंच आश्चर्य वाटण्यासारखे आहे आहे. एका आमदाराचे पत्नी आदर्श पत्नी कशी असावी हे राणी ताईंकडे पाहीले की समजून येते. एका खाजगी कंपनीतील नोकरी सोडून चहाच छोटेसे हॉटेल काढणं पण आपल्या परोपकारी स्वभावामुळे तेही बंद पडणं. ज्या पक्षावर निष्ठा ठेवली त्याच पक्षाने केलेली बदनामी. या नंतर जन्मदिनाच्या दिवशी आता "रडायचं नाही तर लढायचं" ही जनतेने घातलेली आर्त हाक तेथून राष्ट्रवादी चा पक्ष प्रवेश आणि विपरीत परिस्थितीत सर्व विरोधक एकवटले असताना निलेश लंके साहेबांचे आमदार होणे इथपर्यंत चा प्रवास हा खरोखरच थक्क करून सोडणारा आहे. एक काळ होता पारनेर तालुका हा जेष्ठ समाजसेवक, आण्णा हजारे यांच्या नावाने ओळखला जायचा पण आता पारनेर म्हणलं कि निलेश लंके साहेब हे समिकरण जणू येथे जमलेलं दिसुन येत आहे. सर्वसामान्य जनतेमध्ये लहानचा मोठा झालेला एका शिक्षकाचा मुलगा बाल वयातच सर्वसामान्यांचे दुःख काय असते ते पाहत व त्यांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करत मोठा होतो व कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचा आमदार होतो हे खरोखरच कौतुकास्पद आहे.आपले पद हे मिळवण्यासाठी नव्हे तर गोरगरीब जनतेच्या न्याय हक्कासाठी आहे याची जाणीव ठेवत आमदार झाल्यानंतर गेले चार वर्षापासून मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्रभर युवकांचे संघटन उभे करत जनतेची सेवा करत आले आहेत. पारनेर तालुक्याचे दुष्काळी तालुका हे नाव पुसुन काढण्यासाठी आमदार झाल्यापासून पारनेरच्या पाणी प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करत पाणी प्रश्न प्रभावीपणे राज्य शासनाकडे मांडण्याच्या कामे योगदान देणारे तसेच करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करत खेड्यापाड्यात साठवण बंधाऱ्यांच्या माध्यमातून बळीराजाला जल संजीवनी देण्याचे काम या सामान्य आमदाराने केले आहे .आमदार झाल्यानंतर कोरोना महामारीची लाट संपूर्ण जगात पहावयास मिळाली शिक्षण सम्राट साखर सम्राट कारखानदार ज्यावेळेस आपल्या करोडो रुपयांच्या मालमत्तेचा विचार करत घरात बसले होते त्यावेळी माझी मायबाप जनता संकटात असताना आपण त्यांच्या मदतीला जाणे हे आपले कर्तव्य आहे असे समजून कर्जुले हर्या व भाळवणी येथे माननीय शरद पवार आरोग्य मंदिर या नावाने कोविड सेंटर चालू करत किमान 35000 कोरोना रुग्णांना जीवदान देणारा हा आरोग्य दूत ठरला व त्या कार्याची दखल देश-विदेशात घेतली गेली हे डॉक्टर निलेशजी लंके यांच्या आयुष्याला सामाजिक कलाटणी देणारे पर्व ठरले. राजकारणाबरोबर धार्मिक अस्मिता जतन करणारा नेता म्हणून आमदार निलेश लंके यांचे नाव आवर्जून घेता येईल कुठलीही निवडणूक किंवा स्वार्थ डोळ्यासमोर न ठेवता प्रत्येक नवरात्र उत्सवात लाखो महिलांना मोहटा देवी देवदर्शन आसो की मुस्लिम बांधवांसाठी खेड शिवापुर येथील दर्गा दर्शन असो की मुंबईकर बांधवांसाठी आई एकविरा देवीचे दर्शन घडवत लाखो महिला भाविक भक्तांना मोफत अन्नदान प्रवास व आपल्या घरून घेऊन जात सुखरूप घरी पोहोचवीनारे इतिहास पुरुष आमदार निलेश लंके हे एकमेव आमदार असू शकतात ! आपल्या कर्तुत्वाचा वेल बहरत असताना एक लाडके व्यक्तिमत्व म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर ज्यांची ओळख तयार झाली त्या डॉक्टर लंके यांचा सन्मान करण्यासाठी त्यांचा चाहता वर्ग हजारो रुपयांचे शाल श्रीफळ बुके या गोष्टीवर अवांतर खर्च करतात .तो खर्च टाळण्यासाठी माझा सत्कार करायचा असेल तर मला शालेयपयोगी वस्तू द्या, असे आवाहन केले व अभिमानाने सांगावं वाटतं की केले चार वर्षात लाखो रुपयांचे शालेय साहित्य जमा झाले व त्या माध्यमातून अनेक गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यात आमदार निलेश लंके यशस्वी झाले .शिक्षणाची मानसिकता असूनही आर्थिक परिस्थितीमुळे शिकू शकत नाही अशा हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणारे एमपीएससी यूपीएससी या स्पर्धा परीक्षांसाठी पारनेर तालुक्यात निघोज व कानूर पठार येथे किमान सव्वा दोन कोटी रुपयाच्या भव्य अभ्यासिका उभ्या करत तालुक्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले व पारनेर तालुक्यातील शेकडो विद्यार्थी हे उच्चपदस्थ अधिकारी झाले त्यांचा मतदार संघातील आम जनतेच्या वतीने नागरी सन्मान करत आपल्या आमदारकीची वेगळी ओळख दाखवून दिली. अनेक किलोमीटर वरून पायपीट करून शाळेला येणाऱ्या बाल विद्यार्थ्यांना गेले चार वर्षात किमान दहा हजाराच्या वर विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप केले गेले .शेतकऱ्याचा पुत्र असल्यामुळे कृषी क्षेत्रात होणारे नवीन बदल व तंत्रज्ञानाचा उपयोग माझ्या मतदार संघातील बळीराजाला व्हावा म्हणून प्रत्येक वर्षी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन भरवत आधुनिक शेतीचा मार्ग बळीराजासाठी खुला करून दिला. सुपा रांजणगाव एमआयडीसी सह राज्यातील विविध औद्योगिक क्षेत्रात आजपर्यंत नोकरी मिळावा असो की कारखानदारांचा हितसंबंध असो याचा उपयोग करत लाखो युवकांना रोजगार उपलब्ध करून देणारे आमदार म्हणून निलेश लंके यांचे कडे पाहता येईल. गाव पातळीवर अनेक वर्षापासून राजकारणातील हेवे दावे भावाभावातील जमिनीचे वाद हे विकोपाला गेले असताना एकत्र बसवत शेकडो दुभंगलेले कुटुंब व गाव पातळीवरील वाद मिटविण्यात यशस्वी ठरलेले आमदार अशी एक वेगळी ओळख आमदार निलेश लंके यांनी निर्माण केली आहे. आजपर्यंत पारनेर तालुक्याची ओळख ही ज्येष्ठ समाजसेवक किंवा संतांच्या नावाने केली जात होती परंतु आज पारनेर तालुका हा निलेश लंके साहेबांचे नावाने ओळखला जातो. निलेश लंके साहेबांनी एका छोट्याशा तालुक्यात परिवर्तनशील, लोकभिमुख ,क्रांती जी घडवून आणलेली आहे हे तीचेच फलीत आहे. आज बर्याच जणांची अशी इच्छा आहे कि निलेश लंके साहेबांसारख्या व्यक्ती आपल्या तालूक्यातील आमदार असावा. अशा उत्तुंग, सर्वगुणसंपन्न नेता, लोकनेता, जननायक, संघर्ष योद्धा यांचा जिवन प्रवास, सर्व-सामान्यांना कळावा ही माफक अपेक्षा ठेवत, मी श्रीकांत (भाऊ) चौरे निलेश लंके प्रतिष्ठानचा प्रसार माध्यम प्रमुख म्हणून लिहीण्याचा छोटासा प्रयत्न करत आहे.माजी सैनिक असो की मेंढपाळ संघटना असो किंवा विकलांग बांधवांच्या विविध समस्या असो किंवा महिला सक्षमीकरणासाठी महिला संस्था असो अशा विविध संघटना उभ्या करत प्रतिष्ठानच्या माध्यमातून सर्वसामान्य घटकाच्या शेवटच्या झोपडीत व झोपडीतल्या प्रत्येक खोपडीत पोहचण्याचे काम व आबाला वृद्धांच्या हृदयासनावर राज्य करणाऱ्या या लोकनेत्याच्या आजच्या जन्मदिनी शाल श्रीफळ पुष्पगुच्छ यावर अवांतर खर्च करण्यापेक्षा माझ्या गरीब विद्यार्थी बंधु भगिणींना शालेय साहीत्य रूपी मदत करावी आसे अवाहन करणाऱ्या जननायकाच्या परोपकारी नेर्तुत्वावर प्रेम करणाऱ्या माझ्या लोकनेत्याच्या जन्मदिनी त्यांना उदंड निरोगी आयुष्य व उज्वल भविष्य मिळो हीच परमेश्वरा चरणी प्रार्थना !



**श्रीकांत चौरे**
प्रसार माध्यम प्रमुख
निलेश लंके प्रतिष्ठान



# सार्वत्रिक ताठरता



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**अलीकडच्या काळात सर्व स्तरातील ताठरता दिसून येत आहे. ही परिस्थिती केवळ एकाच क्षेत्रात आहे आणि इतर ठिकाणी सर्व सौजन्याचे वातावरण आहे असे नाही. व्यक्ती, कुटुंब, समाज, राजकारण, समाजकारण, अर्थकारण आणि जीवनाच्या सर्व स्तरातील वातावरण अत्यंत गढूळ, संशयाचे आणि अत्यंतिक टोकाचे झाले की काय अशी परिस्थिती दिसते. पुरातन काळापासून चालत आलेली समाजाची घडी अत्यंत तकलादू किंवा प्रासंगिक घटना प्रसंगांनी विस्कटून जात असेल आणि त्याजागी काही चांगला पर्याय आपल्यासमोर नसेल तर हा गोंधळ कशासाठी घालायचा हा कोणत्याही सुज्ञ माणसाला पडणारा प्रश्न. त्यावर उपाय काय? का असेच चालत राहणार?**



## क्षितिजापल्याड

सध्या भारतात निवडणुकांचे वारे वाहू लागले आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एकमेकांचे उणे दुणे काढणे, अगदी जिव्हारी लागेल अशी टीका करणे, दडपण आणणे आणि विरोधकांना नामोहरण कसे करता येईल याबद्दलच्या योजना आखणे हे राजकारणात चालायचेच; परंतु त्याचा प्रभाव पडून समाजकारण जर विस्कळीत होत असेल तर कोणत्याही विवेकी माणसाने याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. निवडणुकीला सामोरे जाणारे राजकीय पक्ष, त्या राजकीय पक्षांचे विविध उमेदवार आज एखाद्यावर टीका करतील आणि उद्या त्यांच्या सोबतच सत्ता स्थापनेमध्ये सहभागी होतील. परंतु सामान्य माणूस कायम एकमेकांपासून दुरावण्याची शक्यता नाकारता येत नाही. जा रितीने परस्परांवर अत्यंत खालच्या पातळीला जाऊन चिखलफेक झाली आणि परस्परांविषयी संशयाचे वातावरण निर्माण झाले हे वातावरण निवळण्यास कितीतरी वर्ष जावे लागतील. हे केवळ निवडणुकांच्या माध्यमातूनच होते आहे असे नव्हे तर अलीकडच्या काळात आरक्षणाच्या मुद्द्यावर देखील समाजामध्ये एक प्रकारची कटूता, दुफळी निर्माण झाल्याचे चित्र आपण पाहत आहोत. खरे तर जागतिकीकरणाने आपल्या जगण्याचा पट एवढा संकुचित केलेला आहे की, आपणास पाय पसरायला जागा मिळू नये आणि या उद्विग्नतेतूनच किंवा कुचंबनेतून आपला त्रागा व्हावा अशी परिस्थिती आपल्यासमोर येऊन ठेपली आहे. समाज संघटना आणि शासन किंवा सामान्य माणूस आणि शासन यांच्यामध्ये अविश्वासाची दरी वाढण्यापेक्षा कमी झाल्यास समाजासही न्याय मिळेल आणि शासनासही व्यवस्थात्मक धोरणे राबविण्यास सोयीचे जाईल, असे सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. कोणत्याही सामाजिक प्रश्नांविषयी केवळ तत्कालीन कारणांकडे पाहून त्याचे परिमार्जन करणे ही केवळ मलमपट्टी ठरू शकते. आज आरक्षणाचा प्रश्न एवढ्या तीव्रतेने समोर येण्याच्या कारणांचा मागोवा घेतल्यास समाजात वाढणारी बेरोजगारी, शेतीमालाला किमान भाव नसणे, कोरडवाहू जमिनीचा प्रश्न, सिंचनाचा अभाव, वाढती महागाई आणि समाजात वाढत जाणारा चंगळवाद, शिक्षणाचे खाजगीकरण आणि त्यामुळे महाग झालेले शिक्षण या सर्वांची परिणती म्हणून आरक्षणाचा प्रश्न आपल्यासमोर उभा राहिला आहे. राजकारण, आरक्षणाचा प्रश्न, समाजातील स्त्रियांच्या दर्जाचा प्रश्न, एकूण समाजाच्या जीवनमान उंचावण्यात आलेले अपयश आणि प्रादेशिक असमतोल ही आणि अशा स्वरूपाची काही कारण समाजात खदखद वाढविण्यास कारणीभूत आहेत याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

कोणत्याही काळात समाजात जे विविध प्रकारच्या समस्या किंवा प्रश्न निर्माण होतात त्याला घेऊन काही समाजसेवक किंवा सामाजिक संघटना या कार्य करतच असतात. त्यांची मुस्कटदाबी होणे हे समाज हिताचे ठरणार नाही. अगदी जयप्रकाश नारायण, युक्रांत, बाबा आढाव, रामस्वामी पेरियार, मेधा पाटकर, जॉर्ज फर्नांडिस, काशीराम, दाभोळकर आणि अलीकडच्या काळात झालेले अण्णा हजारे यांचे आंदोलन या सर्व समाज सुधारक किंवा सामाजिक संघटनांकडे पाहिल्यास आपणास या घुसळणीतूनच काहीतरी नवे जन्माला आल्याचे निदर्शनास येते. समाज पुढे जाण्यासाठी, विकसित होण्यासाठी अशा चळवळींची आवश्यकता असते. या कार्यकर्त्यांना आणि चळवळींना त्या त्या काळातील प्रसार माध्यमांनी प्रसिद्धी देऊन हा लढा समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केल्याचे दिसते. अगदी महाराष्ट्राच्या बाबतीतच सांगायचे झाल्यास लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्र. के.अत्रे, सी. म. परांजपे, माडखोलकर आणि इतर संपादकांनी सत्ताधाऱ्यांचे दोष दाखवून देऊन त्यांना वेळीच सावध केले आणि शासनकर्त्यांनी देखील मोठ्या मनाने हे समजून घेऊन आपल्या धोरणात काही बदल करता येऊ शकतो का हे तपासून पाहिले. हे असे खेळीमेळीचे, सहानुभूतीपूर्वक आणि सौहार्दतेचे वातावरण समाजात असणे हे समाज विकसनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. इंदिरा गांधींच्या आणीबाणीचा काळ सोडल्यास पत्रकारितेवर




कोणत्याही प्रकारचे निर्बंध नव्हते. समाजामध्ये अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असणे आणि सामाजिक संघटनांना लढा उभारण्याचे स्वातंत्र्य असणे यातून उद्याच्या मांगल्य पूर्ण पहाटेची सुरुवात असते असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आज समाज म्हणून आपण एवढे विखुरलेले आणि ताठर झालेलो आहोत की, एखाद्या गावात परंपरेने चालत आलेली कीर्तन परंपरा चालू असेल तर त्या कीर्तनासाठी कोणत्या समाजाचा महाराज बोलवायचा याचेही नियोजन केले जात आहे आणि हे अतिशय दुर्दैवी आहे. खरे तर विविधता हे भारताचे मुलगामी सौंदर्य आहे. त्या सौंदर्याला कोठेतरी बाधा पोहोचवण्याचे कार्य आपल्या हातून कळत नकळतपणे होत असल्यास आपण स्वतःला वेळीच सावरले पाहिजे सावध झाले पाहिजे कारण जीवन जगत असताना आपण ते एकट्याने जगू शकत नाही, हे सार्वकालिक सत्य आहे. आधुनिक शिक्षण महाग झाले म्हणून आपल्या पाल्यास धार्मिक शिक्षण देऊन येणाऱ्या काळाशी आपण समर्थपणे झगडू शकणार नाहीत. उलट यातून एकप्रकारची कट्टरता, ताठरपणा वाढीस लागेल, हे समजून घ्यावे लागेल. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# सत्य जाणण्याची उत्सुकता प्रत्येकाला



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सत्य हेच जगातील अंतिम शाश्वत जीवन मुल्य आहे. ज्याची गोडी प्रत्येकाला आहे पण सत्य जगताना अंनत अडचणी निर्माण होतात म्हणून सत्य जाणून ते जगण्याची मानसिकता फार कमी लोकांकडे आहे. सत्य जाणून घेण्याची जिज्ञासा मात्र प्रत्येकाला असते. सत्याची गोडी नाही शोध नाही, सोबतच सत्य मार्गावर जगण्याची इच्छा नाही असे चुकुन पण शोधुन कोणीही सापडणार नाही.पण खरी गडबड होते ती वास्तविक दैनंदिन जीवनात आचरण करताना सत्य मार्गावर टिकून राहण्याचा सत्य मार्गावर आपण असताना आपला मार्ग कधी मार्ग बदलतो तेच बहुतांश वेळा आपल्याला कळत नाही. सत्य ही अशी अनुभूती आहे कि त्याचा शोध प्रत्येकाला आहे.**


सत्याचा शोध नाही असं कोणीही चुकुन सुद्धा भुमंडळावर नाही. पण खरं वास्तव असं आहे की सत्य मार्गावर कोणीही जगु इच्छित नाही. म्हणजे खुप कमी लोक या मार्गावर मार्गक्रमण करतात. त्याच कारण ही तसंच आहे सत्य जाण्यासाठी कठिण असत. प्रत्येकाला उत्सुक असते खरी पण सत्य पचायला जड जातं. म्हणून ते कोणीही जगु इच्छित नाही.हिच कलयुगातील सगळ्यात मोठी घडामोड आहे. सत्य हे कटु असतं कठिण असतं पिडादायक असतं असं जरी प्रथम दर्शनी वाटत असलं तरी अंतिमतः सत्य हे शेवटी प्रभावी व गुणकारी आनंददायी ठरत असत.सत्याचा शोध आणि सत्याची भूक हि प्रत्येकाला आहेच. त्या मध्ये एतकिंचित सुद्धा शंका नाही. पण सत्य मार्ग सुरुवात हि कठिण असते. याच कठिण मार्गाला टाळुन लोक असत्य मार्ग शोधतात. आणि सत्याची अभिव्यक्ती होण्याची संधी दवडतात. ज्ञान तत्त्वज्ञान कोणतही असो कोणत्याही धर्माचा असो या सर्व तत्वज्ञान ज्ञानाचा पाया सत्य हाच आहे. मग जर ज्ञानाचा पाया सत्य असेल तर आपल्या जीवनाचा



पाया सत्य का नसावा. तो असलाच पाहिजे. पण कृती करताना आपली गडबड होते. आपण तिथंच गोंधळून जातो. सत्याचा शोध आपल्याला नाही असं अजिबात नाही. पण आचरण करताना आपली खरी गडबड होऊन आपला मुख्य घोळ होतो. शाश्वत जीवन जगताना सत्य हेच जीवनातील सर्व श्रेष्ठ अभुषण असतं.म्हणजे प्रत्येक पाऊल सत्यनिष्ठ असल पाहिजे.पण दैनंदिन बदलती जीवनशैली आणि भौतिक जीवनातील प्रभाव यामुळे सध्या जीवनात अनंत अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. विज्ञान युगाचा प्रभाव दैनंदिन होणारे बदल हे व्यसन झालं आहे. या व्यसनाच्या आहारी जाऊन आपण धावत आहेत. किती धावतोय कुठपर्यंत किती धावणार याला काही मर्यादा आहे का या धावण्याच्या स्पर्धेत शर्यतीत आपण कधी स्वतःला हरवुन घेतो तेच आपल्याला कळत नाही. आणि नेमकं याच वेळी याच दरम्यान आपला सत्याचा मार्ग हरवतो. सुखाचा शोध घेण्याच्या नादात आपण कधी असत्याचा मार्ग स्वीकारला हे पण उमजत नाही. पण वास्तविक सुख हे सत्याच्या मार्गावरच आहे .पण ते कळत नाही आणि ते लोकांना दाखवता देखील येत नाही.उपभोगण्यासाठी नाही तर दाखविण्यासाठी उतावीळ असतो. पण सत्य हे आत्मिक समाधान असल्याने ते दाखविता येत नाही. त्याची अनुभूती घेता येते. सत्याची प्रतिष्ठापना करण्यासाठी वेळोवेळी या सृष्टी वर अनेक संत महंत यांनी अवतार धारण करून लोकांना सत्याचा बोध करून दिला सत्य मार्गाचा परिचय करून दिला परंतु सर्व सामान्य माणसाला जीवाला सत्याचा मार्ग आचरण कारणासाठी कठिण जातो.हे जरी वास्तव असलं तरी हाच मार्ग खात्रीशीर आहे. जीवनाचं सार्थक घडविणारा आहे. हे समजण गरजेचं आहे म्हणजे सत्य जाण्याची जशी उत्सुकता आहे तसीच सत्य जगण्याची इच्छा निर्माण होईल. असत्याच्या मृगजळामागे लागण्यापेक्षा सत्य हे कधीही लाभकारी गुणकारी असत आणि याच सत्याची कास धरण्यासाठी आपला जन्म झालेला आहे पण आपण आपल्या जन्माच मुख्य हितच विसरून जातो आणि जे क्षणिक आहे भ्रमक आहे ते स्वीकारतो. शेवटी सत्य जेव्हा उमजते तेव्हा आपल्याकडं वेळ नसतो. ही व्यथा टाळण्यासाठी योग्य वेळी सत्याची जिज्ञासा आणि सत्य जगण्याची उमेद इच्छा शक्ती कृतीशील पुर्ण झाली पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# आता लाचखोर खासदार, आमदारांना बेड्या

रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १० मार्च २०२४

आधुनिक केसरी

**देशातील राजकारण म्हणजे समाजकारण नाही, तो आता व्यवसाय बनलेला आहे. राजकीय नेते 'पैश्यातून सत्ता' व सत्तेतून पैसा' या सूत्राचा वापर करत आहेत. लोकप्रतिनिधीच मत देण्यासाठी, बोलणे आणि प्रश्न विचारण्यासाठी सर्रासपणे लाच घेत आहेत. पण सर्वोच्च न्यायालयाने निकालामुळे खासदार व आमदाराविरुध्द आता लाचखोरीचा कारवाई केली जाईल. त्यांना विशेषाधिकाराचे संरक्षण मिळणार नाही. यामुळे देशातील गढूळ राजकारण स्वच्छ होण्यास मदत होणार आहे.**

लोकशाहीत लोकप्रतिनिधी व प्रशासन ही दोन महत्वाची चाके आहेत. राजकारण हे समाजसेवेचे माध्यम आहे.पण तो व्यवसाय बनला आहे. राजकारण केवळ निवडणूक लढविण्यापूरत मर्यादीत नाही. देशात राजकीय पक्षाची बांधणी विशिष्ठ विचारातून केली जाते! त्याच विचार- सरणीवर पक्ष निवडणूक लढवित असतो. यातून पक्षाला सरकार स्थापन करण्याची संधी मिळते.राजकारणात नैतिकतेला महत्व आहे. मतदार हे लोकप्रतिनिधी निवडून देतात, व विश्वस्त म्हणून देशाची व राज्याची सत्ता हातात देतात. या सत्तेचा उपयोग जनतेच्या हितासाठी केला पाहिजे. पण सत्तेची नशा डोक्यात जाते व जनतेचा विसर पडतो. आज देशातील ५७ प्रादेशिक पक्ष एकाच कुटुंबाच्या मालकीचे आहेत. या पक्षात कुंटुबातील सदस्यांना सहज लोकसभा व विधानसभेची उमेदवारी मिळते, सत्तेचा लाभही मिळतो.हे कुटुंब सत्तेची मलई खाऊन कोट्यधीश बनत चालले आहेत. सामान्य कार्यकर्त्यांना सहज पक्षाची उमेदवारी मिळत नाही. पक्ष एका कुटुंबाच्या मालकीचे असणे, हेच लोकशाहीसाठी धोकादायक आहे. यात राष्ट्रीय पक्ष असलेल्या काँग्रेस पक्षात एका गांधी कुटुंबाचे वर्चस्व असून त्यांचे निर्णय आदेश मानले जातात. राहुल गांधी आमची भाजपाच्या विचाराशी लढाई आहे, असे सांगतात. पण यांना पक्षाची विचारसरणी माहित आहे काय? काँग्रेसची ध्येयवादी, निः स्वार्थी, सेवाभावी पंरपरा होती, ती आता खंडित झाली आहे. काँग्रसचे धर्मकारण सर्वधर्म समभाव, राजकारणात लोकशाही, अर्थकारणात सहकार आणि समाजवाद, समाजकारणात रचनात्मक सेवाकार्य हे ध्येय होते. पण काँग्रेसने या ध्येयापासून दूर गेलेला आहे,तो भरकटत चालला आहे. आज काँग्रेसला राष्ट्रहितापेक्षा पक्ष व गांधी परिवार महत्वाचा वाटतो. नेत्यांना राजकारण करत असताना ८० टक्के समाजकारणावर २० टक्के राजकारणावर भर दिला पाहिजे अशीच अपेक्षा आहे. काँग्रेस तीन सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत हे तत्व पाळले. कारण काँग्रेस पक्षातील नेत्यावर गांधी विचाराचा प्रभाव होता. महात्मा गांधीजींच्या मृत्यूनंतर काँग्रेसने त्यांच्या आदर्श विचाराला तिलांजली दिली. याच गांधीवादी विचारांनी नेत्यांनी १९४८ मध्ये ब्राह्मण हत्याकांड घडविले. या काँग्रेस परिवारवाद, एकाधिकारशाही आली, तो भ्रष्टाचारात गुंतला गेला. आज राजकारणातून 'नैतिकता' हा शब्द हद्दपार झाला आहे. यात भाजपा सुटलेला नाही. पण दगडापेक्षा तरी वीट बरी! भाजपाने धोरणात बदल केला. या पक्षाने गांधी व डॉ. आंबेडकरांना विचार स्विकारले आहेत. तो देशाची संस्कृती, परंपरा राष्ट्रहित, विकास, गरीब, शेतकरी, महिला, तरुणांसाठी विविध योजना हाती घेत आहे. आज देशाची अर्थ व्यवस्था मजबूत होत आहे, ही जमेची बाजू आहे. जगावर करोनाचे संकट आले असतानाही भारताची अर्थव्यवस्था ढासळू दिली नाही.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

भारतात महागाई नियंत्रणात ठेवली. देशाची वेगाने प्रगती होत आहे. हे मान्य केले पाहिजे. काँग्रेस राजवटीत देशात कासवगतीने विकास झाला. त्यावेळी बेरोगगारी व महागाईने कळस गाठला होता. प्रचंड गरीबी होती. काँग्रेसने ५५ वर्षे देशाची सत्ता होती, हेया सरकारने काय केले? हे विचारायचे नाही काय? भारताबरोबर स्वंतत्र झालेले राष्ट्र प्रगत झाले आहेत. काँग्रेस सरकारने पक्ष बेकारी,महागाई गरीबी कमी करु शकली नाही. आज २५ कोटी लोक गरिबीच्या रेषेच्यावर आले आहेत! काँग्रेस पक्ष सवंग घोषणा करुन निवडणूका जिंकत आला आहे. देश भ्रष्टाचाराने पोखरला जाऊ लागला तरी पक्षाला याची चिंता वाटली नाही. २०१४ ची सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचा भ्रष्टाचाराच्या या मुद्दावर पराभव झाला आहे. जगात भारतातील निवडणूक सर्वात महागडी निवडणूक समजली जाते. सेंटर ऑफ मीडीया स्टडीजने अहवालात २०१९ लोकसभा निवडणुकीत सुमारे ६० हजार कोटी रुपये खर्च झाल्याचा अंदाज व्यक्त केला गेला. प्रति मत ७०० रुपये खर्च करण्यात आला.तर २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ३० हजार कोटी रुपयांचा खर्च झाल्याचा अंदाज व्यक्त केला गेला होता निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चाच्या मर्यादेत वाढ केली आहे. लोकसभेसाठी ९५ लाख व विधानसभेसाठी ४० लाख रुपये केली आहे. म्हणजे सामान्य माणूस निवडण्याचा विचारही करू शकत नाही. मोदी व भाजपा सरकारने 'एक राष्ट्र व एक निवडणूक' या उद्देशाने माजी राष्ट्रपती रामनाथ गोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन केले. या समितीने अहवालनुसार

निवडणूक सुधारणावर भर दिला नाही. त्यामुळे संसदेत सदस्य लाच घेत असल्याचे गंभीर घटना घडत आहेत.

मोदी सरकारने राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या विरोधात मोहिम सुरू केली. त्यामुळे ईडी व सी. बी.आय.तपास यंत्रणेचा विरोध केला जात आहे. महाराष्ट्राच्या राज्य सहकारी बँकेत २५ हजार कोटीचा घोटाळा झाला. या प्रकरणात शरद पवारांचे नातू आ.रोहित पवार यांची ईडीने ५० कोटीची मालमत्तेवर टाच आणली गेली. रोहित यांचे वय लक्षात घेता त्यांच्या कोट्यवधी रूपायांच्या उत्पन्नाचे स्त्रोत्र काय आहे? शरद पवारांनी तर पक्षातील नेत्यांना भ्रष्टाचाराबाबत संरक्षण देत आले,ते निष्लकलंक आहेत, असे ठरवित आले आहेत. दुसरे नेते केजरीवाल हे तर काँग्रेस सर्वात भ्रष्टाचारी पक्ष मानत होता, त्यांनी भ्रष्ट राजकीय नेत्यांनी यादी तयार केली होती. या नेत्यांची चौकशी न करता जेलमध्ये टाकले पाहिजे अशी मागणी करत होते. आता त्यांची राजकारणात आल्यानंतर भूमिका बदलल्या आहेत! केजरीवालचा आम आदमी पक्ष काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसला आहे. भारतीय राजकारणातील सर्वात लबाड नेता म्हणजे भाजपा त्यांचेवर टीका करतोय! देशात भ्रष्टाचार प्रकरणात ९० टक्के विरोधी पक्ष नेते सापडले आहेत. हे नेते ईडीच्या विरोधात न्यायालयात का जात नाहीत? मोदी सरकारने ईडी बाबत हस्तक्षेप करून या भ्रष्ट नेत्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा आहे. सामान्य माणसावर राज्याचे पोलिस कारवाई करतात! त्यांना नेते न्यायासाठी न्यायालयात सांगतात!

**काँग्रेस पक्षाला बहुमत मिळणार नाहीये !** : 'इंडी'आघाडीच्या अजेंड्यावर भ्रष्टाचार हा विषयच नाही .केवळ मोदींना सत्तेतून घालविणे,हाच एकमेव कार्यक्रम आहे .यासाठी भ्रष्ट परिवारवादी पक्ष संघटीत झाला आहे .यात काँग्रेस पक्षाने आघाडी करून स्वत : च्या पायावर कुऱ्हाड मारुन घेतली आहे .त्यामुळे येत्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळणार नाही, राहुल गांधी पंतप्रधान होणार नाहीत, ही काळ्या दगडावरची रेघ आहे .

**लोकप्रतिनिधींना वेतन व सवलती का ?** : देशातील राजकीय नेत्यांची प्रत्येक निवडणुकीत संपत्तीत वाढत चालली आहे . याबाबत सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली आहे . खर तर ! मोदी सरकारने खासदार व आमदारांचे वेतन, निवृत्ती वेतन व सवलती बंद केल्या पाहिजेत . लोकप्रतिनीधींना कोणत्या निकषावर आधारावर वेतन व सवलती दिल्या जातात ! हा प्रकार म्हणजे, दिवसाढवळ्या देशाची व राज्याची तिजोरी लुटणे नव्हे काय ? याची आपणाला चीड येत नाही .

२०२९ पासून लोकसभा व विधानसभा निवडणूका घेता येवू शकतात,असे सांगितले गेले आहे. देशात १९६९ पर्यंत एकत्रित निवडणूका घेण्यात आल्या आहेत. पण काँग्रेससह विरोधी पक्ष एकत्रित निवडणुकीला विरोध करत आहेत, याचा"लोकशाही धोका' असे म्हणत ेत. देशात १९५२ पासून निवडणूकीची पध्दत व र्च सुधारणा याबाबत वांचू समिती (१९७०) गोस्वामी समिती (१९९०) बोहरा समिती (१९९३) अहवालात विविध शिफारशी केल्या आहेत. तर १९९४ कायदा आयोगाच्या १७० व्या अहवालाच्या शिफारशीत एखाद्या उमेदवाराच्या विरोधात न्यायालयात आरोप



निश्चित झाला की, त्यास उमेदवारास निवडणूक लढविण्यास मनाई करण्याची शिफारस केली होती काँग्रेस सरकारने

सद्या प्रा. जी.एन. साईबाबा यांची न्यायालयाने मुक्तता केली आहे. यावर सरकारला घेरले जात आहे. पण१९९४ मध्ये इस्त्रोचे प्रसिध्द शास्त्रज्ञ नंबी नारायण यांचा हेरगिरीच्या प्रकरणावरुन छळ केळा. ते निर्दोष होईपर्यंत न्यायिलयात लढले! हे विव्दान पत्रकार विसरले काय? ईडीबाबत विरोधी पक्ष मोदी सरकारवर दबाबतंत्र वापरत करत आहे.

देशाचे नेते स्व शंकरराव चव्हाण हे राज्याचे मुख्यमंत्री असताना आमदार वरिष्ठ बदल्यासाठी अधिक शिफारशी करतात,यावर नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी सामाजिक प्रश्नावर भर दिला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते त्यामुळे आमदारांना ते नको वाटायचे! आता प्रत्येक विकास निधीत लोकप्रतिनीधींचे कमीशन चाळीस टक्के ठरलेले आहे. अनेक कंत्राटदार हे लोकप्रतिनिधींच्या ठेवणीतले असतात. या कमीशनखोरीमुळे राज्यात विकासाची कामे निष्कृष्ट दर्जाची होतात, हे लोकांच्या लक्षात येत नाही. नांदेडच्या बांधकाम विभागात कमीशनखोरी खुलेआम चालू आहे. यावर आमदार मूग गिळून का गप्प आहेत? याचे कारण लोकप्रतिनिधी व प्रशासनाची साठगाठ आहे. लोकप्रतिनिधींच्या शिफारशीची माहिती घेतली तर राज्यात अब्जावधी रुपायांचा घोटाळा उजेडात येईल! राज्यात शिंदे सरकारने नांदेड उत्तर विभागाच्या १५०० कोटी रुपयांचा निधी दिला म्हणे! यात कोणाचे 'कल्याण'झाले, हे पहा! महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस सरकार संवेदनशील सरकार असल्याचे सांगितले जाते. मग हळदा (ता कंधार) अल्पभूधारक शेतकरी वामन भालेराव यांना २०१७ पासून न्याय देता आलेला नाही. यात जिल्हा प्रशासन व शासन बहिरे झाले. राज्य शासनाच्या योजना गरिबांच्यादारापर्यंत पोहचत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

राज्य घटनेच्या अनुच्छेद १०५ आणि १९४ नुसार खासदार व आमदार विशेषाधिकार आहेत. त्यामुळे लोकप्रतिनीधींवर कारवाई केली जात नसे देशाच्या सर्वोच्च सभागृहात १९९३ मध्ये काँग्रेसचे तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांचेविरोधात अविश्वासाचा प्रस्ताव आणला होता. यावेळी 'पैश्याच्या मोबदल्यात मत हे' लाचकांड घडले. तेव्हा सरकारच्या बाजूने २४४ संसद असताना सरकारच्या बाजूने २६५ मते पडले. विरोधी पक्षाकडे २५५ सदस्य होते. तरी सरकारने ठराव जिंकला. तेव्हा क्रॉस वोटींग झाल्याचे निर्दशनास आले. तेव्हा अजितसिंह व झामुयोचे शिबू सोरेन यांचे २४ सदस्यांना सरकारच्या बाजूने मत देण्यासाठी प्रत्येकी ४० लाख रुपये देण्याची ऑफर दिली होती. तेव्हा झामुयोचे सदस्य शैलेंद्र महतो यांनी सी.बी.आय.ला सांगितले की, धर्मगुरू चंद्रास्वामी व केंद्रीय मंत्री शर्मा यांना ३ कोटी रुपये देण्यात आले होते. ते सदस्यांना वाटण्यात आले. यात सी.बी. आय.ने झामूयो'च्या ५ सदस्याच्या विरोधात खटला दाखल केला होता. या खटल्यात १९९८ मध्ये पाच सदस्य खंडपीठाने, लोकप्रतिनीधींना विशेषाधिकारामुळे संरक्षण असल्याचा निकाल दिला. याचा आधार घेत सासरे शिबू सोरेन यांचे पावलावर पाऊल टाकत सून सीता सोरेन यांचेवर २०१२ मध्ये राज्यसभा निवडणुकीत मतदानासाठी लाच घेतल्याचा आरोप आहे.तीने १९९८ निकालाचा आधार घेत या आपणाला संरक्षण मिळावे व खटला रद्द करावा,या मागणी उच्च न्यायालायात केली होती. न्यायालयाने २०१४ मध्ये हा दावा फेटाळला होता. त्या सर्वोच्च न्यायालयात गेल्या होत्या. यात सात सदस्यीय खंडपीठाने १९९८ मध्ये झारखंड मुक्ती मोर्चा सदस्यांना लाचखोर प्रकरणात संरक्षण देण्यात आलेला निकाल रद्द केला. याच "झामुमो'चे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना भ्रष्टाचार प्रकरणात नुकतीच ईडीने अटक केली असून ते जेलची हवा खात आहेत. सारे भ्रष्ट सरकारचे काँग्रेसने समर्थन करतो आहे. बिहार 'राजद" पक्षाचे नेते लालू प्रसाद यांना चारा घोटाळ्यात शिक्षा झाली आहे. राहुल गांधी त्यांचे समर्थन घेत आहे.तसेच २००८ मध्ये कलंकित करणारी दुसरी घटना, काँग्रेसचे माजी पंतप्रधान मनमोहनसिंग सरकारने अमेरिकेसोबत परमाणू समझोता केला होता. या विषयावरुन सरकार विरोधात विरोधी पक्षाने अविश्वास प्रस्ताव आणला होता. यावेळी ससदेच्या सभागृहात भाजपाचे तीन खासदार अशोक अर्गल,फग्गनसिंह कुलथे यांनी एक हजार रूपायांचे बंडल टेबलावर ठेवल्या. या नोटा काँग्रेस सरकारने ठरावाच्या बाजूने मत करण्यासाठी लाच म्हणून दिल्याचा आरोप केला. या प्रकाराने देशाच्या सर्वोच्च संसदीय सभागृहाची शरमेने मान झुकली. लोकसभेचे अध्यक्ष माकपचे नेते सोमनाथ चटर्जी होते, तेही आवाक् झाले! ही घटना देशाने पाहिली आहे. तृणमूल काँग्रसचे सदस्या महुआ मोईत्रांचे प्रश्न विचारण्या- साठी पैसे घेतल्याचे प्रकरण गाजले. संसदेच्या नीती समितीने त्यांना दोषी ठरविले यांचेवर ठपका ठेवला. त्यानुसार संसदेने त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले काँग्रेससह विरोधी पक्षाने तिचे समर्थन केले.तसेच आम आदमी पक्षाचे सदस्य मोहिंदर गोयल यांनी भरती प्रकरणातआपणाला लाच देण्यात आल्याचे सांगितले १५ लाखांचे नोटांचे बंडल दिल्लीच्या विधानसभेत दाखविले होते.या संसद व विधानसभेतील सदस्यांना लाच देण्याच्या घटना घडल्या आहेत! पण त्यांच्या विरोधात कारवाई झालेली दिसत नाही.

काँग्रेस पक्ष देशातील भ्रष्टाचार विषयाकडे गांभीर्याने पहात नाही. कारण गांधी कुटुंब भ्रष्टाचाराच्या चिखलात फसला आहे.उलट काँग्रेस पक्ष हा भ्रष्टाचाराचे समर्थन करतो आहे,याची त्यांना लाज वाटत नाही. नेते लालू यादव यांनी तर मोदी यांना परिवार नाही,अशी वैयक्तिक टिप्पणी केली. पण प्रत्येक माणसाचा जन्म परिवारातच होत असतो,याचे सामान्य ज्ञान लालूंना नाही परिवार म्हणजे आई, वडील, भाऊ व बहिण अशी व्याख्या आहे.पण लालूंचा परिवार वंशपंरेनुसार "राजद' पक्षाची गादी साभांळत आहेत,ते लोकशाहीत बसते काय?लालूंची ही टिप्पणी इंडी आघाडीला महाग पडणार आहे! यावरुन सामान्य माणूस व तरुण 'मोदी चा परिवार, या घोषवाक्याने जोडला जात आहे. आता विरोधी पक्ष मोदींवर खालच्या स्तरावर जाऊन वैयक्तीक टीका करत आहे.खडगे यांनी "मोदींचे टी.व्ही वर छायाचित्र आले की द्रारिद्र्य येते' असे खालच्यापातळीवर टीका केली. खडगे गल्लीतले नेते नाहीत, गांधी परिवाराला खूष करण्यासाठी अशी भाषा वापरत असावेत! ते पक्षाचे राष्ट्रीय नेते आहेत! याचे त्यांनी भान ठेवायला हवे! राजकारणात अशी टीका मुळीच शोभणारी नाही. अश्या टीकामुळे काँग्रेसला आनंद होत असला, तरी देशातील सुज्ञ मतदार ते पसंत करणार नाही.यातून विरोधी पक्षाचे नुकसान होईल. निवडणुक आयोगाने तर राहुल गांधी यांना तर पंतप्रधानपदाविषयी बोलतांना भाषेची मर्यादा पाळली पाहिजे, असा सल्ला दिला आहे. माजी अर्थमंत्री जेटली यांनी २०१७राजकीय पक्षाला देणगी घेण्याच्या उद्देशाने बँकेमार्फत रोखे खरेदी कायदा आणला तो कायदा सर्वोच्च न्यायालयाने नुकताच अवैध ठरविला आहे.याचे काँग्रेसने भांडवल करत भाजपावर भ्रष्टाचाराचा आरोप केला.पण हा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी काँग्रेस पक्ष उद्योगपतींकडून अंधारात देणग्या घेत होताच ना? काँग्रेस सरकारने तेल रोखे काढून देशात कर्जात ढकलेले! तेंव्हा गँस अनुदानाचा फायदा कोणाला झाला? हे मात्र गुपीत ठेवले जात आहे. आता खासदार व आमदारांना लाचखोरीबाबत संरक्षण मिळणार नाही. भविष्यात अशा लोकप्रतिनिधीवर कारवाईचा केली जाईल, त्यांना बेड्या पडतील, जेलची हवा खावी लागेल! पण निकालाच्या निमित्ताने झारखंड राज्यातील भ्रष्ट सोरेन कुटुंब, तसेच झामुमो' व काँग्रेस सरकारच्या लाचखोरी व्यवहारांचे पितळ उघडे पडले आहे.

मांडणी व सजावट
अतुल ह. खंडगावकर

# समस्यांच्या चक्रव्यूहात शहबाज शरीफ




डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**पाकिस्तानचे नवे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी सोमवारी पंतप्रधानपदाची शपथ घेतली आणि देशाला स्थिरता व ऐक्याच्या दिशेने नेण्यासाठी काम करण्याचे अभिवचन दिले. आत्तापर्यंतच्या इतिहासात ते पाकिस्तानचे २४वे पंतप्रधान आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की, एकाही पंतप्रधानाने आत्तापर्यंत पाच वर्षांचा कालवधी पूर्ण केलेला नाही, हे कटू सत्य आहे. त्यामुळे अस्थिरतेच्या भोवऱ्यात सापडलेल्या पाकिस्तानचे भवितव्य काय, असा प्रश्न पडतो. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर केलेल्या भाषणात आपण देशाचे नशीब बदलू अशी घोषणा त्यांनी केली असली तरी, खरोखर आर्थिक अडचणीत सापडलेल्या पाकिस्तानचे प्रारब्ध बदलण्यात शेहबाज शरीफ किती यशस्वी होतील याबद्दल शंकाच वाटू लागते. मागील महिन्यात ८ फेब्रुवारी रोजी तेथे झालेल्या निवडणुकीनंतर अस्थिरतेचे कितीतरी ढग जमले आणि त्यांना टीका टिप्पणी व नामुश्कीला सामोरे जावे लागले. पाकिस्तानमधील बेगडी लोकशाही प्रणालीचे लोकांनी वाभाडे काढले.**

हिंसाचार, मतदानाच्या वेळी झालेले गैरप्रकार यामुळे ही निवडणुक खूप गाजली. विरोधी पक्षनेते इम्रान खान यांनी तर या विजयी पक्षाचे वर्णन जनादेश चोर अशा शब्दात केले. शेवटी राजकारणाच्या आखाड्यात जे व्हावयाचे ते झाले. सत्ताधारी शरीफ महोदयांनी पाकिस्तान पीपल्स पार्टीबरोबर घरोबा करून सत्तापद ग्रहण केले आणि आता त्यांच्या दुसऱ्या कारकीर्दीला प्रारंभ झालेला आहे.

गणित कसे बदलले? पाकिस्तान मुस्लिम लीग या पक्षाला जेमतेम ६७ जागा मिळाल्या होत्या. इम्रान खान यांच्या पीटीआय या पक्षाने ३६६ पैकी ९२ जागा मिळविल्या होत्या आणि पक्ष पहिल्या क्रमांकावर राहिला. परंतु ते मित्र पक्षाकडून सत्ता प्राप्तीसाठी पुरेसे संख्याबळ जोडू शकले नाहीत. शेहबाज शरीफ यांनी मात्र पाकिस्तान पीपल्स पार्टीला आपल्याकडे वळविले. तसेच छोटे-मोठे दोन तीन पक्षही आपल्याकडे घेतले. त्यांच्या पक्षाला फक्त ६९ जागांचे समर्थन मिळाले होते. परंतु मित्र पक्षाच्या सहकार्याने त्यांनी हा आकडा २०१ पर्यंत नेला. त्यामुळे सत्तेची माळ त्यांच्या गळ्यात पडली आणि ते पंतप्रधान पदावर रूजू झाले आहेत. परंतु बेरजेच्या राजकारणात संख्येचे गणित बदलण्यात ते यशस्वी झाले. त्यांनी पीटीआयचे उमेदवार अमर आयुब खान यांचा पराभव केला. पण येणारा काळ अधिक संकटमय आहे, अधिक कंटकमय आहे आणि तेवढाच अडथळ्यांनी भरलेला आहे. नव्या पंतप्रधानापुढे सर्वात मोठे संकट कोणते असेल तर ते आर्थिक संकट आहे. चलन फुगवटा, वाढती महागाई, अस्थिरता, मंदीची टांगती तलवार यामुळे पाकिस्तानी अर्थव्यवस्थेची वाट लागली आहे. ही घडी कशी बसवणार हा खरा प्रश्न आहे. त्यांना पंजाबचे मुख्यमंत्री म्हणून तीन वेळा कामाचा अनुभव आहे. त्यांचे मित्र त्यांना वर्कोहोलिक म्हणजे कामावर प्रेम करणारे असे म्हणतात. पंजाबचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य प्रशासनाला नवी दिशा देणारे होते असे म्हटले जाते. असे असले तरीदेखील, ह्या वर्तमानकाळात पाकिस्तानमधील अस्थिरता आणि संकटांची मालिका पाहता, त्यातून ते कसे बाहेर पडतील हा खरा प्रश्न आहे. यशासारखे दुसरे यश नाही असे म्हटले जाते पण अपयशासारखे दुसरे अपयशही नसते. अपयशामुळे माणूस खचून जातो. पक्षही गडबडतात, आणि देशही संकटात सापडतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पाकिस्तानचे नशीब होय. तेव्हा शहबाज शरीफ हे पाकिस्तानच्या बदमाशांना कसे नियंत्रणात ठेवतील का त्यांनाही गटांगळ्या खाव्या लागतील हे आज सांगता येणार नाही. आपण देशाचे चित्र बदलू असे ते म्हणत असले तरी देखील त्यांना सगळ्यात मोठ्या संकटाचा सामना करावा लागणार आहे तो आय. एम. एफ बरोबरचा करार नव्याने कृतीमध्ये आणण्याचा. आंतरराष्ट्रीय नाणे निधी या संघटनेकडून बेल आऊट पद्धतीने कर्ज कसे मिळवायचे हा डोकेदुखीचा प्रश्न बनला आहे. या अगोदर २०२२ साली पाकिस्तान आर्थिक वादळात सापडला असताना आय. एम. एफ. ने त्यांना असेच वाचविले होते. परंतु यावेळी परिस्थिती गंभीर आहे. परदेशी व्यापार चालू ठेवण्यासाठी पाकला २२ बिलियन डॉलर्सची गरज आहे. खरे तर, या पूर्वीच त्यांनी बेल आऊट एकदा घेतले आहे. आता त्यांना बेल आऊट कर्ज घेऊन पाकिस्तानच्या अर्थकारणाचा चिखलात रुतलेला गाडा पुढे मार्गस्थ करावयाचा आहे. हे सगळ्यात मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. त्यांना यू.ए.ई., चीन, सौदी अरब या देशांकडून मदत होत असते. अलिकडे चीनने मागील कर्जाचा डोंगर असला तरी आणखी ९ बिलियन डॉलरचे कर्ज देण्यासाठी होकार दिला आहे. बुडत्याचा पाय खोलात या न्यायाने पाकिस्तान या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करत आहे. परंतु प्रतिकूलता एवढी भयंकर आहे आणि वास्तव इतके कठोर आहे की, कोणतेही सोंग घेऊन हे प्रश्न सुटणारे नाहीत. अर्थकारणात नवचैतन्य कसे आणावयाचे हा मोठा प्रश्न आहे. भारताची अर्थव्यवस्था ३. ७ ट्रिलीयन डॉलर एवढी आहे. तुलनाच केली तर, पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थापेक्षा भारताची अर्थव्यवस्था दसपटीने मोठी आहे. माजी पंतप्रधान नरसिंहराव यांच्या काळात भारताने ज्या पद्धतीने आर्थिक सुधारणा केल्या, उदारीकरणाचा वेध घेतला, गेल्या १० वर्षात नरेंद्रभाई मोदी यांच्या काळात भारताच्या अर्थव्यवस्थेने मोठी झेप घेतली आणि भारत जगात ११ व्या क्रमांकावरून ५ व्या क्रमांकावर पोहोचला आहे. २५० वर्षे अखंड भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांनाही मागे टाकले आणि भारत जगामध्ये पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून पुढे सरसावत आहे आणि लवकरच तिसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेवर पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. पाकिस्तानचे मात्र हे रेंगाळणे एखाद्या ढ विद्यार्थ्यासारखे आहे. त्याच त्या चुका करत पाकिस्तान अर्थकारणात काही धडे घेत नाही. आता हे २४वे पंतप्रधान पाकच्या अर्थव्यवस्थेची घडी कशी लावतील आणि संकटातून आणि वादळातून देशाला कसे बाहेर काढतील हा खरा प्रश्न आहे. क्रिकेटपटू तर बाद झाले. त्यांना तुरुंगाची हवा खावी लागली आणि आता पंजाबचा हा मुख्यमंत्री काय चमत्कार घडवणार असा प्रश्न विचारला जात आहे. वॉशिंग्टन स्पोर्ट्ससारख्या नियतकालिकाने असो किंवा जगातील मिंट, गार्डीयनसारख्या अनेक वृत्तपत्रांनी असो त्यांच्या भावी कामगिरीबद्दल चिंता व्यक्त केली आहे आणि अनेक प्रश्नही उभे केले आहेत.**कामगिरीच्या अपेक्षा**: ७२ व्या वर्षात पदार्पण केलेले पंतप्रधान शेहबाज शरीफ हे लाहोरच्या विद्यापीठातील संलग्न कला महाविद्यालयातून पदवीधर (बी.ए.) झालेले आहेत. ते लाहोर चेंबर ऑफ कॉमर्स अध्यक्षही होते. स्टील उद्योगात त्यांचा मोठा दबदबा आहे. त्यांच्या बंधूकडून त्यांनी राजकारणाचा वसा घेतला आणि त्यांच्यावर जेव्हा गंडांतर आले तेव्हा त्यांनी पी. एम. एल. ची धुराही वाहिली. काही काळ तेही निर्वासित झाले होते. त्यांनाही अटक झाली होती. परंतु हे सगळे पाकिस्तानच्या राजकारणी लोकांना करावे लागते ते सारे त्यांनी केले आहे. परंतु आता या उद्योगपतीला पंजाबच्या राजकारणापेक्षा देशाचे राजकारण हाताळावयाचे आहे. तिकडे त्यांचे पूर्वी मित्र असलेले तालिबान आता त्यांच्या विरोधात उभे आहेत. इराणचेही आव्हान त्यांच्या समोर उभे आहे. भारताशी त्यांचे संबंध फारसे प्रेमाचे नाहीत. शिवाय सौदी अरेबिया आणि यु. ए. ई. हे त्यांचे मित्र आता त्यांच्यापेक्षाही जास्त भारतावर भरवसा करत आहेत. अशा परिस्थितीतून चीन आणि अमेरिकेबरोबर चांगले संबंध कसे समतोल स्वरूपात ठेवता येतील असे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर उभे आहेत. या सर्व यक्ष प्रश्नांपैकी पहिला आणि कळीचा यक्ष प्रश्न हा आर्थिक प्रश्न आहे. दुसऱ्या क्रमांकाचा प्रश्न आहे तो आंतरराष्ट्रीय राजकारणात पाकिस्तानची विस्कटलेली घडी सुधारणे आणि पाकिस्तानचे हरवलेले स्थान पुन्हा मिळवून देणे, अशी त्यांच्यापुढे दुहेरी आव्हाने आहेत. खरेतर, पाकिस्तानने आपली पत एवढी गमावली आहे की, ही पत त्यांना बाह्य जगाच्या राजकारणात पुन्हा कशी मिळवायची हा खरा प्रश्न आहे. भू- राजनैतिक दृष्टीने विचार करता, पाकिस्तानचे महत्त्व शीतयुद्धानंतर पूर्णपणे संपले आहे. आर्थिक उदारीकरणाच्या युगात सुद्धा पाकिस्तानने आपल्या पायावर आपण स्वतःच कुऱ्हाड टाकून घेतली आहे. आणखी चिंतेची गोष्ट अशी की, दहशतवादाचे वारंवार समर्थन करून आणि काश्मिरमध्ये आपले नाक खुपसून ते पाकिस्तानने अनेक वेळा कापून घेतले आहे. एक दहशतवादाचे समर्थन करणारे राष्ट्र एवढीच पाकिस्तानची ओळख शिल्लक राहिली आहे. त्यामुळे अमेरिका आता पाकिस्तानच्या आर्थिक पुनरूज्जीवनासाठी पूर्वी साम्यवादाच्या विरोधात जेवढी मदत करत होती ती तेवढी मदत आता करेल असे वाटत नाही. परंतु आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे कर्ज मिळविणे, जगातील वेगवेगळ्या राष्ट्रांपुढे हात पसरणे आणि मिळेल ती मदत घेऊन आपल्या राष्ट्राची मरगळलेली अर्थव्यवस्था पुन्हा वाटेवर आणणे हे शेहबाज शरीफ यांच्या पुढचे प्रमुख आव्हान आहे. त्यांनी मुख्यमंत्री असताना आय. एम. एफ. च्या मुख्य क्रिस्टलीना जॉर्जिया यांच्या बरोबर बेल आऊट करार करून काही पैसे पदरात पाडून घेतले होते. हे त्यांचे पूर्वीचे यश आहे. त्यांच्या काळात त्यांनी थोडीशी चलनवाढ रोखली अशीही फुशारकी ते मारत असतात. परंतु आज घसरलेला पाकिस्तानचा रूपया, त्याचे झालेले अवमूल्यन, प्रचंड चलन फुगवटा, कर्जाचे मोठे ओझे, अंतर्गत यादवी, भू-राजनैतिक क्षेत्रात आलेले अपयश या सर्व गोष्टी पाहता, नवाज शरीफ यांच्या मार्गाने गेल्यास शेहबाज शरीफ यांनासुद्धा बदनाम व्हावे लागेल हा धोका वाटतो. तो स्पष्टपणे दिसतो आहे. शरीफ कुटुंबिय मूळचे काश्मिरमधील अनंतनागचे. फाळणीनंतर ते लाहोरला पोहोचले. तेथेच या कुटुंबाने राजकारणात व समाजकारणात



आपले पाय रोवले. आता हे शहबाज इतिहासाला कलाटणी देणारी काही स्पृहणीय कामगिरी करतील का असा प्रश्न राजकीय निरिक्षक विचारत आहेत. नाहीतर 'ये रे माझ्या मागल्या' या न्यायाने त्यांना सुद्धा अंधाराच्या खोल गर्तेत जावे लागेल आणि पाकिस्तानचे भवितव्य पूर्वीपेक्षा अधिक अंधःकारमय होईल हा धोका दिसतो.

**भविष्य अंधःकारमयः** इम्रान खान संपलेले नाहीत. ते कारावासात आहेत. तेथून ते कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा वापर करून अनेक वेळा प्रकट होतात आणि मोठी मोठी विधाने करतात. निवडणुकीत संख्याबळाच्या राजकारणात ते फसले असले तरी देखील पाकिस्तानी जनमतावर त्यांचाच जास्त पगडा आहे, भविष्यकाळात आपले पाय अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करतील. हे त्यांनी मिळविलेल्या जागांवरून लक्षात येते. पी. एम. एल. ने हेराफेरी करून ज्या पद्धतीने निवडणुका जिंकल्या, त्या पद्धतीने जनतेची ते जनतेची मने जिंकण्यात यशस्वी होतील का? हा खरा प्रश्न आहे. आर्थिक सुधारणांचा मार्ग बिकट आहे. सुधारणांविषयी खूप मोठी मोठी आश्वासने ते देत आहेत. परंतु दिलेली आश्वासने ते कसे पूर्ण करतील हा मोठा प्रश्न आहे. एक थोरला भाऊ म्हणून भारताशी सुसंवाद साधण्याइतके नैतिक सामर्थ्य त्यांच्यात आहे का? नवाज शरीफ यांनी यापूर्वी भारताशी मैत्री प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु शेहबाज शरीफ यांच्यात ती हिंमत आहे असे वाटत नाही आणि पाकिस्तानच्या बिघडलेल्या आर्थिक घडीला पुनःश्च नीट बसविण्यासाठी त्यांनी भारताकडून काही धडे घेऊन आपल्या अर्थव्यवस्थेत उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या काही संकल्पना नव्याने लागू केल्या पाहिजेत. शेती, उद्योग, शिक्षण तसेच आरोग्य व सुरक्षा या क्षेत्रात काही बदल केले तर काही चमत्कार घडू शकतो. असे म्हणतात की, नव्या पंतप्रधानावर पाकिस्तानी लष्कर प्रमुखाचा दबाव आहे. अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री नेमण्याच्या बाबतीत सुद्धा लष्कर प्रमुख चीफ ऑफ आर्मी स्टाफ जनरल सय्यद असीम मुनीर अहमद शाह यांचा सल्ला महत्त्वाचा असणार आहे. लष्कराचे राजकीय सत्तेशी असलेले साटेलोटे थांबले, प्रेमाचे गीतगुंजन संपले की लष्कर पंतप्रधानाविरुद्ध कुरबुरी सुरू करतील असा मागील अनुभव आहे. पंतप्रधान शेहबाज शरीफ तिहेरी कोंडीत सापडले आहेत. एकीकडे त्यांना मित्र पक्षांचा दबाब आहे. त्यांचे समाधान त्यांना करावे लागेल. दुसरे म्हणजे आर्थिक प्रश्नांचा गुंता चिंताजनक आहे. व तिसरे म्हणजे लष्कराला किती जवळ व किती दूर ठेवावयाचे हा तिसरा महत्त्वाचा दबाव आहे. त्यातून मार्ग काढणे म्हणजे तारेवरची कसरत ठरेल.

मित्र राष्ट्र चीनचा आर्थिक ससेमिरा शेजारील इस्लामी राष्ट्रांशी मैत्री व बिघडलेले संबंध अशा अनेक ताणतणावातून त्यांना मार्ग काढावा लागणार आहे. आरंभीच्या वर्षात त्यांना कोणालाही न दुखावता सुसरीबाई तुमची पाठ मऊ या न्यायाने त्यांना चीन तसेच इस्लामी मित्र राष्ट्रांना गोंजारावे लागणार आहे. सभोवतीस अनेक प्रश्न आहेत. साधन सामुग्रीची टंचाई आहे. अर्थकारण कोलमडले आहे. हाती आहे तो फक्त आशावाद. परंतु तूर्त तरी शेहबाज शरीफ यांना मागील पानावरून पुढे चालू असेच राजकारण करावयाचे आहे, नाहीतर 'ये रे माझ्या मागल्या' या न्यायाने नवाज शरीफ यांच्या प्रमाणेच त्यांनाही एके वेळी कठीण प्रसंगी पलायन करून आपला देश सोडून जावा लागेल. तसे घडू नये म्हणून त्यांना दूध पोळले तर ताकही फुंकून प्यावे लागेल. पाकिस्तानचे बहुसंख्य राज्यकर्ते लंडनमध्ये जातात किंवा आखाती देशामध्ये जातात आणि तेथे जाऊन आपला उर्वरित काळ काढतात तशी वेळ शेहबाज शरीफ यांच्यावर येऊ नये म्हणजे मिळविले असे म्हणावे लागेल. अस्थिर पाकिस्तानच्या नशिबात आणखी काय वाढून ठेवले आहे याचे भविष्य सांगायला राजकीय पंडिताची आवश्यकता आहे असे व नाही.

शेहबाज शरीफ हे स्वतः पदवीधर आहेत. त्यांनी पाकिस्तानच्या राजकारणाबद्दल व आपल्या पक्षाबद्दल उर्दू भाषेत काही ग्रंथ लेखनही केले आहे. त्यांच्या तिसऱ्या पत्नी तेहमिना दुर्रानी यांनी 'माय फ्युडल लॉर्ड' हा आत्मचरित्रपर ग्रंथ आपल्या पहिल्या पतीबद्दल लिहिला आहे. अशा प्रकारच्या एका प्रतिभाशाली लेखिकेची त्यांना साथ आहे. या माऊलीकडून त्यांनी काही धडे घ्यावेत आणि पाकिस्तानचे राजकारण सरंजामशाहीच्या तावडीतून सोडवण्याचा प्रयत्न करावा असा सल्ला कुणी देईल पण हा सल्ला कृतीत आणण्याचा शहाणपणा त्यांच्याकडे आहे का ? हा खरा प्रश्न पडतो.

# सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतील सामाजिक आशय

आधुनिक केसरी

**सावित्रीबाई फुले म्हणजे आमच्या सांस्कृतिक महामाता. या देशातील तमाम दीन दलित अस्पृश्य शुद्रातिशुद्रांना माणूस म्हणून जगण्याचा अर्थ शिकविणारी विश्वशिक्षिका. मेलेल्या कोट्यावधी देहांमध्ये प्राण फुंकणारी ही सावित्री म्हणजे सावित्रीमाई. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले. ज्या महामातेला ज्या ज्योतिबांनं शिकवलं. धर्म नावाच्या क्रुर व्यवस्थेच्या विरोधात शिक्षणाचं शस्र करुन उभं केलं. अज्ञान अंधश्रद्धेच्या काळ्याकुट्ट दलदलीत पिढ्यानपिढ्या खितपत पडलेल्या ज्यांचं जगणं जनावरांपेक्षाही हीनदीन होतं, अशांना उजेडाची वाट दाखवणारा महात्मा फुले. ते महात्मा नव्हेत तर शिवाजी दुसऱ्याच्या घरात जन्मावा अशी अपेक्षा न ठेवता आधी स्वतःच्या घरात क्रांतीची सावित्रीज्योत पेटवणारे ते क्रांतिबा. निव्वळ बोलके नव्हे तर कर्ते सुधारक क्रांतिबा ज्योतिबा फुले.**

या दांपत्याने मानवी जीवनाच्या प्रगतीचे महाद्वार ज्याने कायमस्वरूपी उघडते ती चावी उपेक्षित, वंचितांच्या हाती देऊन गावाबाहेरील वेशीचा पाया खिळखिळा केला. माणसातील पशुत्व हटविण्याच्या क्रांतिकारी प्रक्रियेत या विद्यामातेचे योगदान अतुलनीय असेच आहे. ज्यांनी शिक्षणानं सुसंस्कृत समाजाची पुनर्रचना केली. याबरोबरच समाजाला नव्या निर्माणाचा व्यापक आशय देणारी चळवळ उभी केली. या चळवळीच्या भरभक्कम बांधणीचा आशय सावित्रीमाईंनी लिहिलेल्या काव्यफुले या काव्यसंग्रहात तो पदोपदी जाणवत राहतो. काव्यसंग्रहातील हरेक काव्य प्रकृती ही वसंततालिका, ओवी, स्रोत, अनुष्टुभ, अभंग, अष्टमात्री, पद्य, अक्षरछंद यात बंदिस्त असली तरी शब्दांची धार मात्र सनातन गुलामगिरीची दोरखंड कापून काढणारी बंधमुक्तीची कार्यकारी संसदच आहे. या चळवळीचा विश्वाध्यक्ष क्रांतिबा म्हणजे ज्योतिबांना साष्टांग दंडवत घालत म्हणतात... ज्योतिबांना नमस्कार/मनोभावे करतसे, ज्ञानामृत आम्हां देई/ अशा जीवन देतेस, थोर ज्योति दीन शूद्रा/अतिशुद्रा हाक मारी, ज्ञान ही इर्षा देई/तो आम्हाला उद्धरी. या त्यांच्या ओळी स्रीयांसह शुद्रातिशुद्रांना ज्ञानामृत पाजणाऱ्या, उद्धार करणाऱ्या



ज्योतिबांच्या पायांवर लोळण घेणाऱ्या आहेत. सावित्रीमाईंचे ज्योतिबांवरचे निस्सीम प्रेम व्यक्त करणारा अभंगही फुलेंच्या काव्यात लिपीबद्ध झाला आहे. सावित्रीमाईंच्या जीवनात ज्योतिबा स्वानंद देणारे कळीतला मकरंद ठरले आहेत. या सुखाच्या संसारात एक फूल गुलाबाचे तर एक फूल कण्हेरीचे असले तरी दोघांचे स्वरूप एकजीव होते. या सुखी संसाराचे दुखणे मात्र वेगळेच होते. त्यांच्या भोवतीचे दोन हजार वर्षांचे शुद्रांच्या हाल अपेष्टांचे दुखणे काटे बनून टोचत होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी शुद्रातिशुद्रांना एक विचार दिला. शुद्रांना सांगण्या जोगा/आहे शिक्षण मार्ग हा, शिक्षणाने पशुत्व हाटते पहा. परंतु माणसात हे पशुत्व असे आले? का आले? हा आजच्या काळातही गंभिरपणाने चिंतन करण्याचा विषय आहे. कारण शुद्रच ही परंपरेने चालत आलेली अवस्था आहे असे मानत असत. कारण मनू महाराजांनी हे समस्तांवर बिंबवले आहे. मनू म्हणे ही ओवी गातांना माई म्हणतात, शुद्र जन्म घेती/पुर्वीची पापे ती, जन्मी या फेडती/शुद्र सारे..विषम रचती/ समाजाची रीती, धूर्तांची नीती/अमानव! मनू म्हणत असल्यामुळे शुद्रांनीही असे मानावे की आजची आमची पशुहूनही हीन असलेली अवकळा ही पूर्वजन्मींचीच पापे आहेत. एवढेच नव्हे तर शुद्रांपोटी जन्म घेणेही पुर्वजन्मीचे पापच आहे हे मनू महाराजांनी सांगितले आहे. ते फेडणे ता या जन्माचे आद्य कर्तव्य आहे. यावर चिडून माईंनी समाजातील विषमतेच्या अमानवी चालीरीती एका धूर्ताची नीती आहे असे म्हटले आहे.

अंधश्रद्धेवर सडेतोड प्रहार करतांना सावित्रीमाईंनी समाज कशा पद्धतीने या दलदलीत फस्त जाते या बाबतीत भाष्य केले आहे. दगडाला तेलात शेंदूर फासल्याने दगडात देव वास करीत नाही. म्हसोबा खेसोबा हे देव भयंकर असून त्यावर भाव भक्ती असणे धोक्याचे आहे. लेकरासाठी नवस करुन बकऱ्याची कंदोरी करण्यात येते. बाळ जन्माला आल्यानंतर नवस फेडण्यासाठी अत्यंत भावभक्तीने हे काम केले जाते. या दगडाला, धोंड्या दगडाला नवस केल्याने मुलं होत असतील तर नर नारी कशाला लग्न करतात? असा खडा सवाल त्यांनी विचारला आहे. यावर एकमेव पर्याय म्हणजे सावित्री वदते/करुनी विचार जीवन साकार करुनी घ्या असा सल्ला त्या देतात. चुकीचे मार्गदर्शन करुन आपला स्वार्थ साधणारे लोक या देशात मोठ्या प्रमाणावर आहेत. श्रद्धाळू लोकांचा फायदा घेऊन गोरगरीब जनतेला फसवून लुटणारे कैक आहेत. जे जसे बोलतात तसे कार्य करतात तेच पूजनीय ठरतात. सेवा परमार्थ मानून हे व्रत आपल्या जीवनात पाळतात, सार्थकी लावतात तेच वंदनीय आहेत. स्वतःचा स्वार्थ त्यागून इतरांच्या सुखदुःखात सहभागी होणारे परहीत पाहतात तेच थोर असतात. या संबंधीने मानवाचे नाते/ओळखती जे ते, सावित्री वदते/ तेच संत असे म्हटले आहे.

प्रज्ञाधर ढवळे, नांदेड
मो. ९८९०२४७९५३

# जालों दोहींचा देखणा । नये मागें पुढें ही मना ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आज वारकरी सांप्रदायाचे सर्वार्थाने समीक्षण होण्याची महत्वपूर्ण वेळ येऊन ठेपली आहे. वारकरी संप्रदायाची मूळ बैठक काय आहे? चौकट काय आहे? भूतकाळातील आपल्या धुरिणांनी काय काय संकटे अंगावर झेलून हा संप्रदाय उभा केला आहे? वारकरी सर्वसमावेशक विचार जिवंत ठेवण्यासाठी अनेक व्यथा-वेदना सहन कराव्या लागल्या. स्वातंत्र्य, समता, बंधुता इत्यादी अनुषंगाने "भेदाभेद अमंगळ" या न्यायाने जाहीरपणे वारकऱ्यांनी समाजकंटकांना न जुमानता वर्णव्यवस्थेच्या विरोधात शड्डू ठोकला. असे असतांना आज वारकरी संप्रदायाचे चित्र थोडे वेगळे होत आहे का? आपण मुळापासून बाजूला जात आहोत का? असे मनाला प्रश्न पडतात. त्यासाठी आपण सर्वच वारकऱ्यांनी आपल्या अंगावर घेतलेले हे सतीचे वाण मोठ्या जबाबदारीने पेलणे काळाची गरज बनली आहे.**

एवढे लिहिण्याचे कारण म्हणजे मागील दोन आठवडे झाले सगळीकडे कीर्तन-भजन, शिवपुराण कथा, भागवत कथा इत्यादी कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर, जल्लोषात सुरु आहेत. हा भक्ती-ज्ञान-भजन-कीर्तनाचा यज्ञ सर्वार्थाने समाजमनाला योग्य तऱ्हेने मार्गदर्शक व्हावा हीच विनम्र प्रार्थना! दुसरी बाजू त्याहूनही विचारणीय आहे. आज सर्वत्र ग्रामीण भागात, खेडोपाडी दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे. महागाई गगनाला भीडली आहे. शेतमालाचे म्हणावे तसे उत्पन्न घरात आले नाही. दुसरीकडे शेतकऱ्याच्या मालाला खर्चाच्या प्रमाणात भाव पण मिळत नाही. खरोखर आज शेतकरी आणि खेडी अडचणीत असतांना प्रत्येक गावात एका अखंड हरीनाम सप्ताहावर जर काही लाखात रुपये खर्च होत असतील तर निश्चितच ही स्वागतार्ह बाब नाही. त्यासाठी आज ग्रामीण भागात संपन्न होणारे अखंड हरीनाम सप्ताह साध्या पद्धतीने साजरे होणे गरजेचे वाटते. असे झाल्यास गावातील श्रद्धावान, सामान्य शेतकरी लोकांना आव्वाच्या सव्वा देणग्या (पट्टी) देण्याची आणि आपल्या संसाराचा ताळेबंद बिघडवण्याची वेळ येणार नाही. या बरोबरीने आयोजक मंडळींनी आपल्या परिसरातील कमीतकमी पैसे घेऊन किंवा केवळ बसच्या तिकिटावर येणारी कीर्तनकार मंडळी बोलवावी. तसेच सप्ताहासाठी लागणारे गायक, वादक, मंडपवाले, सिस्टीमवाले यांनी आपल्या वाढलेल्या सुपाऱ्या कासवासारख्या आकुंचित करून गाव-खेड्याला सहज सोपा जाईल अशाच रकमा सांगाव्यात. हे लिहायचे कारण म्हणजे आज समाज सर्वच वारकरी सांप्रदायिक लोकांवर ताशेरे ओढतोय. "भजन-कीर्तन हा धंदा झालाय!" असे म्हणून आपल्याला लोक हिणवत आहेत. तुच्छ लेखत आहेत. त्यामुळे मला कीर्तन येतं असे सांगायची लाज वाटते आहे! सज्जनहो! एकीकडे शिक्षण, आरोग्य यासाठी पैसा नाही म्हणून ओरडणारा समाज अखंड हरीनाम सप्ताहावर एवढा खर्च कसा आणि का करत आहे? असाही लोक प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यासाठी या अनंत प्रश्नांसाठी अलीकडच्या काळात मी जगद्गुरू तुकोबाराय यांच्या अभंगांवर मला जमेल तसे वर्तमान परिपेक्षात चिंतन मांडण्याचा अल्पमती प्रयत्न करत असतांना वाचकांनी या विविध अभंगावर मंथन करावे हा माझा प्रांजळ हेतू आहे. अजून मला तुकोबाराय समजले नाहीत. थोडा थोडा समजून घेण्याचा प्रयत्न सुरु आहे.




त्यातून आपण सुज्ञ, तज्ञ वाचक माय-बाप-बंधू-भगिनींनी यातून अनेकानेक नवनवीन विचार शोधून काढावेत. आपणही समजून घ्यावेत आणि मलाही सांगावेत अशी मी विनम्रपणे अपेक्षा करत आहे!

जगद्गुरू तुकोबाराय हे एक अनुभवी वाटाड्या आहेत. कुठेही ते आपल्या सोबतच असतात. त्यासाठी तुकोबांचा

**मज अंगाच्या अनुभवें । काही वाईट बरें ठावें ॥१॥**
**जालों दोहींचा देखणा । नये मागें पुढें ही मना ॥ध्रु.॥**
**वोस वसती ठावी । परि हे चाली दुःख पावी ॥२॥**
**तुका म्हणे घेऊं देवा । सवें करूनि बोळावा ॥३॥**

हा अभंग आजच्या भजन-कीर्तन-परमार्थ-भक्ती इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या भाविक-भक्त-चिंतकांना मोलाचा आहे असे मला वाटते. जेमतेम ४२ वर्ष जगलेल्या तुकोबांचे अनुभव शंभर वर्षे जगलेल्या व्यक्तीपेक्षाही अनमोल आहेत. त्यांचे लेखन आणि अनुभवविश्व सोबतच वाटचाल करते. ते कुणाचे अनुभव चोरून किंवा पाहून-ऐकून लिहिणारे कवी नव्हेत. त्यासाठी ते वाङ्मय क्षेत्रातील सर्वात भाग्यवान व्यक्ती आहेत, कारण त्यांचे शेकडो अभंग लोकांना मुखोद्गत आहेत. हे भाग्य जगातील एकाही कवीला लाभले नाही! इथे तुकोबाराय नेहमीसारखे आपले अनुभव कथन करतात. माझे अनुभव काय आहेत? तसे "मला काहीच कळत नाही" असे तुकोबाराय लिहून जातात. इथे मला महान तत्वज्ञ सॉक्रेटीस आठवतो. जगातील अनेक गूढ आणि वैश्विक सत्ये कथन करणारा सॉक्रेटीस म्हणतो, 'मला काहीच माहिती नाही.' अगदी तुकोबाराय त्याचीच भाषा बोलतात. तुकोबाराय म्हणतात, माझे अनुभव म्हणजे काही चांगले तर काही वांगले आहेत. ते तुमचे आणि माझेही आहेत. अगदी तसेच त्यांचे पण! पुढे जाऊन ते आपल्या अनेक अनुभवांचा एकेक धागा अलगदपणे उलगडत जातात. मी केवळ एक उपभोग्य वस्तूसारखा आहे. मी भूतकाळ आणि वर्तमान काळाचा केवळ एक दर्शक झालो आहे. माझ्या मनाला ना भूतकाळ ना भविष्यकाळ मान्य आहे. मला काहीही सुचेनासे झाले आहे. माझे मन निरुत्तर, रिकामे रिकामे झाले आहे. संसारातील सर्वच बाबींना तुकोबाराय विटले आहेत. त्यांना त्याच्यात कसलाही रस राहिला नाही. तुकोबांना संपूर्ण जग ओसाड वाळवंट वाटत आहे. त्यासाठी, या ओसाड वाळवंट जीवन आणि जगाची आस का धरावी? एवढेच काय सगळीकडे दुःखच दुःख भरले आहे. या ओसाड, वाळवंटात कुणीही सुखी नाही. सगळेच पळताहेत. कुणीही समाधानी नाही. शांत नाही. माणसाच्या मागे एवढी धावपळ असेल तर या जीवनावर, धावपळीवर का प्रेम करावे? यात नेमके आपले साध्य काय? आपल्या हाताला काय लागणार आहे? असे अनंत प्रश्न तुकोबाराय आपल्यासमोर उपस्थित करतांना आपल्याला विचार करायला प्रवृत्त करतात. असे असले तरी यावर एक उत्तम उपाय तुकोबा आपल्याला सुचवतात. हा या कवीचा आणखी एक महत्वपूर्ण गुणच म्हणावा लागेल! ते म्हणतात, जर हे सगळे व्यर्थ, खोटं, दुःखी असेल तर मग आपण इथल्या मरक्या, रडक्या माणसांची काही काळासाठी संगती करण्यापेक्षा सर्वकाळ ईश्वराला सोबत घेऊन फिरायला हवे! हे म्हणजे एखाद्या राजधानीत प्रत्यक्ष राजा सोबत राहायचे. फिरायचे. असे केल्यास आपल्याला काहीच अडचण येणार नाही. तेंव्हा, देवाला सोबत ठेवणे हा एकमेव उत्तम, सदैव आनंदाचा मार्ग! देव सोबत ठेवणे म्हणजे काय? देव सोबत ठेवणे म्हणजे कुणाचाही द्वेष, मत्सर न करणे! देव सोबत ठेवणे म्हणजे शांती, सत्य, अहिंसा इत्यादी मार्गाने जीवन जगणे! देव सोबत ठेवणे म्हणजे स्वतःची, आपल्या कुटुंबाची आणि आपल्या माणसांची सर्वार्थाने काळजी घेणे! देव सोबत ठेवणे म्हणजे आपले विहित कार्य इमानदारीने करणे! देव सोबत ठेवणे म्हणजे कुणाबद्दल एक शब्दसुद्धा वाईट न बोलणे! देव सोबत ठेवणे म्हणजे भूतकाळ विसरणे! देव सोबत ठेवणे म्हणजे भविष्य काळाची चिंता न करणे! देव सोबत ठेवणे म्हणजे केवळ आणि केवळ वर्तमानात आनंदी राहणे! असा देव आणि असा विचार सोबत असल्यानंतर आपल्याला कोणताही प्रसंग कठीण वाटणार नाही!

माय-बाप वाचकहो! तुकाराम हा एक सामान्य शेतकरी ते एक संत अशा पदापर्यंत पोहोचलेला माणूस काय लिहितो? कुणासाठी आणि कशासाठी लिहितो? या प्रश्नांची उत्तरे आपण शोधली पाहिजेत. आज सगळीकडे महाराज कीर्तने-प्रवचने देत फिरताहेत. आपल्या ज्ञानाचा प्रसार-प्रचार करत आहेत. हा आनंदाचा सोहळा आणखी देदीप्यमान करायचा असेल तर आपल्याला पण स्वतः बदलावे लागेल. जगद्गुरू तुकोबांसोबत जगतांना आपला वर्तमान आणि भोवताल आनंदी करणे महत्वाचे आहे. शहरी भागात अठरापगड जातीतील लोक कीर्तन किंवा साप्ताह झाल्यावर एकाच पंगतीत जेवतात. सगळे एकत्र-एकोप्याने राहतात. शहरात भरपूर सकारात्मक बदल झाले आहेत. या बदलाची गरज आज खेड्यांना पण आहे. आम्ही एकाद्या ठिकाणी महात्मा ज्योतीराव फुले किंवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे भाषण देऊन गप्पा मारत बसतो तेंव्हा, तेथील जयंतीतील काही माणसे "वारकरी संप्रदाय जर जाती-पाती मानत नसेल तर कीर्तन झाल्यावर खेड्यात सर्व जातीची माणसे एका पंगतीला का जेवू घालत नाही?" असा महत्वपूर्ण प्रश्न विचारून आम्हाला अंतर्मुख करतात. तेंव्हा माय-बाप लोकहो, लोक वारकऱ्यांना असे प्रश्न विचारून निरुत्तर करत असतील तर मग आपण बदलले पाहिजे. गावातील सर्वच जातीच्या लोकांनी एकत्र येऊन सगळे कार्यक्रम संपन्न करतांना भेदाभेद करता कामा नये. सर्वांनी एकाच पंगतीला जेवले पाहिजे. माणसा माणसातील भेद समूळ नष्ट झाला पाहिजे. असे झाल्यास समाजासाठी येणारा काळ नक्कीच उज्वल, आनंदायी आणि समृद्धीचा असेल! जय तुकोबाराय!

# तयास मानव म्हणावे का ? क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले



डॉ. प्रकाश खेत्री,
छत्रपती संभाजीनगर

आधुनिक केसरी

**सावित्रीमाईनी दया, प्रेम, परोपकार, करुणा, अहिंसा, सत्य,समता,मानवतावाद आदी मानवी मूल्ये आयुष्यभर जपली, या मूल्यांची पेरणी त्यांनी आपले विचार, कार्य-कर्तुत्वा आणि साहित्य 'काव्यफुले' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या दोन्ही कविता संग्रहातून केली आहे. तयास मानव म्हणावे का ? ही कविता 'काव्यफुले' या कविता संग्रहातील आहे. बारा कडव्याची ही एक दीर्घ कविता असून त्यातील केवळ चार कडव्यांचा आशय प्रस्तुत लेखात मांडला आहे. सावित्रीमाई माणसाला गुलामगिरीचे दुःख नाही. तयास मानव म्हणावे का ? असा मुलभूत प्रश्न विचारतात. ही गुलामगिरी रूढीची, अंधश्रद्धेची, सत्तेची किंवा मानसिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक अशा कोणत्याही प्रकारातील व स्तरावरील असो. ती गुलामगिरी झुगारून दिली पाहिजे, गुलामगिरी विरुद्ध आवाज उठवला पाहिजे, 'गुलामीगिरी नष्ट करण्याचे एकमेव साधन शिक्षण हे आहे', यावर सावित्रीमाईचा ठाम विश्वास आहे. एकुण मानवी जीवन अर्थ, कार्यप्रवण व स्वातंत्र्याचा आग्रह धरणारी आणि शिक्षणाचे महत्व सांगणारी तयास मानव म्हणावे का ? ही कविता आहे.**

ज्ञान नाही, विद्या नाही, ती घेण्याची गोडी नाही,बुद्धी असूनही चालत नाही. तयास मानव म्हणावे का ? मानवास बुद्धी आहे, मात्र ज्ञान नाही, विद्या नाही, शिक्षण नाही. ते घेण्याची गोडी नाही. तयास मानव म्हणावे का ? सावित्रीमाईनी हा प्रश्न विचारत खऱ्या मानवाचे लक्षणे सांगितली आहेत. साठलेल्या पाण्याप्रमाणे जे गतीहीन आहे ते सडून जाते वा दूषित होते. या निसर्ग नियमाप्रमाणे ज्या मानवात परिवर्तनाची आस किंवा चेतना नाही, तो मानव म्हणून घेण्यास पात्र नाही. या उलट जो गंगेच्या पाण्याप्रमाणे आहे, स्वतःच्या बुद्धीला निरंतर गतिमान, प्रवाहित व परिवर्तनशील ठेवतो. ज्ञान व विद्येच्या कण-कण वेचण्यासाठी क्षणनक्षणाचा विचार करतो, तोच खऱ्या अर्थाने माणूस आहे. असे सावित्रीमाई यांना सुचवायाचे असेल.

सावित्रीमाई म्हणतात, 'मनुष्य हा जन्मतः बुद्धिमान प्राणी समजला जातो, बुद्धीमुळे त्याने इतर प्राण्यांच्या मानाने आपल्या विधायक विकास केला आहे'. बुद्धीला तो जेवढा ताण देतो, तेवढा बुद्धीचा विकास होतो. असे आज शिक्षणतज्ञ सांगत आहेत. कवयित्रीने कवितेच्या प्रारंभीच्या कडव्यात जाणीवपूर्वक शिक्षण, ज्ञान आणि विद्या हे तीन अर्थपूर्ण शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरले आहेत, कारण शिक्षण म्हणजे माहिती मिळवणे, ज्ञान म्हणजे त्या माहितीचा जीवनात व व्यवहारात उपयोग करणे आणि विद्या म्हणजे विशुद्ध किंवा यथार्थपणे विश्वाकडे पाहण्याची दृष्टी असणे. हे अर्थ त्यांना अभिप्रेत असावेत.

सावित्रीमाईचे वैयक्तिक जीवन हे सार्वजनिक जीवन बनले होते, 'संपूर्ण आयुष्य केवळ स्त्रीशुद्रतिशूद्र यांच्या शिक्षणाचा ध्यास, हाच त्यांच्या जीवनाचा एकमेव श्वास बनला होता', तेव्हा तयास मानवी मानव म्हणावे का ? हा केवळ काव्य प्रपंच नाही, तर तो प्रबोधनात्मक उपदेश आणि जीवन मार्ग आहे. कारण त्यांचा ज्ञानी समाज निर्माण करावयाचा होता. ते कष्टाशिवाय शक्य नाही. तेव्हा त्या म्हणतात,

**देरे हरि पलंगी काही**
**पशुही ऐसे बोलत नाही**
**विचार ना आचार नाही**
**तयास मानव म्हणावे का ?**



बुद्धिमान म्हणणारा माणूस काही काम न करता आयते खातो, पशु, पक्षी ही असे कधी करत नाहीत, पशूंना जे कळते ते माणसाला कळत नाही. तयास मानव म्हणावे का ? असा प्रश्न कवयित्रीने या ओळीत विचारला आहे. 'देरे हरी पलंगा वरी', 'असेल हरी तर दिल खटल्यावरी', 'जो चोच देतो तो चारा देतो', इत्यादी मानवनिर्मित लोक म्हणी मानवी समाजात रूढ आहेत, माणूस हा विचारक्षम प्राणी आहे, मेंदू, बुद्धी असूनही असे बोलतो, ही गोष्ट सावित्रीमाईंना हस्यास्पद वाटते, कारण बुद्धी नसणारे प्राणी ही असे करत नाहीत, पशु-पक्षी, प्राणी हे अन्न मिळवण्यासाठी रानोमाळ भटकंती करतात. सर्व पशु दैव , नशिबाची साथ न घेता प्रयत्नवादाचा स्वीकार करून, आपल्या गरजा पूर्ण करतात, जीवन जगतात. मात्र स्वतःला बुद्धिमान आणि प्रगतशील म्हणणारा माणूस दैववाद आणि नशिबावर अवलंबून राहतो, आळसात बुडतो आणि मातीमोल होतो. तेव्हा तयास मानव म्हणावी का ? हा प्रश्न त्या करतात. सावित्रीमाईना स्त्रीशुद्रतिशूद्र लोकांमधील नशीब, नाकर्तेपणा, नकारात्मक विचार, नाहक खर्च हे अवगुण नष्ट करायचे होते. त्यासाठी प्रस्तुत ओळीत पशु व मानव यातील फरक सांगून प्रयत्नवादी, आशावादी जीवनाचे ध्येय ठेवणाऱ्या पशुतील सकारात्मक, चांगुलपणाच्या प्रवृत्तीला साथ दिली आहे, तर नशिबवादी, निराशात्मक, आळशी माणसातील नकारात्मक, वाईट व दुष्ट प्रवृत्तीला लाथ दिली आहे. त्यावर माईनी प्रहार केला आहे.

**पोरे घरात कमी नाहीत**
**तयांच्या खाण्यासाठी ही**
**ना करी उद्योग काही**
**तयास मानव म्हणावे का ?**

सावित्रीमाई यांच्या विचारातील स्पष्टोक्ती प्रस्तुत ओळीत दिसून येते, कवयित्री येथे अज्ञानी, आळशी, अंधश्रद्धेच्या आधारे जीवन घालविणाऱ्या स्त्रीशुद्रातीशुद्राना अगदी सडेतोडपणे त्यांच्या नाकर्तेपणाचा जाब विचारतात. तसेच 'ज्यांनी केले पाप त्याला मुली आपोआप', 'मुले देवाघरची फुले' या खुळ्या अंधश्रद्धा, अंधकल्पनांचा आधार घेऊन केवळ मुले जन्माला घालणे हाच अज्ञानी लोकांचा उद्योग आहे. या अज्ञानी लोकांवर टीकात्मक आलोचना करून कवयित्री त्यांना स्वतःच्या जीवनाचा विचार करावयाला सांगतात. त्या म्हणतात मानवाला त्या निर्मिकाने इतर प्राण्यांपेक्षा वेगळे का बनवले ? त्याला दोन सर्जनशील हात व दहा बोटे कशासाठी दिली ? नवनिर्मितीची नवचेतनेची शक्ती दिली ती कशासाठी ? मानवाने मुले केवळ ईश्वराची देणगी म्हणून स्वीकारली परंतु त्यांच्या खाण्यापिण्याचा किंवा राहण्याचा विचार कधीच केला नाही. त्याच्या मूलभूत गरजा भागवण्याचे त्यांच्या गरिबीमुळे अज्ञानामुळे शक्य झाले नाही, तर त्याच्या उत्थान, परिवर्तन आणि भविष्यातील प्रगती, विकासासाठी काही उद्योग करणे अशक्यप्राय गोष्ट आहे. याची सावित्रीबाईंनी मनोमनची चिड होती, घरातील कर्तेपुरुष जर निष्काळजीपणे नाकर्तेपणाने वागू लागले, तर तयास मानव म्हणावे का ? प्रस्तुत ओळीत सावित्रीमाईच्या कृतिशील समाजसेविकेची भूमिका लक्षात येते, त्या खऱ्या अर्थाने गरिबांच्या कैवारी होत्या. हे त्यांच्या विचारावरून दिसून येते.

**सहानूभूती मिळत नाही**
**मदत न मिळेल कोणाचीही**
**पर्वा न करी कशाचीही**
**तयास मानव म्हणावे का ?**

जीवनात अर्थ वा पैसा असेल तरच व्यक्तीच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो, अर्थ पैसा केवळ कर्मप्रिय, उद्योगशील व कष्टाळू माणसालाच मिळतो, त्यांचे जीवन सार्थक होते, हा लोक व्यवहाराचा सिद्धांत आहे. पैसा नसेल तर कोणतेही लोक जवळ येत नाहीत, तेव्हा सहानुभूती मिळत नाही, कोणाची मदत मिळत नाही, जवळ आलेले मित्र व नातेसंबंध दूर होतात, माणसाचे हितचिंतक हे निंदक बनतात. हा जीवन व्यवहाराचा अनुभव त्या कथन करत. या सर्व गोष्टीचा सारासार विचार आणि कशाचीही पर्वा न करणाऱ्याला मानव म्हणावे का ?

अज्ञानाने पछाडलेल्या, आळसाने जखडलेल्या लोकांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन नकारात्मक बनतो. अशा गरीब बनलेल्या लोकांना कोणाचीही सहानुभूती मिळत नाही. ते केवळ उपेक्षा व अवहेलनेस पात्र ठरतात. कारण त्यांचे सारे जीवन अचेतनात्मक बनलेले असते, याच्या जीवनात भावभावनाचा काहीही संबंध उरलेला नसतो, अशा दयनीय परिस्थितीत जीवन जगणाऱ्या लोकांची सावित्रीमाई येथे श्रमाविषयीची बेपरवाही, बेफिकिरी व जिवंतपणे जीवनाविषयी असणारी उदासीनता, अजागृकता स्पष्ट करून, तयास मानव म्हणावे का ? असा प्रश्न अज्ञानी लोकांना विचारतात. त्या साठी सर्वांना ज्ञानी होण्याचा सल्ला देतात. हा सल्ला व उपदेश आपण क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या स्मृतिदिनी अंगिकारला पाहिजे, हीच खरी सावित्रीमाईना आदरांजली ठरेल...!

# हाफ तिकीट



आधुनिक केसरी

रामभाऊ सकाळीच पाचचे टोल पडले तेव्हा जागी झाला. आज रामभाऊ च्या शेताची तारीख कोर्टामध्ये होती. जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी त्याने आपली तयारी सकाळीच केली होती सकाळी सातची एसटी पकडायची होती. त्यामुळे त्याने आपली आवरा आवर करून कोर्टाचे पाहिजे ते कागदपत्र सोबत घेतले. वकिलाने त्याला बरोबर अकरा वाजता कोर्टामध्ये हजर राहण्यासाठी सांगितले होते. त्या हिशोबाने रामभाऊने आपली तयारी केली होती. गणेशपुर गावावरून सकाळी सातची एसटी आणि संध्याकाळी पाचची एसटी असे दोनच टाईम जिल्ह्याचे ठिकाणी जात असे. तसे प्रायव्हेट गाड्या चालू राहायच्या पण ते आपला मनमानी कारभार चालून पाहिजे त्या तिकिटा वसूल करून अगदी दाबून चोपून प्रवासी भरत असे. जसा काही दाबून दाबून कापूस भरला. आता सरकारने पुरुष 65 वर्षाच्या वर, सर्व बाया मंडळीसाठी हाफ तिकीट केल्यामुळे बरेचसे गावातील लोक, बाया मंडळी एसटीचाच प्रवास पसंत करत. कारण पैसेही कमी लागतात आणि प्रवासही मोठ्या आनंदाने होतो... जर एसटीमध्ये बसायला शीट भेटली तर. गावातील काही बुढे बाढे तर ज्यांचं वय झालं किंवा त्यांनी आधार कार्ड वर आपलं वय 75 च्या वर दाखवून... असे बुढेपाढे तर तालुक्याच्या ठिकाणी एसटीने दररोज जायचे आणि तालुक्याच्या ठिकाणी आपले असले नसले सर्व कामे करून यायचे. गावातील जी तरुण मंडळी होती, ती मात्र आता तालुक्याच्या,जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी फारशी उत्सुक नसायची, कारण एसटीची त्यांना फुल टिकीट द्यावी लागत असे. म्हणून कोणतीही कामे पडली की, ते आपली कामे आपल्या घरातील वयस्कर मंडळी किंवा पाया पडतात तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यास सांगत असे.



बबलू कराळे
संपर्क क्र.: 7218029838

रामभाऊ सकाळीच लग्न आपल्या घरामधून निघाला. तेवढ्यात गावातीलच मदन पाटलांनी त्याला आवाज दिला. " काय सावकार आज सकाळी सकाळी मोठ्या लगबगिने निघाले. "
" हो पाटील आज तारीख आहे कोर्टाची. "
" कोणती तारीख हाय तूही कोर्टात."
" पाटील आता काय सांगावं, माया मोठ्या भावानं शेषरावनं हिस्से वाटणी मध्ये मोठी चालाकी केली आणि एकर भरायचा तुकडा मले कमी देला. "
" हो ते मी ऐकलं होतं, पण एक सांगू रामभाऊ तुले ऐकशील तर ऐक, शेषरावन एवढी आई-वडिलांची सेवा केली, आताही म्हातारी त्याच्याकडेच आहे म्हणे, असं समज की म्हणूनच त्यांना एक एकएकर वावराचा तुकडा घेतला. "
" पण पाटील मी सेवा केली नाही काय "
" केली अशिन, पण राजा तू दारू पिऊन असतं पडला राहत होता इकडे तिकडे. "
" पाटील कोणी दारू तस पेत नाही ज्याची जयते त्यालेच कयते."
" पण रामभाऊ तुले सांगतो कोर्टाची पायरी आपल्यासारख्या शेतकऱ्यांन चढन काही चांगली गोष्ट नाही. "
" बरोबर आहे तुमचं पाटील पण, एक एकर वावराचा सवाल आहे."
" एका एकरासाठी राजाभाऊ बदकिमध्ये चालतच राहते, घरातला भांडण त्या रामभाऊ कोर्टात नेलं."
" कोर्टातल्या शिवाय पर्याय नव्हता ना पाटील आता."
" मग आता चकरा मारत रायत काय कोर्टाच्या, कोर्टाचा निकाल काय लवकर लागते."
" बरं पाटील मी येतो एसटी येऊन जाईल.
" हो जाय लवकर येऊन राहिली वाटते एसटी. पण एक सांगतो तुम्ही आपसात घेऊन घ्या तरच तु फायद्यात राहशील. "

रामभाऊंन पाटलाची गोष्ट ऐकून सुद्धा न ऐकल्यासारखी केली आणि भरभरा तो एसटीच्या दिसने फाट्यावर निघाला. फाट्यावर एसटीची वाट पाहणारे बरेच लोक आणि बाह्यमंडळी होती. लोकांपेक्षा बायाच जास्त होत्या. एसटी आली कशीबशी एसटी थांबवली. एसटीमध्ये गर्दी जेवढी होती की बसाले सुद्धा जागा नोहती. पहिलेच बायान डच एसटी भरली होती. रामभाऊ एसटीमध्ये उभा राहूनच रामभाऊले जिल्हा गाठा लागला. एसटीमध्ये बसाले कोणी जागा देत नव्हतं. एसटीच्या ज्या त्या सीटवर बाया बाया बसल्या होत्या. एका एका सीटवर माणसं तिघ-तिघ बसले होते. रामभाऊ एक-दोन बायाईले जागा मागितली पण कोणत्याच बाईनं राबवले जागा दिली नाही. त्यामुळे रामभाऊले उद्याच प्रवास करा लागला. त्यामुळे रामभाऊ ची बेज्याच जीवार आली होती. घरी वापस येताना सुद्धा तीच परिस्थिती होती. सर्व एसष्ट्या बाया मंडळीन फुल भरल्या होत्या. त्यामुळे रामभाऊ स्वतःचं बडबड करत होता...
" शासनाला कोणत्या डोक्यातून ही स्कीम काढली... बायाईले हाफ तिकीट... एकीकडे शासनच समानतेचा धडा शिकवते आणि एकीकडे बायामाणसात सात फूट पाडते. हे कोणती होय हाफ तिकीट..."

# उंबरठ्याबाहेरची ती...

आधुनिक केसरी

**चूल आणि मूल" एवढेच तिच कार्यक्षेत्र होतं. जिच्या हाती पाळण्याची दोरी , तीच जगाचा उद्धार करी असं तिला म्हटलं जातं . पण वास्तविक पाहता परिस्थिती काही वेगळीच होती. घरी सगळ्यांचे सगळं काही करायचं आणि , स्वतःच्या इच्छा , आकांक्षा , स्वप्न , आवडीनिवडी , छंद हे सगळं कुठेतरी बाजूला सारायचं. हे करताना कधीही कुठे तक्रार नाही, कधीही कुणाचा राग नाही, कधी चिडचिड नाही. सगळं ती हसतमुखाने करायची आणि कुटुंब व्यवस्थेचा सगळ्यात मोठा आधार म्हणून ती ताठ मानेने उभी राहायची. 365 दिवस 24 तास सतत ती तिच्या कुटुंबासाठी समर्पित असायची.**



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

एक " आदर्श गृहिणी " ही तिची ओळख निर्माण व्हायला लागली होती. असं असलं तरीही देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये " मेरी झांसी नही दूंगी " म्हणणारी झाशीची राणी लक्ष्मीबाई , सरोजिनी नायडू , सावित्रीबाई फुले , अशा काही महिला त्या काळातही त्यांच्या कार्य कर्तुत्वाने अग्रेसर होत्या. तर दुसरीकडे विनायक दामोदर सावरकर यांच्या कुटुंबातील तिन्ही भावांच्या पत्नी यांनी सुद्धा देशाच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये त्यांनी दिलेले योगदान हे अतुलनीय असच होतं काळ बदलला, परिस्थिती बदलली, तंत्रज्ञान बदललं, जग बदललं तसं ती ही बदलू लागली आपल्या हातातली पाळण्याची दोरी हातात धरुनच तिने आता आपलं आकाश शोधायला सुरुवात केली . किंबुहणा तिला आता तीच आकाश गवसायला लागलय, ती शिकू लागली , ती घडू लागली आणि ती नव्याने उभी होऊ लागली. ती आज स्वतःला सिद्ध करू पाहते आहे. आज बस कंडक्टर पासून ऑटो चालकांपर्यंत , पायलट पासून तर थेट अंतराळात जाण्यापर्यंत, मैदानावरही लीलया समोर येणारी ती आज जग पाहते आहे .पण आपला उंबरठा तिने ओलांडला तो स्वकष्टाने , स्वमेहनतीने , स्वकर्तुत्वाने आणि स्वतःच्या जिद्दीने. पण उंबरठ्या बाहेर पडलेल्या तिला समाज मात्र आज अजूनही तिच्याकडे त्या सन्मानाने पाहायला शिकलेला नाही हे मात्र तेवढेच खरं. उंबरठ्याबाहेर पडलेली ती आज पुन्हा याच समाज व्यवस्थेतील काही चुकीच्या घटना सोबत पुन्हा तितक्याच ताकदीने लढते आहे . उंबरठ्या बाहेर पडल्यावर तिच्या परिस्थितीचा गैरफायदा घेत तिच्यावर होणारे अन्याय ,अत्याचार आपण आजही बघत आहोत . मग ते कार्पोरेट सेक्टर असो की , राजकारण, सामाजिक क्षेत्र असो की काहीही ती तिच्या कार्यक्षेत्रात कुठेही वावरत असताना आज सुद्धा तिला एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहिलं जात आहे, हे अतिशय लाजिरवाणी आणि दुर्दैवी बाब आहे . खरंतर ति ला तो सन्मान तिच्या घरापासून मिळायला हवा . प्रत्येक घराघरांमध्ये जेव्हा ती ला सन्मान मिळायला लागेल आणि प्रत्येक घराघरांमध्ये जेव्हा ती चा सन्मान करण्याचें संस्कार घडू



लागतील तेव्हा उंबरठ्या बाहेर पडणारी ती सुद्धा सन्मानाने जगू लागेल.

नुकताच जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा करण्यात आला .या दिनाच्या औचितत्याने विविध क्षेत्रातील मान्यवर असलेल्या ज्या महिलांनी मनाचं स्थान मिळवलं त्यांचा सन्मान अनेक ठिकाणी करण्यात आला . परंतु हे होत असतानाच दुसरीकडे मात्र तिच्यावर होणारे अत्याचार , तिच्यावर होणारा अन्याय हे सगळं आजही तितक्याच गतीने वाढते आहे . हे कुठेतरी थांबायला हवं . आणि यासाठी या समाजाने उंबरठा बाहेर पडणाऱ्या ती ला आपली सहकारी म्हणून आपण सन्मान देणार आहोत का ? की कार्यक्रमापुरता व्यासपीठावर बसून त्यांचा सन्मान करायचा आणि बाहेर ती पडली की तिच्यावर मात्र अन्याय आणि अत्याचार व्हायचे . हे अस आणखी किती दिवस चालणार आहे ? या सगळ्या गोष्टीचा आपण विचार साकल्याने करणार आहोत का ? आपण सगळ्यांनी मिळून जर समाजातील ति ला पाठिंबा दिला ती आपली पण काहीतरी लागते आहे. याचं भान ठेवलं , ती म्हणजे आपल्या प्रत्येकाची कोणी ना कोणी काहीतरी आहे . हा भाव जर आपल्या मनामध्ये येत गेला तर , कदाचित तिच्यावर होणारे अन्याय आणि अत्याचार कमी होतील हा आधार आपण होणार आहोत का ? ही साथ आपण तिला देणार आहोत का ? जागतिक महिला दिन साजरा झाला त्या पार्श्वभूमीवर आज तिच्यासाठी मी काय करू शकतो ? हा प्रश्न आपण सगळ्यांनी अंतर्मुख होऊन विचार केला तर निश्चितच ती उंबरठा बाहेर पडलेली ती कायम सुरक्षित आपल्या घरी जाईल . आपल्या लेकरांसाठी ,आपल्या आई-वडिलांसाठी ,आपल्या पतीसाठी, आपल्या भावासाठी ....

गरज आहे ती फक्त ती च्या सोबत ठामपणे खंबीरपणे विश्वासाने उभे राहण्याची.

चला तर मग...आपल्या विश्वासाचं एक हात आपण ती च्या हातात देऊ या तिच्या पुढच्या प्रवासासाठी...

# आदर...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.39

आदराने वाकून नमस्कार केला. आदरार्थी मान हलवली. पाहुण्याकडे गेल्यावर यथेच्छ आदर सत्कार करण्यात आला. सोयऱ्यांच्या आदर सत्काराने आम्ही भारावून गेलो. किती छान वाटतं असा आदर पाहून. कोणी आपला आदर केला तर मनापासून सुखावतो. आणि अनादर झाला तर मन दुखावते. आपण कोणाचा आदर केला तर आपल्यालाही आदर मिळेल. पण काही अपवादही असतात. काहींना फक्त स्वतःचा आदर इतरांनी करावा एवढीच अपेक्षा असते. स्वतः मात्र कधीही कोणाचा आदर करत नाही. दुसऱ्यांना काही लोक अतिशय हिन वागणूक देतात. तुसडेपणाने वागतात. अर्थात त्यांचा दोष नसावा. त्यांच्यावर तसेच संस्कार झालेले असतात . माणूस कधीही वाईट नसतो. त्याच्यावर झालेले संस्कार चुकीचे असतात. काही लोकांकडे खानदानी पद्धत असते फक्त आदर घेण्याची. देत मात्र नाही." आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येईल".? समोरचा व्यक्ती शिपाई असो की भिकारी, लहान असो की मोठा, रंक असो की राव. श्रीमंत असो की गरीब,स्त्री असो की पुरुष त्याचा योग्य तो आदर राखलाच पाहिजे.. मान सन्मान दिलाच पाहिजे. शेवटी ती सुद्धा माणसंच असतात. गरिबीत जन्माला येणे हा त्यांचा दोष नाहीच मुळी. कुणाला शिक्षण न मिळणे, कोणाकडे सुंदरता नसणं हे व्यक्तीचे दोष नाहीतच. म्हणून काय त्यांचा अनादर करायचा.? त्यांनाही अपेक्षा असतेच आपलाही कोणी आदर करावा. त्यांच्याशी आपण हीन वागलो तर न जाने पुढील जन्मात तोही आपल्याला तशीच वागणूक देईल. अर्थात पुनर्जन्म आहे की नाही माहित नाही. पण "जसे पेराल तसे उगवेल".हे मात्र शाश्वत सत्य आहे .आपल्या वागण्या बोलण्यात ज्याप्रमाणे माधुर्य असावे.. तसेच आदर पण असावा. आदराने बोलल्यास आपल्या वागण्यातील विनयशीलता लक्षात येते .जसे की "विद्या विनयेन शोभते". जिथे विद्या तिथे विनय असावाच...

लय भारी

# सुगरण



सौ. सविता खंडगावकर , नांदेड
संपर्क क्र. 7218340512

# दोसा



आधुनिक केसरी

प्रथम सर्व साहित्य तीन भांड्यांमध्ये घ्या. तुम्ही भारताबाहेर राहिल्यास हे साहित्य ऑनलाइन किंवा कोणत्याही भारतीय किंवा आशियाई किराणा दुकानात सहज उपलब्ध आहेत याची नोंद घ्या. 1.5 कप इडली तांदूळ किंवा एका भांड्यात उकडलेले तांदूळ. तुम्ही सोना मसुरी किंवा परमल सारखे लहान-मोठे ते मध्यम-दाणे असलेले तांदूळ देखील वापरू शकता. कप उडीद डाळ (भुसी काढलेले हरभरे) + 1 टेबलस्पून चना डाळ (भुसी आणि विभाजित बंगाल हरभरा) + 20 मेथी दाणे (मेथी दाणे) दुसऱ्या भांड्यात 2. मसूर आणि मेथी दाणे दोन वेळा स्वच्छ धुवा. नंतर 1 कप पाण्यात 4 ते 5 तास भिजत ठेवा. टीपः ताजी उडीद डाळ वापरण्याची खात्री करा आणि त्यांच्या शेल्फ कालावधीमध्ये. 3. तांदूळ दोन वेळा स्वच्छ धुवा आणि बाजूला ठेवा. 4. सपाट तांदूळ एक किंवा दोनदा स्वच्छ धुवा आणि नंतर तांदूळ घाला. 5. 2 कप पाणी घाला. दोन्ही तांदूळ आणि चपटे तांदूळ एकत्र 4 ते 5 तास भिजवून ठेवा. ६. बारीक करण्यापूर्वी, भिजवलेल्या मसूर+मेथीचे पाणी गाळून घ्या आणि उडीद डाळ बारीक करण्यासाठी ठेवा. आपण इच्छित असल्यास आपण ताजे पाणी देखील वापरू शकता. 7. ग्राइंडरच्या भांड्यात मसूर घाला. तसेच मसूराच्या डाळीत * कप भिजवलेले आणि गाळलेले पाणी किंवा * कप ताजे पाणी घालावे. 8. उडीद डाळ, चणा डाळ आणि मेथीचे दाणे हलके आणि फुगलेले पीठ येईपर्यंत बारीक करा. उडीद डाळ खऱ्या अर्थाने चांगली चिरलेली असावी, जेणेकरून डोसा चांगला आंबेल. एका वाडग्यात किंवा स्पॅटुलासह पॅनमध्ये पिठ काढा. तांदूळ चांगले गाळून घ्या. नंतर त्याच ग्राइंडरमध्ये भिजवलेले तांदूळ आणि 1 कप ताजे पाणी घाला.

तुम्ही एका बॅचमध्ये किंवा दोन ते तीन बॅचमध्ये तांदूळ बारीक करू शकता. हे ग्राइंडर जारच्या आकारावर अवलंबून असेल. मी एका बॅचमध्ये ग्राउंड केले आणि पीसण्यासाठी 1 कप पाणी जोडले. पीसताना तुम्ही कप पाणी देखील घालू शकता. तांदळाच्या गुणवत्तेवर पाण्याची भर अवलंबून असेल. त्यामुळे तुम्हाला कमी किंवा जास्त पाणी घालावे लागेल. तांदूळ बारीक दाणेदार सुसंगतता येईपर्यंत बारीक करा. तांदूळाच्या पिठात बारीक रवा (गव्हाची मलई) तांदळाच्या दाण्यांप्रमाणे सुसंगतता असावी. आता तांदूळ + चपटे तांदूळ त्याच पॅनमध्ये किंवा उडीद मसूर पिठाच्या भांड्यात घाला. टीस्पून खाण्यायोग्य मीठ घाला किंवा चवीनुसार घाला. पिठात मीठ चांगले मिसळा. तसेच तांदळाचे पीठ आणि उडीद मसूर दोन्ही नीट मिसळा. झाकणाने झाकून ठेवा आणि खोलीच्या तपमानावर 8 ते 9 तास आंबण्यासाठी बाजूला ठेवा. तुम्ही कमी किंवा जास्त वेळ ठेवू शकता आणि हे तुमच्या शहरातील तापमान परिस्थितीवर अवलंबून असेल. ते आंबायला 6 तासांपासून एक दिवस किंवा त्यापेक्षा जास्त वेळ लागू शकतो. उन्हाळ्यात, पिठात लवकर आंबते आणि हिवाळ्यात त्याला जास्त वेळ लागतो. एकदा तुमची पिठ चांगली आंबली की, बटाटा मसाला स्टफिंग बनवायला लागल्यावर झाकून ठेवा आणि थंड करा. गरम हंगामात, खोलीच्या तपमानावर ठेवलेले पिठ आंबणे सुरूच राहील आणि खूप आंबट होईल.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कोयना जलपर्यटनाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** कोयना जल पर्यटन केंद्र हे देशातील गोड्या पाण्यातील सर्वात मोठे जल पर्यटन केंद्र असून या माध्यमातून पर्यावरण पूरक विकास आणि स्थानिकांना रोजगार या बाबींना प्राधान्य देण्यात येणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील मुनावळे येथे कोयना जलाशय (शिव सागर) तीर येथे महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विकास महामंडळाच्या कोयना जल पर्यटन शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला.यावेळी आयोजित समारंभात ते बोलत होते.
याप्रसंगी उद्योग मंत्री उदय सामंत,राज्य उत्पादन शुल्क मंत्री आणि सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई,ज्येष्ठ सिने अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर,आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार मकरंद पाटील,जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, एमटीडीसीच्या व्यवस्थापक श्रीमती शर्मा, जलसंपदा विभागाचे अरुण नाईक आणि जयंत शिंदे, महाराष्ट्र पर्यटन विकास प्रकल्पाचे सल्लागार सारंग कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले,सह्याद्रीच्या कुशीत प्रचंड निसर्ग सौंदर्य लपलेले आहे.त्याला चालना देण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता होती.त्यासाठी ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट काढल्याने या परिसराच्या विकासाला चालना मिळाली आहे.मासेमारी,बोटिंग,जल पर्यटन यासाठी या बाबीचा फायदा होणार आहे.मात्र विकास करत असताना तो कोणत्याही परिस्थितीत पर्यावरण पूरक असला पाहिजे.पाणी प्रदूषित होता कामा नये. तसेच स्थानिक लोकांना या ठिकाणी रोजगार मिळाला पाहिजे. अशा सूचना पर्यटन विभागाला आपण दिल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.जल पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्था वृद्धिंगत करण्यास आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यास मोठा वाव आहे. स्थानिक बोट व्यावसायिकांना बोट खरेदीसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल, असे सांगून ते म्हणाले, या भागाच्या विकासासाठी मुख्यमंत्री स्वयंरोजगार प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. आपटी ते तापोळा तसेच कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र यांना जोडणारा रघुवीर घाटातील रस्ता या बाबीही प्राधान्याने पूर्ण करण्यात येत आहेत.
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, रोजीरोटी साठी गावापासून आई- वडिलांपासून, कुटुंबापासून, तरुणांना दूर जावे लागते. त्यांना रोजगारासाठी गाव सोडून जावे लागू नये, उलट गाव सोडून गेलेले पुन्हा आपल्या घरी यावेत, त्यांना स्थानिक स्तरावरच रोजगार उपलब्ध व्हावेत हा आपला उद्देश आहे. विकासात्मक काम करणारे शासन असल्यामुळे राज्यात अनेक पायाभूत प्रकल्प सुरू आहेत. एक लाख ३७ हजार कोटीचे प्रकल्पांचे दावस येथील उद्योग परिषदेमध्ये करार झाले आहेत. तीन लाख ९३ हजार कोटींचे उद्योग राज्यात येत आहेत. पाच लाख कोटींची गुंतवणूक आपण राज्याच्या विकासासाठी आणली आहे. उद्योग वाढीसाठी उद्योगांना सर्वतोपरी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी केले.यावेळी त्यांनी जल पर्यटन प्रकल्पामध्ये स्थानिकांनाच रोजगार मिळावा, त्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे, मुनावळे गावचे सातबारे खातेदारांच्या नावावर करून मिळावेत, अन्य उर्वरित रखडलेले प्रकल्पही मार्गी लावावेत, जलाशयात मासेमारीचे परवाने मिळावेत अशा मागण्या केल्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस पर्यटन विकास विभागाच्या कोयना जल पर्यटन केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांच्यासह अन्य मान्यवरांनी काउंटरवर तिकीट खरेदी केले.या कार्यक्रमात स्थानिक तरुणांना प्रातिनिधीक स्वरूपात रोजगाराची नियुक्तीपत्रे देण्यात आली.कार्यक्रमासाठी उपविभागीय अधिकारी सुधाकर भोसले, सरपंच श्रीभोसले, विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वाशी येथे आज महा मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील वाशी येथे दि. १० रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा.सुरेश दाजी बिराजदार, सौ. सवीता बिराजदार यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महिला दिनानिमित्त महा मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे सादरीकरण सबंध महाराष्ट्रात नावलौकिक असलेले महा मिनिस्टर फेम सादरकर्ते मा.कुमार देवकते, बारामतीकर हे करणार आहेत. या कार्यक्रमाची जय्यत तयारी झाली असून अनेक आकर्षक पैठण्या, व शेकडो बक्षीसांची लय लूट होणार आहे. हजारोंच्या संख्येने महिला कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत तरी जास्तीत जास्त माता-भगिनींनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी वाशी तालुका अध्यक्ष ॲड.सूर्यकांत सांडसे यांनी केले आहे. वाशी येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर सदरील महा मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन रविवार दिनांक 10 मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता करण्यात आले आहे. हा कार्यक्रम गृहिणींसाठी असून यात लकी ड्रॉ द्वारे आकर्षक पैठणी देण्यात येणारा असून पहिल्या येणाऱ्या विजेतीस फ्रिज व आकर्षक पैठणी असे बक्षीस असणार आहे. विविध खेळांच्या व स्पर्धांच्या माध्यमातून विजेत्या महिला स्पर्धकांना शेकडो बक्षिसांचे वितरण करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम महिलांसाठी विविध खेळ, नृत्य कला सादरीकरणाची पर्वणी असून मोठ्या संख्येने महिलांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** देशातील हवामानबदलाचे चक्र कायम असून एकाचवेळी ऊन, पाऊस आणि थंडी पाहायला मिळत आहे. ऐन हिवाळ्यात अवकाळी पावसाचे तांडव कायम होते. आता उन्हाळा सुरू झाला असताना अधूनमधून थंडी तर अवकाळी पाऊस सुरूच आहे. भारतीय हवामान खात्याने आता पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. उत्तरेकडील राज्यांमध्ये येत्या ११ ते १४ मार्चदरम्यान पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर काही ठिकाणी बर्फवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. वायव्य सीमेवरून प्रवेश करणारे पश्चिमी वाऱ्यांचे झोत प्रामुख्याने उत्तर अरबी समुद्रावरुन येत आहेत. यामुळे पुढील चार दिवस उत्तरेकडील राज्यांमध्ये अवकाळी पावसाची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. यामध्ये दहा ते बारा मार्च या कालावधीत उत्तराखंड या राज्यात हलक्या पावसासह बर्फवृष्टीची शक्यता आहे. १२ आणि १३ मार्चला पंजाबमध्ये तर १३ मार्चला हरियाणा, राजधानी दिल्लीसह पश्चिमी उत्तर प्रदेशात अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय या चार दिवसांच्या कालावधीत जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट-बलुचिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश या राज्यांत देखील पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्रात मात्र पश्चिमी वाऱ्याचा कोणताही परिणाम होणार नसून पाऊस आणि गारपिटीची शक्यता नाही. मात्र, उत्तरेकडील राज्यात ती परिस्थिती असल्यामुळे पहाटे गारवा वाढू शकतो, असेही हवामान खात्याने म्हटले आहे.



# गुन्हेगारी नियंत्रणासाठी सीपी लागले कामाला

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** शहरात ड्रग्ज, गांजा आणि अंमली पदार्थांची विक्री, खरेदी आणि तस्करी करणाऱ्यांची कुंडली काढण्यात आली असून 'ड्रग्जमुक्त शहर' अभियानासाठी पोलिसांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. विद्यार्थी आणि तरुणाईच्या उज्ज्वल भविष्यासाठी पोलीस दक्ष असून यानंतर शहरात एकाही गुन्हेगाराने ड्रग्ज विक्रीचा विचारही केल्यास त्याची खैर केली जाणार नाही, असा खणखणीत इशारा पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी दिला. त्यांनी शुक्रवारी 'लोकसत्ता' कार्यालयाला सदिच्छा भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते.शहरात हुक्का पार्लर, पब आणि बारमध्ये ड्रग्ज विक्रेते आणि तस्करांचे जाळे असते. विद्यार्थी-विद्यार्थिनी, तरुण-तरुणी सध्या अंमली पदार्थांच्या विळख्यात आहेत. शहरात ड्रग्ज तस्करांचा मुक्त वावर असल्यामुळे दिवसेंदिवस युवा पिढी नशेच्या गर्तेत जात आहेत. मात्र, पोलीस आयुक्त डॉ. सिंगल यांनी 'ड्रग्जमुक्त शहर' अभियानासाठी जीव ओतून काम सुरू केले आहे. त्यांनी ड्रग्ज प्रकरणाशी संबंधित विक्रेते, दलाल, ग्राहक आणि तस्करांची यादी तयार केली असून त्यांच्यावर 'वॉच' ठेवणे सुरू केले आहे. तसेच ड्रग्ज-गांजा विक्रीसाठी येणाऱ्या टोळ्यावर स्वतः पोलीस आयुक्तांनी 'वॉच' ठेवला आहे. यानंतर एकही आरोपी अंमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यात सापडल्यास तो आयुष्यभर पोलिसांना लक्षात ठेवेल, अशी कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त डॉ. सिंगल यांनी दिला. शहरातील बहुतेक नामांकित गुन्हेगार कारागृहात डांबले असले तरी नव्याने तयार होणाऱ्या गुन्हेगार युवक पोलिसांना आव्हान देत आहेत. परंतु, आता प्रत्येक गुन्हेगाराची कुंडली पोलिसांनी तयार केली आहे. बालगुन्हेगार म्हणजेच विधिसंघर्षग्रस्त बालकांना सुधारण्यासाठी पोलिसांकडून केअर मार्फत प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच त्यांच्या पालकांची समजूत घालण्यात येईल. नवगुन्हेगार निर्माण होऊ नये म्हणून वस्तीत शांतता समितीची बैठक घेण्यात येणार आहे. शहरातील बिघडलेली वाहतूक व्यवस्था ताळ्यावर आणण्यासाठी पोलीस प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करावे. शहरातील वाहतूक व्यवस्था सुस्थितीत आणण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलली आहेत. आता 'रॉंग साईड' वाहन चालवणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. बुलटेचे फटाके फोडणाऱ्यांना अद्दल घडवण्यात येईल तर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याचा प्रस्ताव आरटीओकडे पाठवण्यात येईल. दरवर्षी सरासरी ९० ते ९५ हत्याकांडाच्या घटना घडतात. मात्र, रस्ते अपघातात जीव गमावणाऱ्यांचा आकडा २८० वर गेला आहे. यावरून शहरातील हत्याकांडापेक्षा अपघातात ठार होणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे विद्यार्थी व तरुणांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे. त्यासाठी मी स्वतः नेतृत्व करून वाहतुकीच्या नियमांचे पालन करणाऱ्यांची संख्या वाढण्यासाठी प्रयत्न करणार, असेही आयुक्त डॉ. सिंगल म्हणाले. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात येईल. बलात्कार, विनयभंग आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या वाढत्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी दामिनी पथक, भरोसा सेल, सामाजिक सुरक्षा पथक, एएचटीयू पथक, निर्भया पथकांना मजबूत करण्यात येत आहे. महिलांविरुद्धच्या बहुतेक गुन्ह्यात आरोपींमध्ये कुटुंबातील सदस्य, नातेवाईक, प्रियकर, मित्र यांचा समावेश असतो.

# 80 कोटींच्या रस्ते कामाचे डॉ.भागवत कराड यांच्या हस्ते भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.कराड यांच्या विशेष प्रयत्नातून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी राष्ट्रीय कृषी ग्रामीण विकास बँक अर्थात नाबार्ड योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील मजबूत रस्ते ,डांबरीकरण साठी तब्बल 250 कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे.
ग्रामीण पायभूत सुविधा निधी अंतर्गत वैजापूर तालुक्यामध्ये रू. 80 कोटी इतका निधी मंजूर झाला असून,या निधी अंतर्गत जांबरखेडा फाटा ते उंदीरवाडी रस्ता डांबरीकरण 10 कोटी,मनुर ते बाभूळगाव 12 कोटी , धोंदलगाव ते भायगव 40 लक्ष पालखेड ते माळीसांगज चोरवाघलगाव 9 कोटी 40 लाख रु. रस्त्याचे डांबरीकरण,मजबुतीकरण इत्यादी कामाचे भूमिपूजन केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड,वैजापूरचे आमदार रमेश पाटील बोरणारे यांच्या शुभहस्ते आज करण्यात आले.
या भूमिपूजन प्रसंगीभाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय खंबायते ,महिला अध्यक्ष जयमाला ताई वाघ,जिल्हा बँकेचे संचालक रामहरी बापू जाधव, जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे ,प्रदेश कार्यकारणी सदस्य एकनाथ जाधव ,जिल्हा सरचिटणीस दिनेश परदेशी, ज्ञानेश्वर जगताप ,कैलास पवार,शिवसेना शिंदे गटतालुका अध्यक्ष राजेंद्र साळुंके ,अशोक शेळके, पंचायत समिती माजी सभापती बाबसाहेब जगताप, भाजपा तालुका अध्यक्ष नारायण कवडे ,ठेकेदार अतुल निकम,हरेश पलेजा,अभियंता रोडगे,कैलास पवार,सुनील पैठणपगारे,नारायण तुपे,सरपंच रामभाऊ चौधरी, धनजय धोर्डे,दामोधर परिक , चुडीवाल,बारसे योगेश पवार,मोहन आहेर ,गुंजाळ नाना,नारायण कवडे,नारायण तुपे, कचरु डिके,कैलास पवार,कल्याण दांगोडे,अंकुश हिंगे यांच्यासह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते
माजी नगराध्यक्ष श्री.दिनेश परदेशी यांनी सांगितले की,या भागामध्ये अतिवृष्टी झाली त्यावेळेस रस्त्याची डॉ.भागवत कराड यांनी पाहणी केली त्याचवेळी मुख्य अभियंता उकिरडे यांचे समवेत चर्चा करून हा रस्ता नाबार्डमध्ये घेण्यात यावा,असेआदेश दिले आणि आज या रस्त्याचे कामाचे भूमिपूजन करताना मला आनंद होत आहेत. वैजापूर तालुक्यासाठी 80 कोटी रुपयांचा निधी रस्ते केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड यांनी विकासासाठी दिला आहे.
आमदार रमेश बोरनारे यांनी असे मत व्यक्त केले की,दीड वर्षापासून राज्यात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वखालील अजित दादा ,देवेंद्र फडणवीस यांचा ट्रिपल इंजिनचे सरकार राज्यात आहे. वैजापूर तालुक्यामध्ये विकास कामांसाठी मोठा निधीही उलबध झाला आहे . यापूर्वी काळात तालुक्यात ग्रामीण रस्त्याची परिस्थिती अत्यंत बिकट होती.रस्ते करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहे. माझ्या आमदारकीच्या काळात एकाच वेळेस दहा के.टी वेंअर मंजूर केले आहे.
डॉ.कराड यांनी भूमिपूजन प्रसंगी सांगितले की,जनतेच्या करातून पैसा विकास कामासाठी वापरण्यात येतो त्यामुळे अधिकाऱ्यांनी रस्त्याच्या कामाचा दर्जा चांगला ठेव.मागील वर्षी अडीचशे कोटी रुपये मंजूर केले त्यापैकी वैजापूर तालुक्यासाठी रू.80 कोटी रुपये ठेवण्यात आलेले आहेत. यावर्षीही साडेतीनशे रुपये प्रस्तावित आहेत. शेतकऱ्यांच्या अडचणीची मला जाणीव आहे. शेतकरी सुखी झाला तर देशाचं आर्थिक विकास होतो.शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सरकारने अनेक योजना राबविल्या आहेत यामध्ये पीएम सन्मान योजना असो की आवास योजना ,युरिया खते मुबलक प्रमाणात आहे आजही युरिया किमती स्थिर आहे.जलजीवन मिशन साठी चार हजार कोटी रु दिले आहे.शिवना टाकळीसाठी रू.450 कोटी प्रस्तावित आहे.देवगाव रंगारी ते शिवुर बंगला नॅशनल हायवे करून काम सुरू आहे
सर्व कामाचे ठेकदार यांनी रस्त्याचे कामे चांगली ,दर्जेदार कराअन्यथा मी स्वतः तक्रार करेल, त्यामुळे सर्व रस्त्याची कामे चागली करा अशा सूचना डॉ. कराड यांनी यावेळी बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांना दिल्या.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपा वैजापूर तालुका अध्यक्ष नारायण कवडे यांनी केले.



# चांदेकसारे हायस्कूल इमारत बांधण्यासाठी सापडला मुहूर्त

## रमेशगिरी महाराज यांच्या हस्ते पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**किसन पवार**

**कोपरगाव :** चांदेकसारे येथील भारत सर्व सेवा संघाची न्यू इंग्लिश स्कूल स्थानिक स्कूल कमिटी यांच्या अनेक वर्षाच्या न्यायालयीन लढाईनंतर त्यांच्या बाजूने न्यायालयाने निकाल दिला व आलेला सर्व निधी वापरण्याचा मार्ग मोकळा झाल्यामुळे नुकताच या नवीन इमारतीचा भूमिपूजन समारंभ संत जनार्दन स्वामी आश्रमाचे मठाधिपती रमेश गिरी महाराज यांच्या हस्ते व आमदार अशुतोष काळे, स्थानिक पुढारी व कार्यकर्ते यांचे उपस्थितीत संपन्न झाला. न्यू इंग्लिश स्कूल चांदेकसारे च्या जमिनीचा व इमारतीचा वाद छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात दाखल होता त्यावर निकाल आला मात्र त्यामध्ये भारत सर्व सेवा संघाची न्यू इंग्लिश स्कूल स्थानिक स्कूल कमिटी यांच्या बाजूने निकाल आलेला असला तरी चांदेकसारे ट्रस्ट व स्थानिक कमिटी यांच्या वादात विद्यार्थ्यांचा मात्र पत्र्याच्या खोलीत अनेक वर्षे शिक्षण घेऊन जीव टांगणीला लागल्याच्या तीव्र भावना जनतेतून उमटल्या आहेत. आणि तसे लोक खाजगीत चर्चा देखील करत आहेत. तुमच्या भांडणाचे काहीही होऊ द्या परंतु आमच्या मुलांना वेठीस धरून पैसा असताना मात्र पत्र्याच्या खोलीत शिक्षण घ्यायला भाग का पाडता



असा सवाल नागरिक करत होते त्याला आता पूर्ण विराम मिळाला आहे. या सर्व घटनेवर दृष्टीक्षेप टाकला तर दोन नेत्यांच्या आपसातील भांडणामुळे या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना याची खूप मोठी किंमत चुकवावी लागली आहे. २००८ साला पासून हा वाद सुरू झाला एक भारत सर्व सेवा संघाची स्थानिक स्कूल कमिटी चे त्या वेळचे सदस्य शंकर चव्हाण, अध्यक्ष सुनील होन व दुसरे चांदेकसारे न्यू इंग्लिश स्कूल कमिटी ट्रस्ट कडून संजय होन परंतु जोपर्यंत हा वाद फक्त दोन नेत्यांमध्ये यांच्या पुरता मर्यादित होता तोपर्यंत त्याची झळ विद्यार्थी व पालकांना बसलेली नव्हती परंतु मुंबई नागपूर समृद्धी महामार्गासाठी सर्वेक्षण झाल्यानंतर चांदेकसारे न्यू इंग्लिश स्कूलची जमीन व इमारत या महामार्गामध्ये बाधित होणार व त्याचा मोठा मोबदला मिळणार हे निश्चित झाल्यानंतर या भांडणाला जास्तच धार चढली व दोन्हीही नेत्यांनी ही लढाई प्रतिष्ठेची केली. दरम्यान जमीन व इमारतीच्या भरपाई पोटी शासनाकडून २ कोटी ७२ लाख रुपये भरपाई निश्चित झाल्यावर ती रक्कम कोणाकडे सुपूर्द करायची यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. दोन्हीही नेत्यांनी ही लढाई धर्मदाय आयुक्त, कोपरगाव न्यायालय व शेवटी छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालय येथ पर्यंत लढली. दरम्यानच्या काळात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे मिळालेली भरपाईची रक्कम ही न्यायालयाचा आदेश होईपर्यंत स्थगित ठेवण्यात आली होती. परंतु समृद्धी महामार्गाचे काम युद्ध पातळीवर सुरू झाल्यामुळे व शासनाकडून मोबदला निश्चित झाल्यामुळे सदर इमारत पाडण्यात आली त्यामुळे लगेचच विद्यार्थ्यांना बसण्याचा प्रश्न उपस्थित झाल्यामुळे स्थानिक स्कूल कमिटीने विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पत्र्याच्या खोल्या बांधल्या त्या खोल्यांमध्ये विजेची व्यवस्था नाही व अतिशय उष्ण व कोंदट वातावरणात त्रास सहन करून गेल्या चार वर्षापासून विद्यार्थी नाईलाजाने शिक्षण घेत आहेत. यावर तोडगा निघावा म्हणून अनेकांनी प्रयत्न केले परंतु त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले. शेवटी न्यायालयाचा निकाल मात्र भारत सर्व सेवा संघाची न्यू इंग्लिश स्कूल स्थानिक कमिटी चांदेकसारे च्या बाजूने आल्यामुळे इमारत बांधकामाचा मार्ग मोकळा झाला होता. या सर्व कालावधीमध्ये शाळेच्या मूलभूत सोयी सुविधा व शैक्षणिक दर्जा याकडे मात्र दुर्लक्ष झाल्याचे जाणवले शासनाच्या वेगवेगळ्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये येथील विद्यार्थी जास्त चमकल्याचे दिसून आले नाही. या शाळेतील एक दोन अपवाद वगळले तर मुख्याध्यापकासह जवळपास सर्वच शिक्षक हे आपापल्या सोयीने बाहेरगावी राहतात काही तालुक्याच्या ठिकाणी वास्तव्यास आहेत तर काही आपल्या मूळ गावी राहून ७० किलोमीटर रोज प्रवास करून सेवा देतात त्यामुळे त्यांचे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर खरोखर किती लक्ष आहे हा एक संशोधनाचा विषय आहे.

या सर्व वादातीत काळात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व पर्यायाने त्यांच्या पालकांना मात्र मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले हे वास्तव नाकारता येणार नाही आणि येणाऱ्या काळात रक्कमेचा योग्य विनियोग होऊन चांगली सुसज्ज व सर्व सोयीनियुक्त अशी इमारत उभी राहून येणाऱ्या पिढ्यांसाठी त्याचा फायदा होईल अशी अपेक्षा मात्र जनसामान्यातून व्यक्त होत आहे.

प्रत्यक्षात ही जमीन स्व. नामदेव विश्वनाथ आढेराव यांनी त्यांचे मालकीच्या गट नंबर १४१/३२२/१ मधील १ हेक्टर ६१ आर इतके क्षेत्र या विद्यालयासाठी बक्षीस म्हणून दिलेले आहे. बक्षीस पत्रामध्ये बक्षीस जमिनीवर इमारत उभी राहिल्यानंतर तिला दान देणारे स्व. नामदेव विश्वनाथ आढेराव यांचे नाव द्यावे असे बक्षीस पत्रात स्पष्ट नमूद केलेले असताना देखील त्यांचे नाव अजून पर्यंत दिले गेलेले नसल्याची खंत त्यांचे नातू व सध्याचे स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष सुनील होन यांनी बोलून दाखवली.



# 'धोंडा' एकांकिका हवेली विभागात प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** पुणे जिल्हा परिषद अंतर्गत यशवंतराव चव्हाण आंतरशालेय नाट्य स्पर्धेमध्ये हवेली तालुक्यातील सिंहगड पायथ्याशी स्थित न्यू इंग्लिश स्कूल खामगाव मावळ विद्यालयाच्या'धोंडा' एकांकिकेस पश्चिम विभागातून प्रथम क्रमांक मिळाला.तसेच विद्यालयातील विद्यार्थिनी पिलावरे वैष्णवी विजय हिला उत्कृष्ट अभिनयासाठी प्रथम तर नाट्य संहिता लेखन व दिग्दर्शनाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक सहशिक्षक राहुलकुमार चव्हाण यांना देऊन सन्मानित करण्यात आले. कुमारवयीन मुलाच्या शिक्षणावर समाजातील रूढी परंपरेवर भाष्य करणाऱ्या धोंडा या एकांकिकेचे लेखन दिग्दर्शन विद्यालयातील सहशिक्षक राहुलकुमार चव्हाण तर विशेष मार्गदर्शन विद्यालयातील सहशिक्षक पोपट जाधव यांनी केले. विद्यार्थिनींनी मिळवलेल्या या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सचिव व पुरंदर हवेली चे लोकप्रिय कार्यक्षम आमदार संजय जगताप,संस्थापक सचिव डॉ.एम.एस.जाधव, सहसचिव गवळी साहेब,व्यवस्थापक अमराळे सर, विद्यालयाचे मुख्याध्यापक लक्ष्मण गोळे यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# आपेगावात घाटाच्या कामाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तिर्थक्षेत्र पर्यटन विभागाअंतर्गत तत्कालीन मंत्री अदित्य ठाकरे याच्या कार्यकाळात आपेगावात विरोधीपक्ष नेते आंबादास दानवे यांच्या प्रयत्नामुळे संत ज्ञानेश्वरमहाराज जन्मभूमी श्रीक्षेत्र आपेगाव येथे मंदिर पाठमागे गोदावरीच्या तीरावर घाटाच्या बांधकाम,दिपस्थंभ,किर्ती स्तंभासाठी साडेतीन कोटी व भक्तनिवास येथे गार्डन व सुशोभीकरणासाठी दिड कोटी असा एकुण पाच कोटी तीस लाख निधी उपलब्ध करण्यात आला होता .त्याअनुषंगाने विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांच्या हस्ते शनिवार 9 मार्च रोजी सुरू असलेल्या घाटाच्या कामाचा भुमीपुजन करण्यात येणार होता परंतु काही शासकीय कामानिमित्त दानवे हे येवू शकले नाही .परंतु शिवसेना उ,बा,ठा तर्फे शिवसेना नेते दत्तात्रय गोर्डे ,तालुक अध्यक्ष मनोज पेरे,यांनी या कामाचे नारळ फोडून भुमीपुजन केले. यावेळी शिवसेना उ,बा,ठा नेते,दत्तात्रय गोर्डे, शिवसेना तालुकाध्यक्ष मनोज पेरे,संत एकनाथचे व्हॉचेअरमन प्रल्हाद औटे, माजी व्हॉचेअरमन अंकुश रंधे,बद्रीनाथ भुमरे,शहराध्यक्ष अजय परळकर, राखी परदेशी,राजु परदेशी,आप्पासाहेब गायकवाड,आतिष गायकवाड कल्याण मगरे,नंदु वैद्य,माजी सरपंच आशोक औटे, चेअरमन सुनील औटे,आण्णासाहेब ठेणगे,सह पदाधिकारी यांची उपस्थिती होती.



# वीज कर्मचाऱ्यांचा संप अखेर स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समितीची शनिवारी उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत नागपुरातील देवगिरी या निवासस्थानी बैठक झाली. येथे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढ व वेतन थेट बँक खात्यात करण्यासह इतरही आश्वासन मिळाले. त्यामुळे कृती समितीने तुर्तास संप स्थगित केला. ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत राज्य वीज नियामक आयोगाचे नियम तपासून तिन्ही कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांशी चर्चा केली जाईल. वर्षानुवर्षे सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही वीज कंपन्यांमध्ये नोकरीत प्राधान्य मिळावे म्हणून वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत वाढवून सेवाज्येष्ठतेनुसार अतिरिक्त गुण देण्याचे प्रयत्न केले जातील. आयटीआय नसलेले परंतु वर्षानुवर्षे सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेवरून कमी न करता त्यांना वीज कंपन्यांकडून विशेष अभ्यासक्रम उपलब्ध करून त्याचे प्रमाणपत्र देत सेवेवर ठेवले जाईल. कंत्राटदार रहीत कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी समितीचे काम सुरू आहे. अहवालानंतर निर्णय घेतला जाईल. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन थेट बँक खात्यात करण्यासाठी व्यवस्था निर्माण केली जाईल.





# गिरिजा मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने कमी

आधुनिक केसरी न्यूज

**चाँद खाँ पठाण**

**खुलताबाद :** येसगाव नं२ येथील गिरिजा मध्यम प्रकल्प येसगाव येथील धरणातील पाणी साठा झपाट्याने कमी झाले असुण दहा अकरा टक्क्यांवर पाणी साठा शिल्लक राहिला आहे.तर प्रकल्प परिसरात येथील संबंधित कार्यालय कुलुप बंद रहात असल्याचे चित्र आहे. गतवर्षी नाममात्र पावसाळा राहिला पुर्ण पावसाळ्यात एकही पुरपाणी गिरिजा मध्यम प्रकल्पात आला नाही.मात्रशाखा शेवटच्या टप्प्यात म्हैसमाळ क्षेत्रात जेथून गिरीजा नदीचा उगम आहे.तेथे अवकाळी पावसाने ढगफुटी सारखी प्रक्रिया घडल्याने गिरिजा मध्यम प्रकल्पात मोठा पाणी साठा अंदाजे ३५-४०टक्के पाणी साठा जमा झाला होता. परंतु पुन्हा पाचसहा महिन्याच्या काळांत पाणी साठ्यातून बाष्पीभवनमुळे वारा उन्हामुळे पाणी उपशामुळे प्रकल्पांत ३५-४०टक्केवरुन केवळ १०-११टक्के पाणी साठा शिल्लक राहिला आहे.जेव्हांकी पावसाळ्याला तीन महिने बाकी आहे.याच गिरिजा मध्यम प्रकल्प येसगाव नं२ येथून खुलताबाद शहर खुलताबाद ग्रामीण, फुलंब्री तालुक्यातील काही गावे यांना याच प्रकल्पांतून पिण्यासाठी शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यात येतो.पाणीसाठा शेवटच्या टप्प्यात असताना महसूल विभाग पाटबंधारे विभाग झोपेत आहे तर पाणी साठा झपाट्याने कमी होत आहे.तर येथील पाटबंधारे शाखा कार्यालय केव्हां बंद असल्याचे दिसून येते. येथे किती कर्मचारी कार्यरत आहे,शाखाभियंता आहे नाही हे सर्व वरिष्ठ कार्यालय व शासनालाच माहित ? शिल्लक पाणी साठा, पाणी टंचाई बघता महसूल विभाग मा. तहसीलदार, नगरपालिका सिओ, पाटबंधारे विभाग यांनी यांकडे लक्ष घालून तालुक्यातील नागरिकांसाठी पाणी टंचाई होऊ नये म्हणून लक्ष घालावे असी मागणी नागरिकांतून होत आहे.

# नेवासा येथे महाशिवरात्री मध्यमेश्वर मंदिरात दर्शनासाठी हजारो भाविकांची गर्दी

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** शहराच्या पूर्वेस प्रवरानदीकाठी पुरातन महिमा असलेल्या मध्यमेश्वर मंदिरामध्ये मंदिराचे मठाधिपती वैराग्यमूर्ती बालयोगी महंत श्री ऋषिनाथजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक कार्यक्रमाने महाशिवरात्रीचा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास महंत ऋषिनाथजी महाराज यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात दुग्धाभिषेक,रुद्राभिषेक,जलाभिषेक घालण्यात आला.यावेळी हर हर महादेवचा गजर करण्यात आला. त्यानंतर योगी मनोहरनाथबाबांच्या मूर्तीची विधीवत पूजा करण्यात आली. यावेळी श्री मध्यमेश्वर भक्त मंडळ,योगी मनोहरनाथबाबा भक्त मंडळ व दात्यांच्या योगदानातून दिवसभर दर्शनासाठी आलेल्या भाविकांना शाबुदाना खिचड़ी महाप्रसादाचे वाटप भाविकांना करण्यात आले.
मध्यमेश्वर मंदिराचे महंत श्री ऋषिनाथजी महाराज यांनी दिवसभरात आलेल्या भाविकांनी स्वागत केले. ब्रम्हलिन गुरुवर्य मनोहरनाथजी बाबा यांच्या कृपा आशीर्वादाने पुरातन महती असलेल्या मध्यमेश्वर या पवित्र स्थानाच्या विकासासाठी अनेकांनी योगदान दिले आहे या क्षेत्राच्या विकासासाठी पुढे येण्याचे आवाहन बालयोगी ऋषिनाथजी महाराज यांनी यावेळी बोलताना केले.

नेवासा शहरातील प्रवरानदी तिरी असलेल्या श्री काशीविश्वेश्वर मंदिरामध्ये वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला. नेवासा शहरातील हजारो भाविकांनी याठिकाणी दर्शनासाठी गर्दी केली होती
यावेळी झेंडा मिरवणुक काढून मंदिरावर युवकांच्या वतीने ध्वजारोहण करण्यात आले तसेच तरुण मंडळींनी एकत्रित येऊन भाविकांसाठी फराळाचे वाटप केले.यावेळी महिला सुवासिनींनी बेलफळ अर्पण करून मनोभावे कापुरवाती लाऊन शिवउपासना केली हर हर महादेवच्या गजराने यावेळी प्रत्येक शिवालये दुमदुमली होती.रात्री उशिरापर्यंत भाविकांच्या दर्शनासाठी ओघ सुरूच होता.



# भोळी येथील शाळेत महिला दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून भोळी ता.खंडाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास मोकळा श्वास महिला विकास संस्थेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षा सपना भोसले, पत्रकार रोहिणी साळुंखे, प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या खंडाळा तालुका अध्यक्ष समिना शेख,मोकळा श्वास विकास संस्थेच्या सचिव नूजत इनामदार आदीं मान्यवर उपस्थि होते. राष्ट्रमाता जिजाऊ, राजमाता अहिल्यादेवी होळकर तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.महिलांनी आपल्या मुलांकडे का लक्ष द्यावे, त्यांच्यावर चांगले संस्कार करण्याची का गरज आहे. तसेच मुलांना मोबाईल मुळे होणारे दुष्परिणाम, स्त्रीशक्ती कशी वाढवावी. महिलेने महिलेचा सन्मान कसा करावा याबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात आले. शासनाच्या महिलांविषयी विविध योजनेची माहिती मान्यवरांनी मांडली तसेच विद्यार्थ्यांच्या वतीने संस्कृती चव्हाण व ज्ञानेश्वरी गायकवाड यांनी स्त्री जीवनावर भाषण केले.सपना भोसले यांच्यावतीने सॅनिटरी पॅडस चे वाटप सर्व महिलांना करण्यात आले.तसेच बाल वाचनालयासाठी पाच हजार रुपयाची पुस्तके अभिषेक चौधरी यांनी शाळेला दिली. ग्रामपंचायत सदस्या मोनिका चव्हाण यांनी सर्व महिला भगिनींचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.भोळी ग्रामपंचायत माजी उपसरपंच व तनिष्का महिला संघाचे अध्यक्ष पद्मा अजिंक्य चव्हाण यांच्या कडून शाळेतील सर्व मुले व महिलांना अल्पोपहार देण्यात आला तर शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष शैला चव्हाण यांनी चहा देऊन सर्वांचे तोंड गोड केले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनंत चव्हाण,संतोष नेवसे, प्रथम संस्थेच्या मयुरी पवार,न्यू इंग्लिश स्कुल भोळी च्या मुख्याध्यापिका मोटे मॅडम,अंगणवाडी शिक्षिका नीलम अ चव्हाण, ग्रामपंचायत सदस्या नीलम चव्हाण उपस्थित होत्या.शाळेच्या उपशिक्षिका स्वाती मोहिते यांनी सूत्रसंचालन केले. माजी उपसरपंच पद्मा चव्हाण यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.



# व्यापाऱ्यांच्या मागे खबीरपणे उभा : आ. गडाख


आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** सोनईची बाजारपेठ खुलण्यासाठी व आर्थिक विकास होण्यासाठी व्यवसाय महत्वाचा असून त्यासाठी मी व्यापाराच्या पाठीशी खबीरपणे उभे राहील अशी ग्वाही माजी मंत्री आ. शकरराव गडाख यांनी दिली. आ. गडाख हे व्यापारी सघटनेच्या फालकाच्या अनावर प्रसंगी बोलत होते. सर्व जाती धर्माची लोक व्यवसाय करत असताना सुरक्षा हमी महत्वाची असल्यामुळे विकास साधुन वैभव प्राप्त झाले आहे. सघटनेचे उपाध्यक्ष सुभाष राख म्हणाले की,गावात आगामी काळात व्यापारची समस्या आ.गडाख यांच्या माध्यमातून सोडवू, तसेच गांव बंद करण्याचा कोणीही प्रयत्न करू नये. व्यापारी सघटना एकजुट करुन दर महिन्याला सवाद साधू, सर्व ताकद लावू. यावेळी अध्यक्ष संतोष शिरसागर, सरपंच धनजय वाघ,कार्यकर्ते जालिंदर एळवंडे, भारत गडाख, पंचायत समिती सदस्य काका डफाळ,माजी सरपंच राजेंद्र बोरुडे, माजी सरपंच भरत बेल्हेकर,उद्धव आव्हाड़, भाउराव चादगोड़े, अकुश आदमाने, दिपक कचरे,इसाक शेख आदी उपस्थित होते.

# भारत जोडो न्याय यात्रेची १७ मार्चला सांगता; शिवाजी पार्कवर जाहीर सभा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो न्याय यात्रे'ची रविवारी १७ मार्चला मुंबईत शिवाजी पार्कवर जाहीर सभेने सांगता होणार आहे. त्यावेळी इंडिया आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. या सांगता सभेतच लोकसभा निवडणूक प्रचाराचे बिगुल फुंकले जाणार आहे. त्यादृष्टीने प्रदेश काँग्रेसने जोरदार तयारी सुरू केली आहे.
खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो न्याय यात्रा १२ मार्चला नंदूरबार येथून महाराष्ट्रात प्रवेश करेल व १७ मार्चला मुंबईत समारोप होणार आहे. मुंबईतील शिवाजी पार्कवर न्याय यात्रेची सांगता सभा होणार आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.
भारत जोडो न्याय यात्रेच्या तयारीसाठी राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक पार पडली. राहुल गांधी यांचे नंदुरबार ते मुंबई या प्रवासात अनेक कार्यक्रम होतील व त्यासाठी त्या-त्या भागातील नेत्यांना जबाबदाऱ्या दिल्या आहेत.
शिवाजी पार्कवर सभा घेण्यासाठी परवानगी मागितली होती व ती मिळाली आहे. भारत जोडो न्याय यात्रा छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या भूमीत येत आहे. या महापुरुषांच्या विचारांना संपवण्याचे काम केंद्रातील व राज्यातील भाजप सरकार करत आहे. भाजप लोकशाही व संविधान संपवायला निघाले आहे परंतु त्यांना जशास तसे उत्तर देण्याची आमची तयारी आहे, असे पटोले यांनी म्हटले आहे.
शिवाजी पार्कवर सभेसाठी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने परवानगी दिली आहे. राहुल गांधी यांच्या सभांना काही राज्यांमध्ये परवानगी नाकारण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर शिवाजी पार्कच्या सभेसाठी लवकर परवानगी मिळण्याबाबत काँग्रेस नेते साशंक होते. पण सरकारने परवानगी दिली आहे.



आकाशात विविध रंगांची उधळण करणारा सूर्य टिपलाय आमचे प्रतिनिधी शाम हेडाऊ यांनी.

# संगमेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त यात्रोत्सव

आधुनिक केसरी न्यूज




गोकुळसिंग राजपूत

**जामनेर :** पहूर - येथील देवळी आणि गोगडी या पवित्र नद्यांच्या संगमावर वसलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्री निमित्त आयोजित यात्रोत्सवास भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळाला छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर सकाळी श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शिवभक्त रंगनाथ महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण करून यात्रोत्सवाला प्रारंभ झाला प्रारंभ झाला. श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर येथे गेल्या १९ वर्षांपासून शिव महापुराण कथा व अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह सुरू आहे. पहूर आणि पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले संगमेश्वर महादेव मंदिर सकाळपासूनच गर्दीने फुलले होते. सकाळी माजी पंचायत समिती सभापती बाबुराव घोंगडे व सहकाऱ्यांनी भाविकांना साबुदान्याचा प्रसाद वाटप केला. हरिभक्त परायण रमेश महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून शिव महापुराण कथा पारायण करण्यात येत आहे . श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर यात्रेत परिसरातील व्यावसायीकांनी पुजा - प्रसाद , खेळणी , शितपेय, फराळ , गृहपयोगी वस्तूंची दुकाने थाटली होती.पहूर गावात यात्रोत्सव सुरू झाल्याने भाविकांनी आनंद व्यक्त केला . यशस्वीतेसाठी श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे उपाध्यक्ष प्रदीप लोढा, सचिव हरिभाऊ राऊत विश्वस्त अशोक जाधव, किशोर बनकर, माधव घोंगडे, सुरेश राऊत, ईश्वर हिवाळे, मयुर करंकार यांच्यासह ग्रामपंचायत पहूर कसबे सरपंच आशाताई जाधव, पहूर पेठ सरपंच अबू तडवी, सर्व ग्रामस्थांचे भाविक परिवाराचे सहकार्य लाभत आहे. याप्रसंगी यात्रेत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पहूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन सानप व सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# महिला समुपदेशन केंद्राच्या वतीने कायदेविषयक शिबिर

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील पळसखेडा येथे दिनांक 8 रोजी जागतिक महिला दिनानिमित्त वाकोद मधील पळसखेडा या गावी महिला समुपदेशन केंद्र सिल्लोड पोलिस स्टेशन ( शहर) व अभय केंद्र सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व मुलींना कायदेविषयक जाणीवजागृती निमित्त मार्गदर्शन व कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रम प्रमुख पाहुणे म्हणून संरक्षण अधिकारी श्री. कळम सर यांची उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पळसखेडा गावातील महिला सरपंच राधाबाई राजू रेकलोत या होत्या. कार्यक्रमाची सुरवात हिंदवी स्वराज्याच्या संस्थापिका राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला समुपदेशन केंद्राचे समुपदेशन विशाल पाईकराव यांनी केले. विशाल पाईकराव यांनी महिला समुपदेशन केंद्र कश्या पद्धतीने कार्य करते. महिलांचे प्रश्न कश्या प्रकारे सोडवले जातात या विषयी सखोल अशी माहिती सांगितली. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कळम सर यांनी महिला व बाल विकास योजने अंतर्गत चालणाऱ्या 0 ते 18 वर्ष वयोगटातील मुलांसाठी विविध योजना राबवल्या जातात त्या विषयी माहिती सांगितली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था चे प्रकल्प अधिकारी उमाकांत बोर्ड सर यांनी मुलींच्या शिक्षणासाठी बार्टी, टार्टी, सारथी यासारख्या संस्था कार्यरत आहे व त्याच्या फायदा कसा करून घेता येईल या विषयी सांगितले. महिला समुपदेशन केंद्राच्या समुपदेशक आरती जाधव यांनी यांनी मनोगत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल जैन यांनी केले तर उपस्थित मान्यवर महिलांचे आभार श्री बारी सर यांनी मानले. यावेळी गावातील पोलिस पाटील गोंघडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. गावातील महिलांचा सहभाग यामध्ये दिसून आला. बार्टी चे समतादुत मनोहर अपार, उमाकांत बोर्ड. बारी सर, महिला समुपदेशक केंद्राचे समुपदेशक विशाल पाईकराव व आरती जाधव, सपोनि पंकज बारवाल सोयगाव,राहुल जैन गावातील प्रतिष्ठित मंडळी यांची यावेळी उपस्थिती होती. उपस्थित सर्व महिलांचा पुष्प देऊन महिला दिनानिमित्त सन्मान करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली अशी माहिती विशाल पाईकराव यांनी बोलताना दिली.

# प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्व विद्यालयात महाशिवरात्री उत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय परिसरात असलेल्या प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय (ओम शांती केंद्र) येथे शिवध्वजपूजन करून विविध अध्यात्मिक कार्यक्रमाने महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी ओम शांती केंद्राच्या नव्याने बांधण्यात आलेल्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमप्रसंगी ओम शांती केंद्राच्या प्रमुख राजयोगिनी ब्रम्हाकुमारी सरला दीदी म्हणाल्या की महाशिवरात्रीच्या निमित्ताने शिव परमात्मा यांचे या धरतीवर दिव्य अवतरण झाले आहे कलियुगाच्या अज्ञान अंधकाराच्या रात्रीमध्ये येऊन ज्ञानाचा प्रकाश शिव परमात्मा देत आहेत.याचीच आठवण म्हणून त्यांची शिवरात्री साजरी केली जाते त्या दिवशी आपण उपवास करतो उपवासाच्या दिवशी आपण जास्तीत जास्त ईश्वरचिंतन केले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

शिवलिंगावर जी त्रिपिंडी आहे त्याचे अध्यात्मिक रहस्य म्हणजे ब्रम्हा,विष्णू आणि शंकर या त्रि-देवतांचे शिव परमात्मा रचयिता आहेत म्हणून शिवलिंगावर त्रिपिंडी दाखवली जाते आणि शिवांना त्रिमूर्ती शिव असेही म्हटले जाते.

यावेळी झालेल्या महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने पुष्पांनी तयार करण्यात आलेल्या शिवलिंगाचे उपस्थित साधकांनी दर्शन घेतले. या कार्यक्रम प्रसंगी ब्रम्हाकुमारी वंदनीय वंदनादीदी,वंदनीय मुकेशभाई, संभाजीराव पवार,पत्रकार सुधीर चव्हाण,पत्रकार बाळासाहेब देवखिळे,आदर्श शिक्षक वसंतराव मुंगसे गुरुजी,रामभाऊ खंडाळे सर, विशाल पिंपळे,प्रतीक शेजुळ,दिलीप शेटे,नगरसेविका डॉ.निर्मला सांगळे, भाजप महिला आघाडी तालुकाध्यक्षा भारती बेद्रे,रोहिणी शेंडगे, सरिता जाधव,राधा धनवटे,ताराबाई कुसळकर, सौ.शैलाताई मोरे,सौ. आशाताई बेहळे,जयश्री जाधव, रामचंद्र बर्डे,सचिन लोखंडे यांच्यासह भक्त परिवारातील साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमिला दीदी क्षीरसागर यांनी केले तर राजयोगिनी वंदना दीदी यांनी उपस्थित भाविकांचे आभार मानले.



# भाजप महाराष्ट्र जैन प्रकोष्ठ सहसचिवपदी विनोद संकलेचा

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** येथील भाजपचे विनोद संकलेचा यांच्या कामाची दखल घेऊन भाजपचे प्रदेश अध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार भाजपचे जैन प्रकोष्टचे अध्यक्ष संदीप भंडारी यांनी विनोद संकलेचा यांची महाराष्ट्र प्रदेश सहसचिवपदी नुकतीच नियुक्ती केल्याचे पत्र दिले असून तसेच भाजप शिर्डी लोकसभा व्यापारी आघाडीच्या प्रमुखपदी देखील निवड काही दिवसांपूर्वी झाली आहे विनोद संकलेचा हे बालपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असून शिर्डी येथील अग्रगण्य श्री साई समर्थ पतसंस्थेचे चेअरमन तसेच शिर्डी येथील रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य असून नगर जिल्ह्यात भाजपचे पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी त्याचे मोठे काम असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची ध्येय धोरणे विकास योजनाचा माहिती लोकापर्यंत पोहचवण्यासाठी ते सक्रिय असतात त्याच्या निवडीबद्दल पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील भाजपचे जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे माजी नगराध्यक्ष शिवाजी गोदकर राजेंद्र गोदकर संचिन शिंदे माजी विश्वस्त संचिन तांबे नितीन कापसे नंदकुमार जेजुरकर संदीप पारख सुधीर शिंदे यांनी आभिनदन केले असून निवडी बद्दल नगर जिल्ह्यात समाधान व्यक्त केले जात आहे संकलेचा म्हणाले आपल्या कामाची दखल घेऊन पक्षाने जी जवाबदारी दिली ती पार पाडण्यासाठी आपण प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे सांगितले.

# शेतकऱ्यांनी ई-केवायसी केली तर मिळणार लाभ : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांचे नोव्हेंबर-२०२३ मध्ये सलग पाच दिवस झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांसाठी पहिल्या टप्प्यातील १ कोटी ९३ लाख २ हजार रुपये वर्ग करण्यात आले आहेत; परंतु यासाठी शेतकऱ्यांच्या बँक खात्याची 'ई- केवायसी' अनिवार्य आहे. त्यामुळे ई-केवायसी नसलेल्या शेतकऱ्यांना तूर्तास याचा लाभ मिळणार नाही अशी माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले. सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात दिलेल्या तडाख्यात ७७३ अवकाळीने हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी १ हजार ७०० शेतकऱ्यांसाठी नुकसानभरपाईपोटी ३ कोटी २९ लाख इतक्या निधीला राज्य आपत्ती प्रतिसाद विभागाने मंजुरी दिली आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २४ गावांतील ९९९ शेतकऱ्यांना १ कोटी ९३ लाख इतकी रक्कम शासनाच्या ई पंचनामा पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. त्यामुळे नुकसानभरपाईसाठी शेतकऱ्यांना ई- केवायसी करणे अनिवार्य आहे. दरम्यान, उर्वरित ७०१ शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईच्या याद्या अपलोड करण्यासाठीचे काम प्रशासनाने हाती घेतले आहे.अवकाळीच्या नुकसानभरपाईचा शासन निर्णयाप्रमाणे वाढीव निधी देण्यात आला आहे. जिरायतीसाठी हेक्टरी १३ हजार ५००, बागायतीसाठी १७ हजार व फळबागांसाठी २२ हजार रुपये नुकसानीपोटी रक्कम मिळणार असल्याची माहिती माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिली आहे.

# महाशिवरात्रीनिमित्त त्रिवेणीश्वरला भाविकांची मांदियाळी

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील सुरेशनगर-हंडीनिमगावच्या मध्यावर असलेल्या स्वयंभू महादेव श्री क्षेत्र त्रिवेणीश्वर येथे हर हर महादेवचा असा गजर करत विविध धार्मिक कार्यक्रमांनी महाशिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यात आला.त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने दिवसभरात हजारो भाविकांनी स्वयंभू त्रिवेणीश्वर महादेवाचे दर्शन घेतले.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने ब्रम्हलिन भक्त प्रल्हाद महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व देवगडचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरीजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली त्रिवेणीश्वर येथे महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने पंच दिनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.महाशिवरात्रीच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास वेदमंत्राच्या जयघोषात त्रिवेणीश्वर शिवलिंगास महंत श्री रमेशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते





रुद्राभिषेक,दुग्धाभिषेक घालण्यात आला.भाविकांना रांगेत दर्शन घेता यावे म्हणून मंदिराच्या सभामंडपात दर्शन बारी तयार करण्यात आली होती. महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने आमदार शंकरराव गडाख यांनी भेट देऊन त्रिवेणीश्वराचे दर्शन घेतले यावेळी दर्शनासाठी आलेल्या मान्यवरांचा व भक्त परिवारातील सदस्यांचा महंत रमेशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्रिवेणीश्वर भक्त मंडळाचे सर्व सेवेकरी हे तनमन धनाने याठिकाणी सेवा देऊन स्वयंसेवकाची भूमिका बजवतांना दिसत होते.दर्शन बारी रांगेत सर्व भक्त हे शिस्तीचे पालन करत दर्शन घेतांना दिसत होते.

महाशिवरात्री निमित्ताने आलेल्या भाविकांचे महंत रमेशानंदगिरीजी महाराजांनी हसतमुखाने स्वागत केले.त्रिवेणीश्वर मंदिर प्रांगणात असलेल्या महान तपस्वी ब्रम्हलिन भक्त प्रल्हाद महाराजांचे समाधी मंदिर,हनुमान मंदिर,अन्नपूर्णा माता मंदिर येथे ही भाविकांनी दर्शन घेतले.त्यानंतर सर्व भाविकांना शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले.महाशिवरात्री उत्सवाचे औचित्य साधून त्रिवेणीश्वर देवस्थानच्या सभामंडपात रामायणाचार्य हभप समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन झाले या किर्तनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.तर रात्री टीव्ही स्टार हभप ज्ञानेश्वर महाराज तांबे यांचे हरिकीर्तन झाले.

नगर-संभाजीनगर हायवेवरील त्रिवेणीश्वर मंदिराच्या मुख्य कमानी पासून ते त्रिवेणीश्वर मंदिराच्या प्रांगणात यात्रा भरली होती.खेळणी,सौंदर्यप्रसाधने, गृहपयोगी वस्तूंचे स्टॉल,रसवंती गृहे,शीतपेयांची दुकाने ही मोठ्या प्रमाणात थाटण्यात आली होती,महाशिवरात्री निमित्त मंदिर व प्रवेशद्वारावर भव्य विद्युत रोषणाई व मंदिर प्रांगणात करण्यात आलेली कारंजा आरास देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.भाविकांच्या गर्दीने व भगवान शंकराच्या करत असलेल्या नामस्मरणाने येथील वातावरण शिवमय बनले होते.जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते रेवणनाथ पवार सर यांनी दिवसभरात सूत्रसंचालन करून आलेल्या मान्यवरांचे शब्द सुमनांनी स्वागत केले.

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे वतीने महिला दिनी नारी शक्ती सन्मान सोहळा

## गुरुवर्य रामगिरी महाराज यांना संत कौस्तुभ पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने संत कौस्तुभ पुरस्कार २०२४ व नारी शक्ती सन्मान सोहळा १० जानेवारी रोजी शिर्डी येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे वतीने सरला बेटाचे मठाधीपती प.पु. रामगिरी महाराज यांना संत कौस्तुभ पुरस्कार २०२४ देऊन गौरविण्यात येणार आहे. पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रदेश सरचिटणीस संग्राम कोते, व्याख्याते प्रदीप कदम, पत्रकार संघाचे नवी मुंबई विभागीय अध्यक्ष दशरथ चव्हाण, साईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटी चेअरमन विठ्ठल पवार, स्वामी शिरकुल वैदू, प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव हे प्रमुख उपस्थित राहणार आहे. यावेळी सामाजिक व शैक्षणिक कार्य रामचंद्र मारुती सुपेकर, ओतूर गावचे युवा उपसरपंच प्रशांत डुंबरे, आदिवासी भागात वैद्यकीय सेवा डॉ. सुभाष सोमण, शिक्षण अधिकारी दिलीप थोरे, युवा उद्योजक राहुल भास्कर पाबळकर यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. नारी शक्ती सन्मान सोहळ्यात शिर्डी च्या नगरसेविका सौ वंदना राजेंद्र गोंदकर सामाजिक व राजकीय कार्य, सौ रजनी रघुनाथ गोंदकर समाजिक व शैक्षणिक कार्य, जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष संपूर्णा सावंत सामाजिक आणि पर्यावरण क्षेत्र कार्य, राहता येथील डॉ राधा गमे वैद्यकीय व समाजिक, राजकीय क्षेत्रात कार्य, लोणी येथील श्रीमती सुनिता तांबे-योगा आध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, पत्रकारिता क्षेत्रात दै.राष्ट्र सह्याद्री च्या कार्यकारी संपादक, न्यूज अँकर सौ. पूनम करण नवले, पत्रकार संघच्या कायदेशीर सल्लागार ऍड रचना भालके, दै. केसरी च्या संगमनेर च्या प्रतिनिधी नीलिमा घाडगे, दै. बाळकडू च्या पारनेर प्रतिनिधी सौ निलम खोसे पाटील, बचत गटाचे सामाजिक कार्या बद्दल सौ पल्लवी कदम , विडी बांधून आपले तीन मुलांना शासकीय अधिकारी करणारी आदर्श माता सौ. शांता अशोक शेळके, विडी कामगार चळवळ साठी व शेतीतील कार्याबद्दल सौ. सखुबाई पुंजा वाकचौरे, पत्रकार यांच्या पत्नी सौ. अस्मिता दशरथ सोनवणे, अफगाण फायक अली सय्यद जामखेड, आरोग्य रक्षक पुणे सौ. अपेक्षा नवनाथ जाधव, बचत गट, राहुरी अध्यक्ष सौ. कविता प्रसाद मैड, वृत्तपत्र विक्रत्या सौ. गिरीजा रामकृष्ण लोंढे, अंतरभारती शिक्षण संस्था विरगांव च्या विश्वस्त सौ. गीता अनिल राहणे, बाल मानसशास्त्र तज्ञ सौ. स्वप्ना मनीष जाधव कोपरगाव, प्रवचनकार सौ. रेश्मा कुंडलिक वाळेकर संभाजीनगर, संजीवनी पतसंस्था भोकर माजी चेअरमन सौ मीनाक्षी चंद्रकांत झुरंगे, रेणुका माता भजनी मंडळ, भावी निमगाव अध्यक्ष सौ उषा रावसाहेब मरकड, वाडळा महादेव ग्रामपंचायत च्या माजी सदस्या सौ. मीनाक्षी राजेंद्र देसाई, शिक्षिका सौ. शर्मिला दत्तात्रय गाडगे पारनेर, शिक्षिका सौ. शोभा दत्तात्रय राऊत जामखेड, कृषी सहाय्यक सिन्नर सौ. कुसुम विजय शेळके तांबे, आरंभ फाउंडेशन जामखेड च्या सौ. रोहिणी ओंकार दळवी, बचत गट देहू च्या अध्यक्ष सौ. अरुणा ज्ञानेश्वर नवले, सौ. उर्मिला स्वानंद चत्तर संगमनेर, सौ. स्नेहल मोहन गायकवाड नेवासा, सौ. सोनिया अमोल म्हस्के, सौ. बेबी विनोद गायकवाड टाकळी ढोकेश्वर , समीना फिरोज मालजप्ते श्रीगोंदा , सुंदर चप्पल ओतूर च्या संचालिका सौ मंगल रवी गजे, सौ. रुपाली अशोक उगले डोंगरगाव, शिक्षिका सौ. वंदना सचिन लगड, सौ.सुनीत राहुल फुंदे शिर्डी, गो शाळेतील कार्य सौ. आरती भागवत खोल्लम कोतुळ, सौ. मीना जगन्नाथ आहेर, कविता विठ्ठल उदावंत नेवासा, मनीषा भारत अस्वार जुन्नर यांना जाहीर करण्यात आला आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमांस उपस्थित रहावे असे आवाहन पत्रकार संघाचे वतीने करण्यात आले आहे.



# शिकवणे हे सर्वात श्रेष्ठ दान : कांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सर्व महिलांनी सर्वच क्षेत्रात आघाडी घेतलेली आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला आहेत. महिला फार उत्तम पद्धतीने काम करत असतात.मला एवढंच सांगायचं आहे पालकांना की,विद्यार्थ्यांना कोणतीही सक्ती करू नका. शिक्षकांना सांगायचे आहे की हसत हसत वर्ग फुलविला पाहिजे.मुलं गडबड करत असतील तर शिक्षिकेने थोडा डान्स केला तरी चालतो.हे खूप महत्त्वाचं आहे.मुलं गुंतून राहिली पाहिजेत. मुलांना उमलू द्या. त्यांच्या वर जबरदस्ती करू नका.शिकविणे हे फार उत्तम काम आहे. अन्नदान हे सर्व श्रेष्ठदान आहे.परंतू शिकविणे हे त्याहूनही श्रेष्ठ दान आहे.कारण विद्या तुम्हाला आयुष्यभर पुढे घेऊन जात असते.असे प्रतिपादन शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे यांनी केले.

लोणंद ता.खंडाळा येथील पंचशील बुद्धविहारात महिला दिन साजरा करण्यात आला. शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे यांचा विशेष सत्कार माया नंदकुमार खरात यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी सत्कार प्रसंगी भावना व्यक्त केल्या.माझा सत्कार आणि सन्मान केला. नक्कीच माझ्या सन्मानाबद्दल सर्वांना समाधान वाटले असेल.असे सुद्धा शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे यांनी म्हटले. शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे ह्या समस्त खरात हितकारी संस्थेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मोफत इंग्रजी वर्गातील विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम करत आहेत.

त्यांचे शिकविणे विद्यार्थी घडविणारे असल्याने त्यांच्या कार्याचा सन्मान हा महिला दिनी घेण्याचा निर्णय हा माजी नगरसेविका शैलजा खरात व समस्त खरात हितकारी संस्थेचे अध्यक्ष दयाभाऊ खरात यांच्या वतीने घेण्यात आला होता.महिला दिनाच्या अनुषंगाने विशेष सत्कारमूर्ती म्हणून शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे यांचे विशेष कौतुक करत असताना यावेळी उपस्थित असलेले विद्यार्थी,पालक आणि महिला यांच्या समोर त्यांना सन्मानचिन्ह,शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.या प्रसंगी विचारमंचावर कै.आनंदा सूर्यवंशी चॅरिटेबल ट्रस्टच्या उपाध्यक्षा विमलताई सुर्यवंशी, आदर्श शिक्षिका मृणाल जाधव,इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा दर्शना रावळ, माजी अध्यक्षा डॉ.स्वाती शहा, माया खरात,जया खलाटे, रजनीताई शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच रिना खरात, रेखाताई खरात,कुमुदिनी खरात, दिपाली खरात, लीना खरात आदीं सह बऱ्याच महिला उपस्थित होत्या. डॉ.स्वाती शहा यांनी इंग्रजी वर्गास जे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले.या शैक्षणिक कार्या बद्दल सुद्धा डॉ. स्वाती शहा यांचा सत्कार माजी नगरसेविका शैलजा खरात यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रम प्रसंगी विमलताई सुर्यवंशी, मृणाल जाधव, दर्शना रावळ,डॉ. स्वाती शहा, माया खरात,जया खलाटे, कुमुदिनी खरात, प्रीती खरात,प्रियांका खरात आदींनी मनोगते व्यक्त केली. डॉ.स्वाती शहा म्हणाल्या की,खरात हितकारी संस्थेचे अभिनंदन करते. दयाभाऊ तुम्ही सर्वांनी मिळून इथे वर्ग सुरू केला.हे खूप चांगलं केलं.मी बघत असते की मुलांमध्ये खूप सुधारणा झालेली आहे. तुमच्या सर्वांबरोबर याचे श्रेय कांबळे मॅडम यांना जातं.शिक्षिका हा गुण त्यांच्यात आहे.ते पूर्णपणे करून घेतात.त्यांना कोणतीही प्रसिद्धी आणि गवगवा नकोय. फक्त ते जे करत आहेत ते व्यवस्थित झालं पाहिजे.

# लाखो भाविकांनी घेतले श्री घृष्णेश्वराचे दर्शन; पोलिसांचा चोख बंदोबस्त



आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** अवघ्या देशभरात प्रसिद्ध असलेले वेरुळ येथील 12 वे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी महाशिवरात्री निमित्त देशभराहुन आलेल्या लाखो भाविकांनी शुक्रवारी दर्शन घेतले. तर जिल्ह्यातील भाविकांनी सकाळी पहाटे पासूनच दर्शन घेऊन हर हर महादेवाचा गजर केला.शुक्रवारी देशभरातील सर्व ज्योतिर्लिंग महाशिवरात्रीच्या पावन मुहूर्तावर भाविकांनी फुलुन गेले होते. त्याच प्रमाणे मनोकामना पूर्ती करणारा श्री घृष्णेश्वर म्हणून ख्याती असलेले वेरुळातील शेवटचे आणि 12 वे ज्योतिर्लिंगाचे दर्शन देखील लाखोंच्या संखेने भाविकांनी मंदिर ट्रस्ट व पोलिस प्रशासनाच्या चोख पोलीस बन्दोबस्तात घेतले. उपविभागीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेतलेल्या आढावा बैठकीत मागील दरवाजा स्थानिक गावकऱ्यांसाठी रात्री बारा ते सकाळी सात वाजेपर्यंत उघडा ठेवण्याचे निर्देश यांनी दिले असतानाही घृष्णेश्वर देवस्थान ट्रस्टने मागील वर्षाचा कित्ता पुन्हा गिरवत गावकऱ्यांची कुठलीही दखल न घेता दरवाजा बंद केला. यामुळे गावकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली पूर्वेकडील दरवाजा बंद असल्याने अनेक महिला पुरुषांनी पूर्वेकडून मंदिर परिसरात उड्या मारत आत प्रवेश केला. तसेच मंदिर प्रशासन जाणून बुजून गावकऱ्यांना दर्शन घेण्यापासून दूर ठेवत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. सतीश लोखंडे, वेरूळकर ग्रामस्थ उपविभागीय अधिकारी आढावा बैठकीत यांनी केलेल्या सूचनेनुसार घृष्णेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्ट ग्रामस्थांना कुठल्याही प्रकारचे सौजन्य न दाखवता दक्षिण द्वार बंद केल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय झाली होती. मी स्वतः दोन तास ताटकळत राहिलो होतो. तसेच यामुळे अनेक भाविकांना दर्शनाचा लाभ घेता न आल्याने वापस जावे लागले.



# स्व. वसंत महाराज पांडव यांच्या स्मृतीप्रित्यर्थ गोशाळेला चाळीस हजार रूपयांची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संत एकनाथ समाधी मंदिरासमोर स्वर्गीय वसंत महाराज पांडव यांच्या स्मरणार्थ 11 किलो चांदीचे धनुष्य अर्पण करुन पैठण येथील गोशाळेला 40 हजार रुपये,गोशाळेतील गाईच्या कडबा कटर खरेदीसाठी  पालकमंत्री संदिपान भुमरे, ह.भ.प.रघुनाथ महाराज गोसावी यांच्या हस्ते गोशाळा चालक अशोक चांडक यांना देण्यात आले.यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी,ग्रामीण पोलीस अधीक्षक मणिष कलवानिया,  रेखाताई कुलकर्णी, योगेश महाराज गोसावी,यांच्या श्रीकृष्ण कुलकर्णी रवींद्र पांडव. राज्य दूध संघाचे नंदलाल काळे, कार्यकारी विश्वस्त दादा बारे, माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, शेखर पाटील, राजू गायकवाड, अरुण काळे, गोवर्धन टाक, राजकुमार लोहिया, राधेश्याम चांडकसह नागरिकांची उपस्थिती होती.



# 'त्या' अर्भकावर अंत्यसंस्कार

## वाळूज येथे सापडले होते स्त्री जातीचे मृत अर्भक

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**वडगाव कोल्हाटी :** येथे स्त्री जातीचे मृत अर्भक सापडल्याची घटना शनिवारी (दि. २४) सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास सापडल्याने परिसरात खबळबळ उडाली होती. अर्भक टाकणाऱ्याचा पोलीस शोध घेत असून आजूबाजूच्या परिसरातील सीसीटिव्ही फुटेजची तपासणी करत आहे.

अर्जून हावनोर यांना वडगाव कोल्हाटी गट नं. २१, प्लॉट क्र. २६ मधील मोकळ्या जागेवर शनिवारी सायंकाळी एक अर्भक पडलेले स्थानिक नागरिकांनी दिसले असता त्यांनी पोलिसांना कळवले.दरम्यान,महिला पोउपनि स्वाती उचित,यांनी हे घटनास्थळी दाखल होत मृत अर्भकचा पंचनामा केला.मृत अर्भकास तपासणीसाठी घाटीत पाठविण्यात आले होते.अनैतिक संबंधातून अर्भकाचा जन्म होऊन कोणालाही कळू नये म्हणून ते मोकळ्या जागेवर फेकल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. हे अर्भक एका दिवसाचे जन्मलेले बाळ असल्याची माहिती पोलिसांनी दिली असून,कोणास काही माहिती मिळाल्यास पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन पोउनि शिवाजी घोरपडे यांनी केले आहे. याप्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला होता.पोलीसांनी सदर मयतास शासकीय घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होतो.नातेवाई न मिळाल्याने त्या स्त्री जातीचा मृतांचे शव विच्छेदन करुन माणुसकी रुग्ण सेवा समुह समाजसेवक सुमित पंडित हे बेवारसांचे अंत्यविधीसाठी मदतकार्य करतात कळाल्यानंतर शिवाजी घोरपडे उप पोलीस निरीक्षक यांनी अंत्यविधी करण्यासाठी मदत मागितली व सदर बाळाचा दफनविधी बेगमपुरा स्मशानभूमी येथे माणुसकी टिम ने व वाळुज पोलीसांनी केला या कार्यासाठी शिवाजी घोरपडे उप पोलीस निरीक्षक वाळुज,हनिफ पटेल,नंदु काळे सामाजिक कार्यकर्ते वाळुज, समाजसेविका पुजा पंडित, सुमित पंडित आदींनी मदतकार्य केले.



# पाल येथे विकास कामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पाल येथे शिवसेना जिल्हाप्रमुख माननीय श्री रमेश जी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय पशुसंवर्धन इमारत श्रेणी एक या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले किंमत एक कोटी सत्तावन्न लाख गावांतर्गत सिमेंट रस्ता वीस लाख रुपये 3 स्मशानभूमी शेड असोशोभीकरण पंधरा लाख रुपये माननीय नामदार श्री संदिपवांची भुमरे साहेब रोजगार हमी योजना तथा फलोत्पादन पालकमंत्री छत्रपती संभाजी नगर यांनी मंजूर केलेल्या कामांचा त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाप्रमुखाचे हस्ते भूमिपूजन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री राजेंद्र ठोंबरे माजी अध्यक्ष जिल्हा परिषद तथा शिवसेना तालुकाप्रमुख फुलंब्री हे होते प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत जाधव माजी सभापती बाजार समिती फुलंब्री भास्करराव मुरमे शिवसेना तालुकाप्रमुख संभाजीनगर बाबासाहेब तांदळे तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस बापूराव मस्के नवनाथ वाघदरे अंकुश ताठे तसेच पाल चे सरपंच जयाताई अमोल जाधव उपसरपंच चंद्रशेखर जाधव सूर्यभान पाटील जगन्नाथ पाटील जगन्नाथ गुरुजी हिम्मतराव पाटील ज्ञानेश्वर छगनराव जाधव आप्पासाहेब जाधव संतोष अंबादास जाधव जयपाल ठाकूर शेख रब्बानी संदीप तुपे राजेंद्र जाधव गणेश जाधव तंटामुक्ती अध्यक्ष दत्तू जाधव उपाध्यक्ष संजय जाधव सूर्यभान गायकवाड गणेश ढेपले लक्ष्मण जाधव भगवानराव जाधव चंद्रशेखर जाधव सुखदेव नरवडे आबाजी जाधव सतीश जाधव कल्याण जाधव कचरू जाधव प्रकाश शेवगण राजू डेडवाल कैलास जाधव छबुराव जाधव महादेव तात्या इतर मान्यवर उपस्थित होते सूत्रसंचालन संतोष जाधव यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपसरपंच चंद्रशेखर जाधव यांनी मानले तसेच वाढदिवसानिमित्त तालुक्यातील लिहा बाबुळगाव बाबुराव बोधेगाव ममनाबाद खामगाव येथेही खडी करून रस्ते युवर ब्लॉक सिमेंट रस्ते इतर कामाचे भूमिपूजन वरील मान्यवरांच्या हस्ते पार पडले तसेच माननीय नामदार श्री संदिपान जी भुमरे साहेब यांनी कोट्यावधीचा निधी फुलंब्री तालुक्याला मंजूर केल्याबद्दल तालुक्याच्या वतीने त्यांचे खूप खूप आभार मानण्यात आले.

# बाजार सावंगी येथील महादेव मूर्तीची अभिषेक पूजा करून महाआरती

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** महाशिवरात्र सणानिमित्त शुक्रवारी (ताः८) खुलताबाद तालुका परिसरातील विविध ठिकाणी असलेल्या कनेक्शनच्या गंधेश्वर डोंगरातील महादेव मंदिरात विरमगाव येथील शिवसंगमेश्वर महादेव मंदिरात तसेच डोंगरगावच्या डोंगरातील शिव महादेव मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी करून दर्शनाचा लाभ घेतला. या तालुक्यात घृष्णेश्वर महादेव मंदिर असूनही अनेक भाविक शालेय विद्यार्थी व सर्व सामान्य महिला व पुरुष परिसरातील या महादेव मंदिरात पायी प्रवास करून महादेवाचे दर्शन घेतात तसेच अभिषेक करून पूजा अर्चा करून तीर्थक्षेत्र गेल्याचे समजून दर्शनाचा आनंद लुटतात. श्रावण महिना आषाढी एकादशी व प्रत्येक महाशिवरात्री या डोंगराळ मंदिरावर जाऊन नेहमीच दर्शनासाठी गर्दी करून लाभ



घेतात. बाजार सावंगी येथील महादेव मंदिरात सकाळी जय जनार्दन भाविक भक्त गणातर्फे महादेव मूर्तीची अभिषेक पूजा व महाआरती करून सर्वांनी दर्शनाचा लाभ घेतला दिवसभर भाविकांची गर्दी दिसून आली.



# महिला उद्यानात नवीन सभागृहाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** जागतिक महिला दिनानिमित्त माजी नगरसेविका अंजली साळवे यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आलेल्या उल्हासनगर शहरातील एकमेव महिला उद्यानात नवीन सभागृहाचे उदघाटन व सकाळी १० ते २ पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबीरात महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद. सकाळी १२ते२ पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या महिला दिनाच्या संकल्पनेवर आधारित रांगोळी स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

छत्रपती शिवाजी महाराज महिला व बाल उद्यान येथे खास महिलांच्या कार्यक्रमासाठी बांधण्यात आलेल्या सभागृहाचे उद्घाटन मा.अतीरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर व उपायुक्त डॉ सुभाष जाधव यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाला मा.महापौर लीलाबाई आशान मॅडम उपस्थित होत्या तसेच पिण्याच्या पाण्यासाठी इनरव्हील क्लबच्या वतीने उद्यानात वॉटर फिल्टर बसवण्यात आले त्याचे उद्घाटनप्रसंगी डॉ रेवती जठार, प्रोजेक्ट चेअरमन रुता कोलवेकर व इनरव्हील क्लबच्या सदस्या उपस्थित होत्या यावेळी रांगोळी स्पर्धेचे विजेत्यांना सन्मान चिन्ह व सर्व सहभागी महिलांना प्रशस्तीपत्र व तुळस देउन त्यांचा सन्मान करण्यात आला व ७ बागकाम करणार्या महिलांना साडी व तुळस देउन सन्मानीत करण्यात आले सर्व उद्यानाच्या भिंतीवर महिला सक्षमीकरण संकल्पना राबवून उत्कृष्ट पेंटींग्ज केल्या बद्दल आर्किटेक्ट टिना केडीया हिला सन्मानीत करण्यात आले.

उद्यान अधीक्षक दिप्ती पवार हिच्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी महानगरपालिकेच्या अनेक महिला पदाधिकारी सचीव प्राजक्ता कुलकर्णी, निलम बोडारे, श्रद्धा बाविस्कर, विशाखा सावंत, संगीता लहाने व  दिप्ती पवार व परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# तलवारीने केक कापणे तरूणाला पडले महागात

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** तलवारने केक कापून स्टेटस ठेवणे एकास पडले महाग, याबाबत सविस्तर वृत्त असे की, दि. 7 रोजी पोलीस निरीक्षक भदाणे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, संदीप नवनाथ माळी रा. माळेगाव ता. शेवगाव याने वाढदिवसानिमीत्त तलवारीने केक कापलेचा स्टेटस मोबाईलला ठेवला होता. अशी बातमी मिळाल्याने लागलीच पोनि यांचे आदेशाने पोहेकाँ नाकाडे, पोहेकॉ दराडे, पोशि शाम गुजाळ, पोशि बप्पासाहेब धाकतोडे, पोशि संपत खेडकर यांनी केक कापणारा माळी याचा शोध घेवून तो बोधेगाव ता. शेवगाव या ठिकाणी मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून दोन पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात एक पितळी मुठ असलेली दोन फुट लांबीची एक पांढरे रंगाची लोखंडी तलवार मिळून आली. सदर तलवारीचा जागीच पंचनामा करून आरोपी व तलवार ताब्यात घेऊन शेवगाव पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल शाम गुंजाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गु र नंबर 198/2024 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे...

# शिर्डी येथे पहिल्या शीतगृहाचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शिर्डी लोकसभा मतदार संघाचे खासदार सदाशिव लोखंडे यांच्या प्रयत्नांतून महाराष्ट्र शासनाच्या वैशिष्ठ्यपूर्ण योजनेतून मंजूर झालेल्या सौर शितगृह प्रकल्पाचे आज मान्यवर आणि बचत गटाच्या महिलांच्या उपस्थितीत संपन्न झाले

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून देशातील पहिलाच सौर शीतगृह प्रकल्प या नाविन्यपूर्ण उपक्रमाअंतर्गत शिर्डीतील भाजी मंडई येथे हा तब्बल २५ लक्ष रुपये किमतीचा सौरउर्जेवर चालणारे शितगृह नगरपरिषदेच्या जागेत बसविण्यात आला असून या माध्यमातून शिर्डीतील ग्रामस्थांना भाजीपाला फळे मिळणार असून बचत गटाच्या महिलांना देखील यातून आर्थिक उत्पन्न सुरू असल्याचे खा. लोखंडे यांनी सांगितले शिर्डी लोकसभा मतदार संघात २२ शीतगृह उभारणार १५ शितगृहाचे लोकार्पण केले जाणार आहे असून पाहिले उद्‌घाटन शिर्डीत खा. लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आलेण्

या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते, मुख्याधिकारी सतीश दिघे, शिवसेना जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, भाजप सरचिटणीस नितीन कापसे,माजी उपनगराध्यक्ष निलेश कोते, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते रमेश गोंदकर, रिपाइंचे जिल्हाध्यक्ष प्रदीप बनसोडे,भाजप शहराध्यक्ष सचिन शिंदे, संस्थानचे माजी विश्वस्त सचिन तांबे,मनसेचे दत्तू कोते, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक गोंदकर,शिर्डी शहर शिवसेना प्रमुख सदाशिव गोंदकर, ऍड अनिल शेजवळ मा नगराध्यक्ष अलकाताई शेजवळ ,सोनाली धिवर,शिल्पा गायकवाड यांसह बचत गटाच्या महिला भगिनीं उपस्थितीत होत्या.



# जिल्ह्यातील कायदा व सुवस्था सुधारण्यावर भर द्या : आमदार प्रतिभा धानोरकर

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** जिल्हा तसा शांत जिल्हा म्हणून महारष्ट्रात ओळखला जातो. परंतू अलिकडे सतत होत असलेल्या हत्यांमुळे नविन ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेत सुधारणा करण्याचे मत आमदार प्रतिभा धानोरकर यांनी गृह मंत्री तथा उपमुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रातून व्यक्त केले आहे. मागील दोन महिन्यांच्या काळात विविध कारणातून जवळपास 15 जणांच्या हत्या झाल्या आहेत. यापैकी काही गुन्हे हे कौटुंबिक वादातून तर इतर गुन्हे वेगवेगळ्या कारणातून झाले आहे. कौटुंबिक वादातून घडणाऱ्या गुन्ह्यांसाठी पोलिस स्टेशन मधे समुपदेशन कक्ष उभारल्यास होणाऱ्या घटना टाळता येईल, असे मत आमदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केले. त्या सोबतच कायदा व सुव्यवस्था अबधित राखण्याकरीता अवैध धंद्यावर आळा बसविणे गरजेचे आहे. कारण यातूनही अनेक गुन्हे घडतांना दिसुन येत आहे. युवकांना देखील गुन्ह्यापासून दुर करण्याकरीता योग्य ते मार्गदर्शन करणे गरजेचे असल्याचे मत आमदार धानोरकर यांनी व्यक्त केले आहे. महाविद्यालयीन स्तरावर पोलिस प्रशासनाच्या माध्यमातून युवकांना योग्य असे मार्गदर्शन झाल्यास भविष्यात गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालता येईल यासाठी पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याना भेटणार असल्याचे देखील सांगितले. यावेळी महीला सुरक्षतेच्या संदर्भाने देखील चर्चा करणार असल्याचे सांगितले.

# महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांना साबुदाणा खिचडी व फळवितरण

## कमल स्पोर्टिंग क्लबचा सामाजिक उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** कमल स्पोर्टींग क्लबच्या वतिने दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांना साबुदाना खिचडी व फळवितरण करण्यात आले. दि. ०८ मार्च २०२४ रोजी सकाळी ०६ वाजेपासून चंद्रपूर येथील अंचलेश्वर मंदीरामध्ये कमल स्पोर्टींग क्लबचे जिल्हाध्यक्ष रघुवीर अहीर यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमास हरिश्चंद्र अहीर, भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत, खुशाल बोंडे, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, राजु घरोटे, श्यामल अहीर, हर्षवर्धन अहीर, प्रदिप किरमे, राजेश वाकोडे, स्वप्नील मुन, राहुल गायकवाड, राजवीर चौधरी, कमल कजलीवाले, प्रणय डंभारे, चेतन शर्मा, राहुल बोरकर, शुभम लोणकर यांचे सह स्पोर्टींग क्लबचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. अंचलेश्वर मंदीर येथे पुजाअर्चना करणारे शिवभक्त, भाविकबांधव व आबाल वृध्दांना उपस्थित मान्यवरांनी खिचडी व फलवितरण करून सर्व उपस्थितांना महाशिवरात्रीनिमित्त शुभेच्छा दिल्या.



# महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार मोहन मोरे यांना जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना महाराष्ट्र शासन दरवर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देऊन गौरव असते. यंदाचा पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते मोहन मोरे यांना जाहीर झाला आहे. गेल्या ३५-४० वर्षापासून मोहन मोरे यांचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात अविरत काम सुरू आहे. बौद्ध धम्मीय वधू वर पालक परिचय मेळावे, सामुदायिक विवाह यांचे आयोजन, विद्यार्थ्यांना शासनाच्या स्कॉलरशिप मिळवून देणे कामी मदत करणे, पडल्या नडलेल्यांना मदत करणे, कोविड काळात रुग्णांना बेड मिळउन देणे, अन्यायग्रस्त नागरिकांना आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून न्याय मिळउन देणे, अनेकांच्या सुख दुःखात सहभागी होऊन त्यांना मदत करणे, समाजात जातीय सलोखा निर्माण करणे अशी अनेक कामे मोहन मोरे अनेक वर्षापासून अविरतपणें करीत आहेत. अशी कामे करताना कुणाकडूनही कसलीही अपेक्षा न करता प्रामाणिकपणे त्यांचे काम सुरू आहे. जयहिंद महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाल्यानंतरही पत्रकारिता पदविका अभ्यासक्रम ते शिकवित आहेत. मोहन मोरे यांना डॉ.बाबासाहेब समाज भूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व स्थरातून त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

# 'लेक लाडकी' योजना ठरत आहे मुलीसाठी 'विधायक'..!

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** शासणाद्वारे मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी' योजना 1 एप्रिल 2023 पासुन सुरू झालेली आहे.लाभार्थी मुलीला या योजनेमधुन तीच्या वयाच्या अठरा वर्षापर्यंत टप्पाटप्प्याने एक लाख एक हजार रुपये मिळतील, अशा प्रकारे तरतुद महाराष्ट्र शासनाने केली आहे.सदर योजना ही मुली साठी विधायक ठरणार आहे. 'लेक लाडकी' या योजनेंतर्गत मुलीच्या जन्मापासुन ते शिक्षणापर्यंत आर्थिक मदत मिळेल.ही आर्थिक मदत मुलीचे 18 वर्ष वय होईपर्यंत सरकारकडुन दिली जाईल. या योजनेचा लाभ पिवळ्या आणि केशरी रेशन कार्डधारक कुटुंबांतील मुलींना दिला जातो. इयत्ता पहिली मध्ये 6 हजार रुपये, सहावी मध्ये 7 हजार रुपये, अकरावी 8 हजार रुपये; तर 18 वर्षांची झाल्यानंतर मुलीला रोख 75 हजार रुपये दिले जातील. **पालकांनी अर्ज कुठे करायचा :** अर्ज करण्याची प्रक्रिया आपल्या भागातील अंगणवाडी सेविकेकडे या अर्जाचा नमुना असेल.योजनेच्या लाभासाठी अंगणवाडी सेविकेकडे अर्ज करावा.अर्जावर वैयक्तिक माहिती,पत्ता,मोबाइल नंबर, अपत्यांची माहिती,बँक खाते तपशील,योजनेच्या कोणत्या टप्प्यासाठी अर्ज केला ते लिहावे. तारीख,ठिकाण टाकुन स्वाक्षरी करावी.अर्ज भरून दिल्यानंतर अंगणवाडी सेविकेकडुन पोच पावती घ्यावी. लेक लाडकी योजने साठी अर्जासोबत जोडायची ागदपत्रे=बाळाचा जन्माचा दाखला.उत्पन्नाचा दाखला तहसीलदार/वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त नसावे आईचे आधार कार्ड रहिवासी दाखला बाळाचे आधारकार्ड. जाईन बॅंक खाते (बाळाचे व आईचे) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स,मतदानकार्ड, रेशनकार्ड व शाळेच्या दाखल्याची झेरॉक्स.कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्रमाणपत्र. आई व बाळाचा फोटो, लाभ घेण्यासाठी नियमावली पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबामधील 1 एप्रिल 2023 रोजी किंवा त्यानंतर जन्माला आलेल्या एक अथवा दोन मुलींना ही योजना लागू असेल. एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लाभ मिळेल.पहिल्या अपत्याच्या तिसऱ्या हप्त्यासाठी,दुसऱ्या अपत्याच्या दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज सादर करताना मातापित्यांना कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.दुसऱ्या प्रसूतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास मुलीला;तर दोन्ही मुली असल्यास दोघींनाही योजनेचा लाभ मिळेल. मात्र,त्यासाठी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक.त्याच प्रमाणे लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्राचे रहिवाशी असावे. लाभार्थीचे बँक खाते महाराष्ट्राचे असावे.आणि कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाखांपेक्षा जास्त नसावे.

# साहित्य संमेलनाध्यक्षपदी कृष्णा इंगोले यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

राजेंद्रकुमार शेळके



**पुणे :** अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने १५ वे छत्रपती संभाजी महाराज मराठी साहित्य संमेलन ११ मार्च २०२४ रोजी शिवस्मारक नाट्यगृह सोलापूर येथे संपन्न होणार आहे, या संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिध्द साहित्यिक डॉ. कृष्णा इंगोले यांची सर्वानूमते निवड करण्यात आल्याची माहिती साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष व सुप्रसिध्द साहित्यिक शरद गोरे यांनी दिली. छत्रपती संभाजी महाराज यांच्या दैदिप्यमान इतिहास व साहित्यिक पैलूचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते, उद्घाटन समारंभ परिसंवाद, कविसंमेलन असे संमेलनाचे स्वरूप असून राज्यभरातील मोठया संख्येनी साहित्यिक या संमेलनास हजेरी लावणार आहेत, तुका म्हणे (कोश) गावरंग, गावजागर, परिघावरच्या पाऊलखुणा, ग्रामीण साहित्य आणि वास्तव,लोक संस्कृतील स्त्रीरूपे,आस्थेची माणसं,लोकवाणीतील अमृतधन,माणदेशी साहित्य,यासह १५ ग्रंथाचे लेखन डॉ.कृष्णा इंगोले यांनी केले असून आजवर विविध पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे, रवींद्र खंदारे (सातारा) कृष्णकांत चव्हाण (सोलापूर) राजू म्हस्के (बीड) प्रा. इंद्रजित पाटील (बार्शी) दस्तगिर जमादार (सोलापूर) आदी जणांना छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



महाशिवरात्रीच्या शुभपर्वावर माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री तथा राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी भटाळा, शिरपुर आणि विदर्भाची काशी मार्कंडेश्वर देवस्थान येथील मंदीरात भगवान शिवजींचे दर्शन घेतले व उपस्थित सर्वांना महाशिवरात्रीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

# विधानसभा प्रमुख अनुप अग्रवाल यांच्या नेतृत्वात महिला कामगार मेळावा

## 300 हून अधिक घरेलु कामगार महिलांना गृहोपयोगी भांडी व वस्तूंचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दि. 8 मार्च रोजी महिला दिनानिमीत्ताने घरेलु महिलांना व मजुरांना भांडे वाटपाचा कार्यक्रम तसेच धुळे विधानसभा भव्य कामगार लाभार्थी मेळावा घेण्यात आला. भारतीय जनता पार्टी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्या सुचनेनुसार, कामगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विजयजी हरगुडे व विधानसभा प्रमुख अनुपजी अग्रवाल धुळे यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच कामगार मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष विजयजी पवार यांच्या माध्यमातून घरेलू महिला व कामगारांना घरोपयोगी भांडी वस्तू व मोफत फॉर्म वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा बेटी बचाओ बेटी पढाओ प्रदेश सह-संयोजिका सौ.अल्पा अनुप अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी घरेलू महिला व बांधकाम कामागार मजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ३०० हून अधिक घरेलू महिला व कामगारांना घरोपयोगी भांडी वस्तू वाटप करण्यात आले. तसेच बांधकाम कामगारांना मोफत फॉर्म वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला व नवीन कामगारांची मोठ्या प्रमाणात नोंदणीही करण्यात आली. यावेळी लाभार्थी महिलांनी अनुप भैय्या अग्रवाल व सौ. अल्पा अनुप अग्रवाल यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अड. किशोर जाधव यांनी केले. या कार्यक्रमाला मा.महापौर चंद्रकात बापू सोनार, मा.महापौर प्रदीप नाना कर्पे, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा सौ. मायादेवी परदेशी, माजी महापौर प्रतिभा ताई चौधरी, मा.महापौर सौ. जयश्रीताई अहिरराव, नगरसेविका सारिका ताई अग्रवाल, सरचिटणीस मोहिनी ताई गौड, ओबीसी महिला मोर्चा अध्यक्ष पुष्पाताई बोरसे, शितलताई नागसेन बोरसे, भाजपचे जेष्ठ पदाधिकारी भीमसिंग काका राजपूत, माजी उपमहापौर नागसेन बोरसे, भाजपा जेष्ठ नेत महादेव परदेशी, दिनेश दादा बागुल, प्रदेश विधी सल्लागार अड.किशोर जाधव. कामगार मोर्चाचे शहर उपध्यक्ष देविदास वाघ, हेमंत लोणारी, प्रथमेश गांधी, सागर कोंडगिर, राज गवले, यश पवार, आदि पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाशिवरात्रीला ५५ हजार साई भक्त भाविकांनी घेतला खिचडीचा लाभ

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थान शिर्डीच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यात आला असून श्री साईप्रसादालयात सुमारे ५५ हजार साईभक्तांनी शाबुदाणा खिचडीचा प्रसादरुपी लाभ घेतला. पहाटे ५.१५ वाजता श्रींची काकड आरती झाली. त्यानंतर सकाळी ५.५० वाजता श्रींचे मंगलस्नान होवुन शिर्डी माझे पंढरपुर ही आरती झाली. त्यानंतर ६.२५ श्रींच्या दर्शनास प्रारंभ झाला. दुपारी १२ वाजता श्रींची माध्यान्ह आरती झाली. सायंकाळी ६.१५ धुपारती झाली. रात्रौ ७.३० ते ८.३० यावेळेत समाधी मंदिरातील स्टेजवर मंदिर पुजारी उल्हास वाळुंजकर यांचा कीर्तनाचा कार्यक्रम झाला. तसेच रात्रौ ९.१५ वाजता श्रींचे पालखीची शिर्डी गावातुन मिरवणुक काढण्यात आली. यावेळी संस्थानचे अधिकारी, मंदिर पुजारी, कर्मचारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठया संख्येने सहभागी झाले होते. पालखी समाधी मंदिरात परत आल्यानंतर रात्रौ १०.४५ वाजता श्रींची शेजारती करण्यात आली. तर रात्रौ १२.२५ ते रात्रौ ०१.१३ यावेळेत श्रींच्या गुरुस्थान मंदिरात संस्थानचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे व सौ. ज्योती हुलवळे यांच्या हस्ते पुजा करण्यात आली. महाशिवरात्री निमित्त संस्थानच्या श्री साईप्रसादालयात सुमारे ५५ हजार साईभक्तांनी मोफत शाबुदाणा खिचडीचा प्रसादरुपी लाभ घेतला. याकरीता सुमारे ५८ पोते शाबुदाणा, ३८६५ किलो शेंग दाणे, ९७० किलो तुप व १९९८ किलो बटाटा वापरण्यात आले. तर सुमारे २५ हजार २४७ नाष्टा पाकीटांचा साईभक्तांनी लाभ घेतला.



